
# मंदाकिनी

१२७२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ९०८



REFBK-0006840

वि. स. खांडेकर

# मंदाकिनी

(आवृत्ति दुसरी)

★

वि. स. खांडेकर

REFBK-0006840

ग्रंथ संग्रहालय ठाणे

किंमत १॥ रुपया

प्रकाशक :
**रा. ज. देशमुख,**
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार, पुणें २

प्रथम आवृत्ति
१९४२
द्वितीय आवृत्ति
१९४७
जानेवारी

१ सर्व हक्क सौ. **उषा खांडेकर** यांच्याकडे आहेत.
२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. **दीनानाथ दलाल** यांचें आहे.

मुद्रक :
**गो. ब. जोशी,**
आनंद मुद्रणालय
१९६/४६ सदाशिव, पुणें २.

आमचे कोल्हापूरचे स्नेही

**माधवराव बागल**

**व**

**डॉ. सूर्यवंशी**

यांस—

●

## देशमुख आणि कंपनीचीं आगामी प्रकाशनें

महात्मा गांधी

१ तेजस्वी तरुणी

नेताजी सुभाषचंद्र बोस

१ लाल किल्ला

वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ तिसरी भूक
४ वर्षाकाल
५ छाया भाग १–२
६ चार भिंती
७ दोन मनें (आ. ति.)
८ बडी मां
९ चक्रवर्ति
१० वटपत्रें
११ '१९४२'
१२ उद्यांचीं स्वप्नें
१३ विसावें शतक
१४ अश्रु आणि हास्य
१५ माझ्या कादंबऱ्या
१६ वालुका
१७ तृणांकुर
१८ साहित्य साधना
१९ श्यामचीं पत्रें
२० तुरुंगांतील पत्रें
२१ गडकरी (व्यक्ति आणि वाङ्मय) (दु. आ.)
२२ न लिहिलेलीं भाषणें
२३ तिसरा प्रहर
२४ चल ये राणी
२५ त्रिमूर्ति
२६ हस्ताचा पाऊस
२७ तुरुंगांतील पत्रें (भाग दुसरा)

ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ माझे आवडते कवि
३ चक्रवर्ति उदयन
४ कांता (दु. आ.)
५ स्वप्नांतरिता
६ ऊर्वशी
७ उमरखय्याम
८ विलापिका
९ हें युद्ध

दत्त रघुनाथ कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी
४ नितळलेल्या भावना

साने गुरुजी

१ आवडत्या गोष्टी १ ते १० भाग
२ रविंद्रनाथ टागोर

गोपीनाथ तळवलकर

१ ४२ आणि नंतर

## देशमुख आणि कंपनीचीं आगामी प्रकाशनें

### ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई

२ शेजारी

३ वडिलांचे सेवेशीं

### प्र. के. अत्रे

१ 'मी' कसा झालों ?

२ ? (लघुकथा)

### कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा

२ कलाक्षेत्रांत

३ मवाली

४ गुणाची पोर

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरण यात्रा

२ ? (पत्रें)

### अनंत काणेकर

१ काळे आणि पांढरे

२ गिब्रानच्या कथा

### चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ

२ दरबार कथा

३ लंकावैभव

४ आजीबाई

५ माणुसकी

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी

२ कवुली जबाब

३ मोहनिद्रा

४ गडी फू

५ अमृताचे बोल

### शकुंतला परांजपे

१ चांदणी

### पां. वा. गाडगीळ

१ (?) राजकीय निबंध

### एम्. एल्. दांतवाला

१ गांधीवादाचा फेरविचार

### एस्. एम्. जोशी

१ (?) राजकीय निबंध

२ उर्मि

### अनंतराव लिमये

१ दर्यापार

### कुसुमाग्रज

१ समीधा

२ परप्रकाश

३ ? (नाटक)

### प्रो. कामत

१ नवें शिक्षण

# मंदाकिनी

वि. स. खांडेकर

★

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | भावना | २५ |
| २ | खिडक्या | ३० |
| ३ | हिरवा रंग | ३५ |
| ४ | आभार | ४० |
| ५ | मित्र कसे असावेत ? | ४४ |
| ६ | अश्रु | ५२ |
| ७ | टालस्टॉयचीं पुस्तकें | ५७ |
| ८ | दुसऱ्या वर्गाचा प्रवास | ६२ |
| ९ | मृत्यु | ६८ |
| १० | विस्मृति | ७९ |
| ११ | मंदाकिनी | ८३ |


★

## वाळूंतून

क्र. ६६२० ६६७० शाखा (स्थळ प्रत)

नवा मनुष्य असो किंवा नवा वाङ्मयप्रकार असो, तीन अग्निदिव्यांतून पार पडल्याखेरीज त्याचें महत्त्व सिद्ध होत नाहीं, किंवा समाजाकडून त्याच्यावर शिक्कामोर्तबहि होत नाहीं. हीं तीन दिव्यें म्हणजे उपहास, उपेक्षा व टीका हीं होत. लोकप्रियतेचा मुकुट मिळविण्यापूर्वी चढाव्या लागणाऱ्या या तीन कांटेरी पायऱ्यांपैकीं दोन तरी मराठी लघुनिबंधानें मागें टाकल्या असें म्हणावयास हरकत नाहीं. भावगीतें लिहिणाऱ्या कवींची ' बिंदुस्रावी कवि ' म्हणून संभावना करणाऱ्या उथळ लोकांना त्याच कवींनीं त्या बिंदूंतून कीर्तिसिंधु निर्माण केल्याचें दृश्य पाहावें लागलें. या इतिहासाची पुनरावृत्ति आतां लघुनिबंधाच्या क्षेत्रांतहि होत आहे. लघुनिबंधाची लहान मूर्ति पाहून जुन्या प्रदीर्घ निबंधाच्या ज्या भक्तांनीं ' हा एक नवा पोरखेळ आहे झालं ! ' असे उद्गार दहा वर्षांपूर्वी काढले होते, त्यांना आजची लघुनिबंधाची लोकप्रियता पाहून ' बारशाच्या दिवशीं कुणाचेंहि वाईट भविष्य वर्तवूं नये ' या तत्त्वाची आतां चांगलीच प्रचीति येत असेल.

कुठल्याहि नव्या गोष्टीचा मोठा विजय म्हणजे जुन्या पिढीकडून होणारें तिचें स्वागत. टोपी आणि कॅस यांना जुन्या पिढीनें डोक्यावर बसविलें, म्हणून त्या गोष्टी समाजांत हां हां म्हणतां सर्रास रूढ झाल्या. आज पंचविशीच्या अलीकडे असलेले लेखक मोठ्या हौसेनें लघुनिबंध लिहीत आहेत, त्यांत कांहींच नवल नाहीं. पण साठी-सत्तरीच्या घरांत आलेले वामनराव जोशी व तात्यासाहेब केळकर यांच्यासारखे नामवंत साहित्यिकहि कळत न कळत या प्रकाराचा अवलंब करूं लागले आहेत, ही एकच गोष्ट मराठी लघुनिबंधाला उज्ज्वल भविष्य आहे हें सिद्ध करण्याला समर्थ आहे.

' कळत न कळत ' म्हणावयाचें कारण वामनराव जोशी यांचें ' स्मृति-लहरी ' हें पुस्तक. धोंडोपंत कर्वे या वामनरावांचा जिवश्चकंठश्च मित्राच्या संकलित आठवणी असें बाह्यतः या पुस्तकाचें स्वरूप आहे. पण या आठवणींत साध्यासुध्या विषयाचें आकर्षक वैचित्र्य, छोटेसें विषयसूत्र घेऊन विनोदमिश्र

विचार-विलासानें तें फुलवीत नेण्याचें कौशल्य, गोड गोष्टीवेल्हाळपणा इत्यादि लघुनिबंधाचे अनेक विशेष प्रतिबिंबित झाले आहेत.

लघुनिबंध मराठींत अधिक अधिक लोकप्रिय होत आहे याचें एक गमक म्हणून जोशी–केळकर यांच्या तशा पद्धतीच्या लिखाणाचा उल्लेख केला आहे. पण लोकप्रियता व उत्कट कला यांचें नेहमीं सख्य असतें असें थोडेंच आहे ? आज होतकरू व नामांकित अशा दोन्ही प्रकारच्या लेखकांकडून लघुनिबंधाच्या क्षेत्रांत विपुल निर्मिति होत असली तरी मनाला चटका लावून जाणारें किंवा सुंदर चित्राप्रमाणें अथवा मोहक सुगंधाप्रमाणें स्मृतीमध्यें दीर्घकाळ तरळणारें लेखन या क्षेत्रांत किती होत आहे ? या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां उच्च कसोटी लावून न्यायनिष्ठुरतेनें पाहिलें तर मन क्षणभर चपापल्यावांचून राहत नाहीं. होतकरू लेखकांचा सध्याचा कल लघुनिबंधाकडेच अधिक आहे असें म्हटलें तरी चालेल. पण वर्तमानपत्री लिखाण व आंधळें अनुकरण यांच्या कात्रींत सांपडल्यामुळें ललितलेखनाला आवश्यक असलेली सरसता त्यांच्या लिखाणांत अद्यापि कमी प्रमाणांत आढळते.

‘ वर्तमानपत्री लिखाण ’ हा शब्द मी वृत्तपत्रांविषयींच्या अनादरानें वापरलेला नाहीं. आजच्या संक्रमण–काळांत नि हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांत वृत्तपत्रें हेच जनतेचे डोळे आहेत याची मला पूर्ण जाणीव आहे. टिळक, आगरकर, शिवरामपंत परांजपे, खाडिलकर, केळकर, अच्युतराव कोल्हटकर, जावडेकर, गाडगीळ इत्यादि संपादकांचें राजकारणाचें ज्ञान, त्यांची देशहिताची तळमळ आणि त्यांनीं केलेली विचारजागृति यांना मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत अढळ स्थान आहे, याविषयीं मला मुळींच शंका वाटत नाहीं. त्यांच्यापैकीं कित्येकांची प्रतिभा अत्यंत उज्ज्वल असल्यामुळें वर्तमानपत्राच्या टिप्परघाईंतसुद्धां त्यांनीं केलेलें लेखन वाङ्मयगुणांच्या दृष्टीनें सरस वठलें आहे. पण वृत्तपत्रांतील लिखाण व वाङ्मयीन सौंदर्य यांचा नेहमीं मेळ पडतोच अगर पडलाच पाहिजे असें नाहीं. विचारांची तेजस्विता, भाषेचा सडेतोडपणा, लढवय्याची मनोवृत्ति इत्यादि गुणांचें वृत्तपत्रलेखनांत अधिक महत्त्व आहे. भाषेचें सौंदर्य, कल्पनेचा विलास, आणि कलेचा नाजुकपणा इत्यादि ललित वाङ्मयाच्या विशेषांना वृत्तपत्रांच्या धकाधकीच्या मामल्यांत स्थान नाहीं असें नाहीं. पण तें केव्हांहि दुय्यमच राहणार. वर्तमानपत्राचें लेखन हें शंकराचें तांडवनृत्य मानलें तर

ललितलेखन हें भिल्लिणीचा वेष घेऊन आपल्या विभ्रमानें चराचराला मोहिनी घालणाऱ्या पार्वतीचें नाजूक नृत्य आहे.

गेलीं साठ वर्षें मराठी वाङ्मयांतलीं हीं दोन्हीं क्षेत्रें आपापल्यापरी समृद्ध होत आहेत. पण अलीकडे वृत्तपत्रांचा व्याप झपाट्यानें वाढला आहे. कुठलाहि व्याप वाढला कीं त्याला सहजासहजीं व्यापाराचें स्वरूप येतें. मग विविध मनोवृत्तींच्या हजारों वाचकांना खूष करण्याकरितां आणि प्रसंगीं भरताड हवी म्हणून चांगल्या वृत्तपत्रांनासुद्धां हरतऱ्हेचें लिखाण बाहेरून मिळवावें लागतें यांत नवल कसलें ? हें लिखाण बहुधा होतकरू लेखकांकडून लिहिलें जातें. झटपट प्रसिद्धीची सोय झाल्यामुळें हे लेखक जें ललितलेखन करतात तें अनेकदां सामान्य व बहुधा अनुकरणात्मक असतें. उत्कृष्ट ललितलेखनाचा उगम ज्या मनोवृत्तींतून होतो ती अनुभूति, कल्पकता व तपस्या यांच्या त्रिवेणी संगमांतून निर्माण झालेली असते. पण होतकरू लेखकांची कल्पकता कलिकावस्थेंत असते. लहान वयामुळें त्यांच्या अनुभवांना आपोआपच मर्यादा पडलेल्या असतात. आणि लिहिणें व छापून येणें यांच्यामध्यें फारसे अडथळे नसल्यामुळें त्यांच्या तपस्येची मजलहि ठराविक वाचनापलीकडे जात नाहीं. मी ज्या ललितलेखनाला ' वर्तमानपत्री लिखाण ' म्हटलें तें अशा परिस्थितींत जन्माला येतें.

असल्या लिखाणांत सध्यां लघुनिबंधांची संख्या बरीच असते. बहुतेक साप्ताहिकें आणि अनेक मासिकें यांचा लघुनिबंध हा एक मोठा आधार आहे असें म्हटलें तरी चालेल. पण कुसुमावती देशपांडे या प्रामुख्यानें लघुनिबंधलेखन करीत नसूनहि ' दीपदान '—मधील ' मध्यान्ह ' व ' मध्यरात्र ' या त्यांच्या लघुनिबंधांत जें अवर्णनीय सौंदर्य आहे, त्याच्या पुसट छटासुद्धां हुकुमेहुकूम लिहिल्या जाणाऱ्या या लिखाणांत आढळून येत नाहींत.

याचें कारण एकच आहे. लेखकाचें व्यक्तित्व सरस कल्पनेनें किंवा अभिनव संवेदनेनें फुलून आलें कीं त्यांतून आपोआप लघुनिबंध निर्माण होतो. फुललेलें पारिजातकाचें झाड क्षणभर हलविलें तर फुलांचा सडा पडतो. पण झाड फुललेलें नसेल, तर तें घटकाभर हलविलें तरी वाळलेल्या पानांखेरीज पदरांत उलट काय पडणार ? लघुनिबंधलेखनहि असेंच आहे. कुठें तरी वाचनांत आलेल्या गोष्टी हरिदासी पद्धतीनें सांगून किंवा माहितीचा फाफटपसारा वाचकांपुढें मांडून अथवा एखाद्या सिद्धांताचें शास्त्रोक्त खंडनमंडन करून लघुनिबंध निर्माण होत

नाहीं. अशा निबंधांत लेखकाच्या पुस्तकी विद्वत्तेपेक्षां त्याच्या अंतरंगीच्या रसिकतेलाच अधिक अवसर असतो, शास्त्रज्ञानापेक्षां त्याच्या जिव्हाळ्याचेंच मोल अधिक मानलें जातें ! वाचकाचा गुरु होण्यापेक्षां त्याचा मित्र-छे: ! त्याचा दोस्त होण्यांतच त्याच्या यशाची गुरु-किल्ली असते. ही विशिष्ट मनोवृत्ति ( Mood ) साध्य झाली कीं मग लेखक कुठल्या विषयांवर लिहीत आहे अथवा कुठल्या पद्धतीनें लिहीत आहे हा प्रश्न उरत नाहीं. त्या लिखाणाला सरस लघुनिबंधाचें स्वरूप आपोआप प्राप्त होतें उदाहरणार्थ, ए. पी. हरबर्ट यानें 'चित्रकला' या आपल्या निबंधाचा आरंभच किती मजेदार केला आहे पहा--

'स्नानगृहांत प्रत्येक मनुष्य गवई होतो असें म्हणतात, यांत नवल असें कांहींच नाहीं. गायनकलेइतकी सोपी चीज नाहीं जगांत ! चित्रकला मात्र त्या मानानें फार अवघड आहे हं ! अगदीं अनुभवानें सांगतों मी. चित्रकलेच्या उपासनेंत माझा बराच वेळ खर्च झाला आहे. मला किती तरी कमिट्यांच्या सभांना हजर राहावें लागतें. याशिवाय सार्वजनिक सभा असतात त्या निराळ्याच ! आतां तुम्हींच सांगा, अशा ठिकाणीं लांबलचक भाषणें सुरू झाल्यावर चित्रकलेशिवाय दुसऱ्या कुठल्या कलेची उपासना करणें मनुष्याला शक्य आहे ? भाषण सुरू असतांना मी गायला लागलों तर लोक माझी वेड्यांत गणना करतील ! म्हणून अशा वेळीं मी आपला स्वस्थपणें चित्रें काढीत बसतो. मी या कलेंत अजून निष्णात झालों आहे असें कांहीं मी म्हणत नाहीं. पण आणखी थोडीफार सभा संमेलनें पार पडलीं कीं, चित्रकलेंत मी तज्ज्ञ होइन याविषयीं मला मुळींच संशय वाटत नाहीं !'

सभा-संमेलनांच्या कंटाळवाण्या कार्यक्रमावर मारलेला हा गमतीदार फटकारा कुणाला आवडणार नाहीं !—फटकारा खरा ! पण तो गोंडेदार चाबकाचा आहे, नाहीं ?

विनोदाप्रमाणें विचाराच्या नावीन्यानेंही लघुनिबंधाला कशी रंगत येते हें पाहायचें असेल तर रिचर्ड किंगच्या कुठल्याही संग्रहाचें कुठलेंही पान उघडावें. विचारप्रवणता हाच त्याचा मनोधर्म आहे. थंडीच्या दिवसांत पहाटे जिकडे तिकडे दंव पडलेलें दिसून येतें ना ? तशीं त्याची विचारमौक्तिकें वाटतात. त्यांच्यांत दंवबिंदूंची मोहकता आहे, पण क्षणभंगुरता मात्र नाहीं. कुठलाही

विषय असो, त्यानें प्रकट केलेल्या विचारसरणींत वाचकाला आपलेपणा व आकर्षकता यांचा संगम आढळल्यावांचून राहत नाहीं.

त्यानें मैत्रीची प्रीतीशीं केलेली तुलना किती मार्मिक आहे पहा—' मैत्री व प्रीति यांना तीन अवस्थांतून जावें लागतें. पहिली अवस्था उन्मादाची ! मग ती संपली आणि सिंहावलोकन म्हणून मनुष्य तिच्याकडे पाहूं लागला कीं समाधानाचा सुस्कारा त्याच्या तोंडून निघाल्याशिवाय राहत नाहीं !

दुसरी अवस्था निराशेची ! अपेक्षा आणि वस्तुस्थिति यांच्यांतल्या अंतराची या वेळीं मनाला तीव्र जाणीव होते.

तिसरी अवस्था शांत आणि सुखी अशा स्थितप्रज्ञतेची ! या वेळीं आपल्या वेलीवरच्या फुलांची आणि कांट्यांची माणसाला पूर्ण कल्पना येते. कांट्यांच्या टोचणींपेक्षां फुलाचा सुवास अधिक आहे याची त्याला खात्री पटलेली असते. आणि आपल्यांत अनेक दोष असूनहि लोक आपल्यावर प्रेम करीत आहेत ही गोड जाणीव त्याच्या मनाला अतिशय सुखदायक होऊं लागते. '

लिंड, मिल्ने, बेलाक, गार्डिनर इत्यादि प्रसिद्ध इंग्लिश लघुनिबंधकारांचे लघुनिबंध सहज चाळून पाहावेत. प्रत्येकाचें असेंच कांहीं तरी आकर्षक वैशिष्ट्य मनाला प्रतीत होतें आणि त्या वैशिष्ट्याचा आत्मा त्या त्या लेखकाच्या विकसित व्यक्तित्वांतून निर्माण झाला आहे, याचीहि आपणाला चटकन् जाणीव होते.

स्वतःच्या अशा वैशिष्ट्याची कलात्मक रीतीनें वाढ करणें हेंच आजच्या व उद्यांच्या मराठी लघुनिबंधकारांचें ध्येय असलें पाहिजे. फडके आणि काणेकर इतर लघुनिबंधकारांपेक्षां अधिक लोकप्रिय आहेत याचें मर्म तरी दुसरें काय आहे ? त्यांचे व्यक्तिविशेष त्यांच्या लघुनिबंधांतून इतरांपेक्षां अधिक कलात्मक रीतीनें किंवा अधिक जिव्हाळ्यानें प्रकट होतात हेंच !

अशा या अभिनव आकर्षक वाङ्मयप्रकारावर कुणी कांहीं तात्त्विक आक्षेप घेईल अशी माझी कल्पना नव्हती ! पण माझा ' अविनाश ' प्रसिद्ध झाल्यावर एका सुप्रसिद्ध लेखकांनीं मला लिहिलें–' तुम्हीं म्हणतां बाह्यतः रुक्ष दिसणाऱ्या लौकिक जीवनाच्या अगदीं लहान लहान भागांतहि सौंदर्य, विनोद, कारुण्य व तत्वज्ञान यांचे सुवर्णकण सांपडतात. हे विविध कण वेंचून जीवनाची संपन्नता मनुष्याला पटविणें आणि जगांत नीरस असें कांहीं नाहीं याची त्याला

जाणीव करून देणें हें लघुनिबंधलेखकाचें मुख्य कार्य आहे. पण मला वाटतें, लघुनिबंध लिहिणारे लेखक लोकांचें नुकसान करीत आहेत. जीवनांतल्या लहान-सहान सुखावर खूष असणारे अल्पसंतुष्ट लोक आपल्या देशाला नकोत! राष्ट्रांत असंतुष्ट लोक हवेत! अल्पसंतुष्टांच्या हातून कधींच प्रगति होत नाहीं!'

त्यांचें हें विधान वाचून क्षणभर माझा मलाच राग आला. दारिद्र्याच्या आणि गुलामगिरीच्या चिखलांत रुतलेल्या देशाच्या प्रगतीचा गाडा पुढें जावा म्हणून आपण कांहींच करीत नाहीं, ही रुखरुख माझ्या मनाला मधून मधून लागत असतेच. पण देशाच्या प्रगतीचा गाडा आपण मागें नेत आहों ही नवी जाणीव या पत्रानें मला झाली. माझ्या मनांत आलें-सत्कृत्य करणें ही कठिण गोष्ट असेल, पण आपल्या हातून दुष्कृत्य होणार नाहीं, एवढी काळजी तरी सामान्य मनुष्यानें घ्यायला नको काय? जखम धुवून तिला योग्य प्रकारची मलमपट्टी लावायला डॉक्टरची जरूरी असली तरी तिच्यांत मीठ घालूं नये एवढें तरी तज्ज्ञ नसलेल्या मनुष्यालासुद्धां समजलेंच पाहिजे.

छेः! लघुनिबंध लिहिण्याचें महत्पाप आपण केलें नसतें तर फार बरें झालें असतें! आपण राष्ट्राच्या प्रगतीला नकळत खीळ घातली, लोकांना अल्पसंतुष्ट करून एक प्रकारचा देशद्रोह केला. आपलें सरकार परकी आहे म्हणून आपला हा गुन्हा पचून गेला. आज स्वतंत्र राष्ट्रीय सरकार असतें तर 'जीवनांत नीरस असें कांहींच नाहीं' याची जाणीव लोकांना करून दिल्याबद्दल आम्हां साऱ्या लघुनिबंध-लेखकांना काळें पाणी पाहावें लागलें असतें!

एका क्षणांत असले कितीतरी विचार माझ्या मनांत येऊन गेले. पण दुसऱ्याच क्षणीं मला माझ्या स्नेह्यांच्या त्या पत्राचें हंसूं आलें. तसा विचार केला तर लघुनिबंधाच्या बाबतींतला त्यांचा हा दृष्टिकोन जुनाच आहे. मराठी कविता राष्ट्रीय नाहीं म्हणून नामवंत टीकाकारांनीं पूर्वी काय कमी हांकाटी केली होती? त्या टीकेचाच हा नवा अवतार आहे.

ललितवाङ्मय हें राष्ट्रजीवनापासून अलिप्त राहूं शकत नाहीं हें मलाहि मान्य आहे. पण राष्ट्राच्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखला आहेत म्हणून वाङ्मयांत इथून तिथून सर्वत्र त्यांचा खळखळाटच ऐकूं आला पाहिजे, समाजांतल्या दलित वर्गाच्या पोटांत आज भुकेची आग भडकली आहे म्हणून तिच्या

ज्वाळाच प्रत्येक ललितकृतींत दिसल्या पाहिजेत, असा हट्ट धरणें बरोबर होईल काय? राष्ट्रीय आंदोलनें आणि सामाजिक चळवळी यांचीं प्रतिबिंबें ललितवाङ्मयांत अवश्य पडावींत! पारतंत्र्य, विषमता, दारिद्र्य आणि अज्ञान यांच्या मगरमिठींत सांपडलेल्या समाजाच्या धडपडीचें आणि तडफडीचें आपल्या लेखणीनें चित्रण करणारे कलाकार जेवढे निर्माण होतील तेवढे मराठी वाङ्मयाला हवेच आहेत. असंतोषाचा जो ज्वालामुखी आज सामाजिक मनांत धुमसत आहे त्याचा स्फोट करणाऱ्या लेखकांना उद्यांचा समाज डोक्यावर घेऊन नाचेल यांतही तिळमात्र शंका नाहीं.

मात्र यापुढें कलावंतांनीं केवळ आत्मनिष्ठ राहून चालायचें नाहीं, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असली तरी वैयक्तिक संवेदनक्षमता हा ललितवाङ्मयाच्या निर्मितीचा एक महत्त्वाचा भाग आहे व तो तसाच राहील, हें विसरून काव्य किंवा लघुनिबंध यांच्यासारख्या व्यक्तिनिष्ठ वाङ्मयप्रकारावर आक्षेप घेण्यांत काय अर्थ आहे? यशवंतांनीं ‘ आई ’ ऐवजीं ‘ हिंदभूमि ’ ही कविता लिहिणें जरूर होतें असें म्हणणाऱ्या रसिकांचें समाधान ब्रह्मदेवसुद्धां करूं शकणार नाहीं. राष्ट्रीय भावनांनीं रसरसलेलें वाङ्मय आज आपल्याला हवें असलें तरी ज्यांत राष्ट्रीय भावनांचा आविष्कार नाहीं तें वाङ्मयच नव्हे अथवा असलें वाङ्मय राष्ट्राच्या प्रगतीला मारक आहे असें म्हणणारे लोक वाङ्मयीन मूल्यें व सामाजिक मूल्यें यांचा विलक्षण घोटाळा करीत आहेत. विचारासाठीं एक साधें उदाहरण या आक्षेपकांपुढें मीं ठेवतों.

१९२०-२१ सालाच्या आसपास गांधीजींच्या चळवळीमुळें राष्ट्रीय कवितांना विलक्षण भर आला होता. काव्याच्या या विभागाला त्या वेळीं अगदीं कुंभमेळ्याचें स्वरूप प्राप्त झालें होतें. तिवारी यांचीं ‘ मराठ्यांचीं संग्राम-गीतें ’ याच काळांत जन्माला आलीं व लोकप्रिय झालीं. पण आज तिवारींचीं हीं संग्रामगीतें व त्याच काळांत निर्माण झालेलीं तांब्यांचीं विविध गीतें यांची तुलना केली तर दुसरींच अधिक आकर्षक वाटतात—अभिजात वाङ्मयांत त्यांचीच गणना होईल.

याचा अर्थ एकच आहे—उत्कृष्ट राष्ट्रीय वाङ्मय केवळ भोंवतालच्या क्षुब्ध वातावरणांतून उत्पन्न होत नाहीं. त्या वातावरणाशीं समरस होऊं शकणाऱ्या श्रेष्ठ प्रतिभेच्या पोटींच त्याचा जन्म होतो. शिवरामपंत परांजप्यांच्या मनोवृत्तीचा

लेखक आज असता तर त्यानें लघुनिबंधासारख्या नव्या वाङ्मयप्रकाराचा आश्रय करूनहि राष्ट्रीय भावनांचे निखारे फुलविले असते. उगीच कल्पनातरंग तरी कशाला हवेत? काणेकरांच्या लघुनिबंधांत समाजवादाचा पुरस्कार स्पष्टपणें दिसतोच कीं नाहीं?

पण लघुनिबंधावरल्या माझ्या स्नेह्यांच्या आक्षेपांतला खरा महत्त्वाचा भाग यापुढेंच आहे. लघुनिबंधलेखक लहानसहान दृश्यांतली किंवा अनुभवांतली सरलता प्रगट करून दाखवितो व त्यामुळें चालू जीवनक्रमाविषयीं वाचकांच्या मनांत धुमसूं लागलेला असंतोष जागच्या जागीं विझून जातो अशी त्यांची तक्रार आहे.

त्यांच्या या तक्रारींत समजुतीचा बराच घोंटाळा आहे. सामाजिक परिस्थिती-विषयींचा असंतोष उत्पन्न व्हायला अथवा टिकून राहायला मनुष्याचें वैयक्तिक जीवनहि अपूर्ण वा असंतुष्ट असलेंच पाहिजे हें कुठल्या मुलखांतलें तर्कशास्त्र? अष्टौप्रहर देशकल्याणाचा विचार करणाऱ्या महात्माजींना प्रवासाहून आपल्या आश्रमाकडे परत येतांना जो आनंद होत असेल, त्यांतून चतुर लेखक 'घर' या विषयावर सुंदर लघुनिबंध निर्माण करूं शकेल. ग्रामोद्धार करण्याकरितां खेड्यांत आलेल्या एकाद्या समाजसेवकानें चोवीस तास मनांतल्या मनांत धुसमुसत राहिलें पाहिजे अथवा सुतकी चेहरा धारण करून दीन, दुःखी नि दलित अशा लोकांविषयीं सहानुभूतीचे उद्गार काढीतच राहिलें पाहिजे असें थोडेंच आहे? आपलें सेवेचें कार्य निष्ठेनें आणि चिकाटीनें पार पाडतां यावें म्हणून भोंवतालच्या लहानसहान गोष्टींतून जें सौंदर्य पाझरत असतें, त्याचा आस्वाद घेण्याची शक्ति त्याच्या अंगीं असणेंच अधिक इष्ट ठरेल. वाऱ्याच्या झुळुकीनें सळसळणारा पिंपळ, ऐन दुपारींहि चाललेली पांखरांची किलबिल मांजराच्या पिलाचे साधेसुधे खेळ, खेडेगांवच्या हीनदीन स्थितींतहि दिसून येणारीं वात्सल्याचीं आणि विरश्रीचीं दृश्यें हीं सर्व त्याच्या तेथल्या जीवनाला पोषकच ठरतील.

लघुनिबंधाचें वाङ्मयांतील कार्यहि असेंच आहे. रोजच्या जीवनकलहांत आपण जीवनांतलें काव्य विसरून जातों. नियतीच्या कर्कश कोलाहलामध्यें निसर्गाचें कोमल कूजन आपल्याला ऐकूंच येत नाहीं. मध्याह्नकाळच्या काहिलींत पोळून निघतांना मध्यरात्रीची शांतता आपणां सर्वांना स्वप्नवत् वाटते. पण

सामान्य मनाला न जाणवणारीं हीं सौंदर्ये लघुनिबंधकार मोठ्या कुशलतेनें गोळा करून जीवनांतल्या चिमण्या पण अविनाशी आनंदाशीं त्याची ओळख करून देतो. हा आनंद सामाजिक असंतोषाच्या आड येतो, असें म्हणणें म्हणजे विश्रांतीच्या वेळीं शिपाई स्वतःशीं गुणगुणत असलेली लावणी त्याच्या पराक्रमाला मारक होते, असें म्हणण्यासारखेंच आहे. खालील उताऱ्यांतील सत्य ज्यांना पटलें आहे त्यांना मराठी लघुनिबंधाची सध्यां होणारी वाढ चुकीच्या दिशेनें होत आहे असें मुळींच वाटणार नाहीं.

What the heart and soul are aiming after instinctively is the discovery that in the everyday of prose there is some one who robs the world of its loneliness, makes our efforts seem worthwhile, gives poetry to the matter-of-bad curriculum by which we gain a wider knowledge of the due meaning of life.

शिरोडें
१३-५-१९४२

वि. स. खांडेकर

# पुन्हां चार पावलें

कुठल्याही पुस्तकाच्या आवृत्तीच्या निमित्तानें लेखक तें जेव्हां पुन्हां चाळूं लागतो तेव्हां त्याचें मन विविध विचारांनीं गोंधळून जातें. एखादें पान वाचून वाटतें—इतकें सुंदर आपण कसें लिहूं शकलों देव जाणे ! आणि दुसरें एखादें पान वाचून स्वतःचा असा राग येतो म्हणतां—

लेखकाच्या मनाचा असला गोंधळ हा लघुनिबंधांचा एक चांगला विषय होऊं शकेल. म्हणून इथें त्याचें चित्रण करण्याचा मोह आवरून लघुनिबंधकार या नात्यानें मला जो एक प्रश्न हल्लीं वारंवार विचारण्यांत येतो त्याचाच या प्रास्ताविक दोन शब्दांत परामर्श घेतों.

माझ्या पहिल्या तीन लघुनिबंधसंग्रहांचीं नांवें 'वायुलहरी' 'चांदण्यांत' व 'सायंकाल' अशीं आहेत. चंद्र, चांदण्या, फुलें, कोकिळा, वगैरे वगैरे काव्य-मय मालाचा मराठी वाङ्मयांतला मी एकमेव विक्रेता आहें, अशी अनेकांची समजूत असल्यामुळें माझ्या पुढच्या संग्रहांचीं नांवेंही याच पद्धतीचीं असणार असा त्यांनीं आपला ग्रह करून घेतला होता. पण माझ्या पुढल्या तीन संग्र-हांचीं नांवें 'अविनाश' 'मंदाकिनी' आणि 'कल्पलता' अशीं ठेवून मी त्यांना चांगलेंच चकविलें. लगेच ते म्हणूं लागले, 'खांडेकरांची प्रतिभा निस्तेज झाल्याचा पुरावा पाहिलात हा ! अहो, मुलं आणि पुस्तकं यांना निरनिराळीं नावं देण्याइतकं सुद्धां या गृहस्थापाशीं भांडवल शिल्लक राहिलेलं दिसत नाहीं.' महाभारतकाळीं लघुनिबंध नव्हता हें माझें भाग्य ! नाहींतर दुर्योधन, दुःशासन अशीं शंभर नांवें आपल्या संग्रहांना देऊन धृतराष्ट्र हा खांडेकरापेक्षां फार श्रेष्ठ लघुनिबंधकार होऊं शकला असता, असें संशोधन करायलासुद्धां या मंडळींनीं कमी केलें नसतें.

असल्या आक्षेपकांचें समाधान होईल या आशेनें नव्हे, तर लेखक आपल्या पुस्तकाचें नामकरण कसें करतो हें सर्वसामान्य वाचकाचें कुतूहल अंशतः तृप्त करावें म्हणून माझ्या लघुनिबंधसंग्रहांचीं नांवें कशीं जन्माला आलीं तें सांगतों.

लघुनिबंधांत काव्य, विनोद व चिंतन यांचा जो संमिश्र पण मधुर विलास असावा लागतो त्याचें दर्शन मला आयुष्यांत दोनच ठिकाणीं उत्कटत्वानें झालें आहे—निसर्गाच्या सौंदर्यांत आणि बालकांच्या लीलांत. माझ्या पहिल्या दोन

संग्रहांतले लघुनिबंध मी शिरोड्याला असतांना लिहिले. तिसऱ्या संग्रहांतल्या लघुनिबंधांच्या बहुतेक कल्पनाही त्याचवेळीं मला सुचल्या. या पद्धतीच्या लिखाणामुळें मला होणारा विशिष्ट प्रकारचा आनंद त्या वेळच्या निसर्गाच्या ज्या ज्या रम्य विलासांत मला अविस्मरणीय रीतीनें प्रतीत झाला, त्याचें त्याचें नांव मी माझ्या संग्रहाला दिलें.

शिरोड्याला शाळेचें काम संपवून दमून भागून परत आल्यावर विश्रांतिकरतां मी घरासमोरच्या टेकडीवर अनेकदां जाऊन बसत असे. तिथें समुद्रावरून येणाऱ्या गार वाऱ्याच्या झुळुका माझें शरीर आणि मन इतक्या थोड्या वेळांत प्रसन्न करीत कीं, सृष्टीच्या या जादुगिरीचें मला राहून राहून नवल वाटे. त्या कोमल, शीतल वायुलहरी डोळ्यांना कधींच दिसत नसत. उत्तररामचरितांत सीता अदृश्य राहून मूर्च्छित रामचंद्राला आपल्या स्पर्शानें सावध करते असें दृश्य आहे ना ? या झुळकाही मला तशाच वाटत. अंगाला गोड स्पर्श केला न केला तोंच त्या पुढें धावून जात. माझ्या मनांत येई— जणुं कांहीं त्या लंडावानें खेळत आहेत आणि माझ्यावर राज्य आलें असल्यामुळें मला शिवून डाव जिंकल्याच्या आनंदानें नाचत नाचत दूर जात आहेत. त्या लहरींच्या क्षणिक स्पर्शांत केवढा गारवा, केवढा उल्हास आणि केवढी शान्ती भरलेली असे ! क्षितिजापर्यंत पसरलेल्या समोरच्या सोनेरी सागरावरल्या लहरींची नाजुक रुमझुम या झुळकांच्या तरंगातरंगांतून मला ऐकूं येई. सागर–तीरावरून रमत गमत येत असतांना वेलींचा जो विविध सुगंध त्यांच्याशीं गुजगोष्टी करीत येई तोही मला मोठा मोहक वाटे. आणि मग गोड गुदगुल्या करून निघून जाणाऱ्या या मृदुमधुर झुळकांच्या विषयीं कितीतरी वेळ मी विचार करीत राहीं. मी स्वतःशींच म्हणे—कुठं बरं जात असतील या वायुलहरी ? कोणीकडून आणि कोणीकडे हें कोडें माणसाला अजून सुटत नाहीं. म्हणून तो स्वतःपासून दूर पळत आहे, जगांतल्या प्रत्येक मृगजळामागे धावून दुःखी होत आहे. पण—या वायुलहरी तर सदैव हंसत नाचत जात असतात. माणसांना न सुटलेलें जीवनाचें कोडें त्यांना सुटलें असेल काय ?

या प्रश्नाचें उत्तर मला कधींच मिळालें नाहीं ! मात्र खेळकर लघुनिबंधांतही तत्त्वचिंतनाचा प्रवेश कसा होतो याची पुरेपूर कल्पना या दैनंदिन अनुभवांत मला हटकून येई.

'चांदण्यांत' व 'सायंकाल' यांच्या नांवामागेंही असाच इतिहास आहे.

स्वभावानें मी निशाचर नाहीं. पण चंद्रानें अनेकवेळीं अपरात्रीं घरांतून स्नेह-भावानें मला बाहेर ओढून आणलें आहे. अंगणांत, टेकडीवर, समुद्राच्या वाळ-वंटांत आणि माडांच्या रायांत प्रहर प्रहर भान विसरून मी चांदण्याची मौज लुटली आहे. अजूनही मला वाटतें—चांदणें हें सृष्टीला पडणारें सर्वांत सुंदर स्वप्न आहे. छे! तें नुसतें स्वप्न नाहीं; अनेक स्वप्नांचा संगम आहे तो! ज्या स्वप्नांत प्रियकर प्रेयसीचें पहिलें चुंबन घेतो ज्या स्वप्नांत दुर्दैवानें वैधव्य प्राप्त झालेल्या रमणीला आपल्या वल्लभाचा सहवास लाभतो, ज्या स्वप्नांत काट्याकुट्यांनीं भरलेल्या रानांवनांतल्या दगडाची उशी करून क्षणभर विश्रांती घेणाऱ्या देशभक्ताला आपली मातृभूमी स्वातंत्र्याच्या शिखरावर विराजमान झालेली दिसते, ज्या स्वप्नांत सर्व शारीरिक शृंखला तोडून आत्मा आपलीं हरपलीं ध्येयें धुंडाळूं लागतो, अशा बहुविध स्वप्नांचा—उदात्त आणि उन्मादक, रम्य आणि भव्य, मोहक आणि दाहक अशा सर्व स्वप्नांचा—चांदण्यांत मोठा मनोहर मिलाफ झालेला असतो. दिवसा मनाच्या पिंजऱ्यांत कोंडून पडलेलीं पांखरें—प्रीतीचीं, भक्तीचीं, आकांक्षांचीं आणि ध्येयाचीं सर्व लहानमोठीं पांखरें—चांदण्यांत बंधमुक्त होतात, स्वैरसंचार करूं लागतात आणि निर्माल्याप्रमाणें दिसणाऱ्या जगाच्या मुखावर ओघळलेल्या आसवांचें आपल्या पंखांच्या स्पर्शानें पहांटेच्या दंवबिंदूंत रूपान्तर करून तीं त्या दग्ध पुष्पसखींना पुन्हां मुग्ध कलिकांचें मनोहर रूप प्राप्त करून देतात.

सायंकालांत चांदण्याची ही अद्भुतरम्यता नाहीं, असें प्रथमदर्शनीं वाटतें. कारकून कचेऱ्यांतून घराकडे मंदगतीनें परत येत आहेत आणि कावळे कावकाव करीत घरट्याकडे उडत जात आहेत, चेहऱ्यांची रंगरंगोटी करून खुशालचेंडू जोडपीं फिरायला निघालीं आहेत आणि पश्चिमदिशाही या युगुलांचें अनुकरण करण्याकरतांच कीं काय विविध प्रसाधनांचा पसारा मांडून वेषभूषा करीत बसली आहे, रस्त्यावरले एकूण एक दिवे पटापट चमकूं लागले असतांना आकाशांत मात्र एक एक चांदणी हळूहळू उगवून स्वर्गातल्या म्युनिसिपालिटीचा कारभार किती बेबंदशाहीचा आहे याचें प्रदर्शन मांडीत आहे—असें कांहींतरी लिहिलें म्हणजे संध्याकाळचें सर्वसामान्य वर्णन झालें अशी अनेकांची समजूत आहे.

ग्रा. क्र. ...

पण संध्याकाळीं पश्चिमेकडे अद्भुत रंगांनीं नटलेल्या नयनमनोहर चित्राचें जें मोहक प्रदर्शन भरतें तें विलक्षण प्रेक्षणीय असतें. विशेषतः पावसाळा संपत आला म्हणजे या रंगांची क्षणोक्षणीं जी खुलावट होऊं लागते-वर्षानुवर्षें अंधार पडेपर्यंत समुद्रतीरावर बसून मी या रंगांचें आकंठ पान केलें आहे. आपल्याला चित्रकला साध्य नाहीं याचें कधींकाळीं अत्यंत तीव्रतेनें जर मला वैषम्य वाटलें असेल तर तें मन धुंद करून सोडणारें हे सायंकाल पाहतांनाच. कवितेला सोडचिठ्ठी दिल्यानंतर सुद्धां असल्या एखाद्या सुरम्य सायंकाळीं माझ्या मनांत कांहीं काव्यपंक्ति आपोआप झुळझुळूं लागत आणि दिव्याभोंवतीं पिंगा घालणाऱ्या चिमुकल्या पांखरांप्रमाणें समोरच्या दिव्य तेजाभोंवतीं माझ्या कल्पना भिरभिरूं लागत. क्षणभर वाटे, या विशाल सागराच्या पलीकडे अप्सरांचें नृत्यमंदिर आहे. या मंदिरांत नंदनवनांतल्या चित्रविचित्र वृक्षवेलींपासून विणलेले गालिचे पसरले आहेत. या गालिच्यांवर त्या सुंदर तन्वंगी नाचत आहेत आणि त्यांच्या पदतलांना लावलेला अळत्याचा रंग वाळला नसल्यामुळें मधूनच तो या गालिच्यांवर मुद्रांकित होत आहे. लगेच मनांत येई, ही गंधर्वांची मैफल आहे. आपल्या समोरचा प्रत्येक रंग हा एक एक आळविला जाणारा मधुर राग आहे. हें विविध रंगांचें मिश्रण-मिश्र राग किती आकर्षक होऊं शकतात याचें प्रात्यक्षिकच आहे हें. हें स्वर्गीय संगीत ऐकण्याचें भाग्य मानवाला कधींतरी लाभेल का? त्याला तें ऐकूं येऊं लागलें तर--

तर 'स्वर्ग' 'स्वर्ग' म्हणून एखाद्या काल्पनिक जगाच्या मागें तो धांवत सुटणार नाहीं किंवा ज्यांचा आनंद क्षणिक असतो अशा भोगांना चिकटून राहण्याची लालसा तो धरणार नाहीं.

धांवत धांवत तिसरी गोड कल्पना माझ्यासमोर उभी राही!

अशा किती कल्पना सांगायच्या? राहून राहून मला वाटे-बाणभट्टानें अच्छोद सरोवराचें रम्य वर्णन करण्यांत आपल्या कल्पकतेचें जें रत्नभांडार उधळलें आहे तें अशा एखाद्या सायंकालाचें चित्रण करण्याच्या कामीं खर्च करण्याची लहर त्याला आली असती तर किती बरें झालें असतें!

मात्र मी सायंकालाचा भक्त झालों तो कांहीं केवळ त्याच्यांतल्या या काव्यामुळें नाहीं. सौंदर्यलोलुप राहूनही मनुष्य अंतर्मुख होऊं शकतो याची स्पष्ट प्रचीति सायंकालाच्या सान्निध्यांत अनेकदां मला आली आहे.

वाळवंटांत पडलेल्या एखाद्या होडीच्या आडोशाला बसून पश्चिम क्षितिजावरच्या रंगांचे बदल पाहतां पाहतां मला माझ्या आयुष्यांतली लहानमोठीं स्थित्यंतरें आठवत. अमक्या वेळीं आपण असें वागायला नको होतें, तमक्या प्रसंगीं आपण उगीच चिडलों, अशा नाजुक परीच्या हें सिंहावलोकन करीत असतांना माझ्या मनाला टोचूं लागत. आत्मनिष्ठा हा जीवनाचा गाभा असला तरी आत्मपरीक्षणाशिवाय माणसाची जीवनदृष्टि अविकृत राहणें शक्य नाहीं, ही जाणीव प्रकाश आणि अंधार यांच्या पवित्र संगमावरच मला झाली. शिरोड्याच्य समुद्रतीरावरल्या त्या अगणित् सायंकालांनीं मला माझ्या स्वभावाचा टीकाकार केलें. स्वतःकडे परक्याच्या दृष्टीनें पहायला त्यांनीं मला शिकविलें. विविध व्यापतापांनीं भरलेला माझा त्यावेळचा आयुष्यक्रम नकळत अधिक बहिर्मुख आणि अधिक उथळ होण्याचा संभव होता. पण अनंत सागराच्या आणि असीम आकाशाच्या सान्निध्यांत मधून मधून शांत चिंतन करण्याची संधि या काव्यपूर्ण सायंकालांनींच मला दिली. या चिंतनानें माझ्या अनेक अवगुणांना आळा घातला.

निसर्गाच्या सौंदर्याप्रमाणें वात्सल्यानेंही मला जीवनाचें असेंच सर्वस्पर्शी दर्शन करून दिलें आहे. आणि तें तरी किती मौजेनें! अगदीं हांसत खेळत. वात्सल्य हा किंडर गार्डन पद्धतीनें शिकविणारा शिक्षकच आहे म्हणाना! मुलांची आवड हा माझ्या स्वभावाचा जन्मजात भाग असला तरी या आवडीला स्वच्छंदानें विहार करतां आला तो 'अविनाश'च्या जन्मापासूनच. लहान मुलांच्या खोड्या आणि हट्ट प्रसंगीं अत्यंत तापदायक होतात हा गेल्या तपांतला अनुभव लक्षांत असूनही आजसुद्धां मला वाटतें-- ज्या घरांत लहान मूल आहे तिथेंच गोकुळांतला आनंद मूर्तिमंत नाचत असतो. जिथें जिथें पायांतल्या वाळ्यांची नाजुक छुमछुम आणि लाडक्या व बोबड्या बोलांची अखंड चिवचिव ऐकूं येत आहे तिथें तिथें जगांतलें सर्व मधुर संगीत स्वच्छंदानें आलाप घेत आहे. लहान मुलें खोटें खोटें खेळतात ना? त्यांच्या या लुटुपुटीच्या खेळांत भाग घेतांना प्रौढ माणसांना केवढा निर्व्याज आनंद लाभतो. पैशाएवढी चिमुकली पितळेची चकती-पण तुमच्या दोन वर्षांच्या कन्यकेनें स्वयंपाक करून तुम्हांला त्या पानावर जेवायला बसविलें म्हणजे ते तुळशी बागेंतल्या पितळी खेळांत मिळणारें चार आठ आण्यांचें ताट नसून ती द्रौपदीची स्थाली आहे असा नाहीं का तुम्हांला भास

होत ? तुम्ही बाहेरून दमून भागून आलेले असतां, विविध काळज्यांनीं उदास झालेले असतां; पण घरांत पाऊल टाकल्यावर तुमचा जर दीड दोन वर्षांचा कान्हा दुडुदुडु धांवत पुढें आला आणि तुम्ही कांहीं बोलत नाहीं असें पाहून गुलाब-पाकळ्यांहूनही मऊ असा आपला इवलासा गाल त्यानें तुमच्या ओठापाशीं नेला, म्हणजे क्षणार्धांत तुमचें मन प्रफुल्लित होत नाहीं काय ? एखाद्या मांत्रिकानें आपल्या एका शब्दाच्या उच्चारानें साऱ्या भुताखेतांची दाणादाण करावी त्याप्रमाणें तुमच्या सर्व चिंता त्याक्षणीं दूर दूर पळून जात नाहींत काय ?

बालजीवन वाऱ्याप्रमाणें विनोदानेंही संपन्न असतें. किंबहुना लपंडाव हा खेळ लहान मुलांना अतिशय आवडतो त्याचें कारण त्यांची विनोदप्रियता हेंच आहे असें मला वाटतें. बोकड वीणा घेऊन बसला आहे, माकड तबला वाजवीत आहे, आणि गाढव मोठमोठ्यानें ताना मारीत आहे, हा चुटका ऐकून लहान-मुलांना केवढें हंसूं फुटतें ! मक्याचीं कणसें त्यांना कां आवडतात हें ठाऊक आहे का तुम्हांला ? ती गोड आणि लुसलुसीत असतात म्हणून नव्हे. दाढी-मिशा लावून सोंग सजविण्याच्या कामीं त्यांचा अतिशय उपयोग होतो म्हणून ! डोक्यावरून पांघरूण घेऊन तुम्हीं बुवाचें सोंग आणा—आणि मग त्या सोंगाचें बिंग बाहेर फोडतांना बालकें कशी खदखदून हंसतात तें पहा. काळ्या रंगापेक्षां गोऱ्या रंगाला जगांत अधिक मान आहे असें पाहून एका कावळ्यानें एकदां गोरें व्हायचें ठरविलें, त्याकरतां सर्व सिनेमा नटींनीं एकमुखानें प्रशंसा केलेला एक साबण त्यानें विकत आणला, रंकाळ्यावर जाऊन सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यानें तो अंगाला चोळला आणि मग आपण गोरे झालों अशा समजुतीनें शेजारच्या एका न्हाव्याच्या दुकानांत तो आरशासमोर येऊन उभा राहिला अशी एक गोष्ट मी लहान मुलांना नेहमीं सांगत असतों. या गोष्टींतल्या कावळ्याच्या स्नानाचें वर्णन सुरू झालें किंवा तो आरशासमोर येऊन उभा राहिला असें नुसतें सांगितलें म्हणजे मुलांची कळी अशी खुलते म्हणतां ! इसाप दोन हजार वर्षे जगांतल्या साऱ्या बालकांचा दोस्त होऊन राहिला आहे तो कांहीं उगाच नाहीं. तो जीवनाचा टीकाकार असला तरी त्याची टीका विनोदानें शृंगारलेली आहे.

लहान मुलांत काव्य असतें हें बहुतेक लोक कबूल करतील. त्यांच्यांत विनोद-बुद्धी असते हें कांहीं मंडळींना तरी मान्य होईल. पण प्रौढ मनुष्याला तीं जीव-नाकडे अंतर्मुख दृष्टीनें पहायला प्रवृत्त करतात असें मी म्हटलें तर त्यावर कुणी

फारसा विश्वास ठेवणार नाहीं. पण मानवतेचीं शाश्वत मूल्यें निरागस बालजीवनांत जशीं स्वच्छंदानें प्रगट होतात तशीं तीं पैसा आणि प्रतिष्ठा यांच्या भजनीं लागलेल्या किंवा लोभ आणि भोग यांच्या आहारीं गेलेल्या प्रौढांच्या आयुष्यक्रमांत क्वचितच दिसत असतील. ज्या नव्या जगाच्या रंगीबेरंगी जाहिराती निरनिराळ्या देशांतलीं मोठमोठीं माणसें अधूनमधून करीत असतात त्याची निर्मिती जर कधीं काळीं होणार असेल तर ती बालसुलभ सहानभूतींतूनच होईल. सहानुभूतीशिवाय समतेचें तत्त्वज्ञान मनुष्याला कळतच नाहीं मग तें वळण्याची गोष्ट दूरच राहिली. बालमन हा विशाल सहानुभूतीचा झरा आहे याचा अनुभव मी सर्वत्र--शाला-गृहांत, क्रीडांगणावर, रेल्वेच्या डब्यांत, इस्पितळांत घेत आलों आहे. बालमनाच्या सहानुभूतीचें माझ्या आठवणींतलें एक साधेंच उदाहरण देतों. चार वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. आम्हीं सर्व सांगलीहून परत येत होतों. थंडीच्या कडाक्याचे दिवस असल्यामुळें तिसऱ्या प्रहरींच गाडींत आम्हीं अंगांत स्वेटर चढविले होते. आगगाडींतून आम्हीं टांग्यांत बसलों त्यावेळीं संध्याकाळ झाली होती. गार वारे सुटून अंगाला झोंबत होते. सुलभाला मांडी-वर घेऊन मी टांगेवाल्याच्या शेजारीं बसलों. घोडा धावूं लागला, दोनतीन मिनिटें तशीच गेलीं. नेहमीं पांखरासारखी किलबिल करणाऱ्या दोन वर्षांच्या शुभाताई आज इतक्या मुखस्तंभ कां झाल्या आहेत हें कांहीं केल्या माझ्या लक्षांत येईना. मी तिच्याकडे निरखून पाहूं लागलों. ती घोड्याकडे एकाग्रतेनें पहात होती. त्याच्या टापांचा जो टपटप असा तालबद्ध आवाज येत होता त्यांत ती गुंगून गेली असावी असें मला वाटलें. पण पुढच्याच क्षणीं माझ्याकडे तोंड वळवून तिनें हळूच विचारलें, ' भाऊ, घोड्यांना कां हो स्वेटर घालीत नाहींत ? त्यांना नाहीं थंडी वाजत ? '

× × ×

लघुनिबंध हा बहुरंगी आणि बहुढंगी असा ललितवाङ्मयाचा एक प्रकार आहे असें मी कां म्हणतों हें आतां निराळें सांगायला नको. निसर्गाचें सौंदर्य आणि बालकांच्या लीला यांच्याइतकें मोहक वैचित्र्य जगांत दुसऱ्या कुठल्या तरी ठिकाणीं आपणांस सांपडूं शकेल काय ?

कोल्हापूर
२७-१-४७

वि. स. खांडेकर

# भावना



दा. क्र.

त्या पत्राचा आरंभ पाहून अगदीं चकित झालों मी ! माझ्या मैत्रिणीनें लिहिलें होतें ' असा राग आलाय् मला तुमचा ! '

पत्र पुढें वाचण्याऐवजीं तिला राग येण्यासारखें आपल्या हातून कांहीं घडलें आहे किंवा काय याची मी आठवण करूं लागलों. सातआठ दिवसांपूर्वी तिचें एक पत्र आलें होतें मला ! परीक्षेच्या निकालाप्रमाणें पत्राच्या उत्तरांकडेहि मुलें-मुली डोळे लावून बसतात हें लक्षांत घेऊन मीं अगदीं उलट टपालानें त्याचें उत्तर पाठविलें होतें. बस्स ! माझा गुन्हा काय तो एवढाच !

मी आणखी आठवूं लागलों. हो, त्या दिवशीं आजारी होतों मी ! थंडी-मध्यें पांघरूण लपेटून घेऊन स्वस्थ पडण्यांत सुख असतें ना ? आजारांत मनालाहि तसेंच करावेंसें वाटतें. बोलूं नये, चालूं नये, लिहूं नये, वाचूं नये–कांहीं करूं नये अशी तीव्र इच्छा त्या वेळीं होते. शरीर नि मन हीं जुळीं भावंडें आहेत कीं काय कुणाला ठाऊक ! पण त्यांच्या हर्षविषादाच्या संवेदना म्हणजे जुळ्याचें दुखणेंच असतें यांत कांहीं शंका नाहीं.

त्या दिवशीं अशा मनःस्थितींत असतांना सुद्धां मीं पडल्या पडल्या मजकूर सांगून त्या मैत्रिणीच्या पत्राचें सविस्तर उत्तर वेळेवर पोष्टाच्या पेटींत पडेल, अशी दक्षता घेतली होती. अलिकडच्या मुलींना केसांत एखादेंच फूल खोंवण्यांत सौंदर्य आहे हें कळतें ! पण तो न्याय पत्रांतल्या वाक्यांना लावायला मात्र त्या कबूल होत नाहींत, ही गोष्टसुद्धां त्या दिवशीं मी विसरलों नव्हतों. त्यामुळें तिच्या पत्रांतलें तें आरंभींचें विचित्र वाक्य वाचून मी विस्मितच झालों. परमेश्वरानें स्त्रीचें मन निर्माण करतांना पारा अधिक प्रमाणांत वापरला असावा अशीहि शंका माझ्या मनांत येऊन गेली. मी झटपट उत्तर पाठविलें म्हणून तिला खूप खूप आनंद झाला असेल असे मी मनांतल्या मनांत मांडे खात होतों. या कल्पनेंत गुंगतच मी तिचें पत्र उघडलें होतें. पण त्यांतलें तें पहिलेंच वाक्य-

'असा राग आलाय मला तुमचा !' ओव्हर बाउंडरी मारल्याच्या ऐटीनें वर बघावें आणि चेंडू जवळच उडून कुणीतरी झेललेला असावा! अगदीं तश्शी स्थिति झाली माझी हें वाक्य वाचून!

मीं मनांत म्हटलें—आपल्यालाच तेवढा राग येतो अशी या बाईसाहेबांची समजूत झालेली दिसते. पण राग ही अक्कल, कीर्ति किंवा पैसा यांच्याइतकी कांहीं दुर्मिळ चीज नाहीं हें यांना कुणी तरी पटवूनच द्यायला पाहिजे. म्हणावें, मीहि रागावूं शकतों.

या झटक्यासरशीं मीं तें हातांतलें पत्र टेबलावर फेकून दिलें. पण लगेच मला वाटूं लागलें, ही सालस मुलगी कशाकरितां रागावली आहे तें तर पाहावें. अलीकडच्या मुलींच्या डोक्यांत विचारापेक्षां आंकडेच जास्ती असतात, हा आक्षेप कितपत खरा आहे हें अनायासें आपल्याला कळून येईल.

मी पत्र पुढें वाचूं लागलों. तिनें लिहिलें होतें: 'माझा राग अकारण आहे हें मला कळतं! पण—भाऊ, तुम्ही स्वतः मला एका ओळीचं पत्र लिहिलं तरी चालेल. मात्र कृपा करून तुमच्या त्या लेखकाच्या अक्षरांतलीं पत्रं मला पाठवत जाऊं नका! तुम्हांला लिहिणें अशक्यच असेल तर उषाताईंना लिहायला सांगा. पण तुमच्या त्या लेखकाला मात्र—'

मला हंसूं आवरेना. माझ्या लेखकाचें नि या मुलीचें पूर्वजन्मीं वांकडें असलें पाहिजे असेंच मला वाटलें. नाहींतर त्याच्याविरुद्ध हिनें तक्रार करायचें काय कारण होतें? त्याचें अक्षर इतकें सुंदर आहे, कीं त्यानें लिहिलेला मजकूर वाचतांना पिसारा उभारून नाचणाऱ्या मोराचें मोहक दृश्य डोळ्यापुढें नेहमीं उभें राहतें. उलट माझें अक्षर–त्याच्या वाईटपणाला उपमा शोधून काढणें मोठें कठीण आहे–तें वाचण्यापेक्षां भित्रा मनुष्यसुद्धां हंसत लढाईवर जाईल!

असें असतांना माझ्या या मैत्रिणीनें त्या लेखकाच्या अक्षराविषयीं प्रच्छन्न तिरस्कार दर्शवावा याचें मला मोठें नवल वाटलें!

पण तें क्षणमात्रच! तिच्या लिहिण्यांतलें एक वाक्य राहून राहून माझ्या मनांत घोळूं लागलें:—'तुम्ही स्वतः मला एका ओळीचं पत्र लिहिलं तरी चालेल!'

कवितेंतल्या एखाद्याच चरणांत. तिचा सर्व रस प्रगट व्हावा तसें हें एकच वाक्य माझ्या मैत्रिणीचें मन उघड करून सांगत होतें. जणूं कांहीं ती मला विनवून म्हणत होती : ' भाऊ, पत्रं म्हणजे कांहीं वर्तमानपत्रं नव्हेत ! मजकुराच्या मोजमापावरनं कांहीं त्यांची किंमत कुणी ठरवीत नाहीं ! पत्रं हीं गीतें आहेत. त्यांची गोडी लांबीरुंदीवर अवलंबून नाहीं. तीं म्हणणाऱ्याच्या गोड गळ्यावर—किंबहुना ज्या अंतःकरणांतून तीं बाहेर पडलीं असतील त्या अंतःकरणाच्या माधुरीवर अवलंबून आहे. '

तिनें आपल्या रागाला अकारण हें विशेषण लावलें होतें. पण या दृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागतांच मला वाटलें-तिला आलेला राग सकारण आहे ! नव्हे, तो अतिशय स्वाभाविक आहे. पत्राचा आनंद आंतल्या मजकुरापेक्षां तें लिहिणारी व्यक्ति आपल्याशीं बोलत आहे—अगदीं हितगुज करीत आहे—या भावनेंत आहे. व्यक्तीच्या सहवासाचा हा क्षणिक मधुर भास तिच्या अक्षरावांचून निर्माण होणें शक्य नाहीं. माझ्या लेखकानें लिहिलेलें सविस्तर पत्र वाचून माझ्या मैत्रिणीच्या बुद्धीचें समाधान झालें असेल ! पण तिची भावना असंतुष्ट राहिली ! तो धुमसणारा असंतोष तिच्या रागाच्या रूपानें प्रकट झाला तर त्यांत नवल कसलें ? मनुष्याचीं सारीं सुखदुःखें भावनात्मकच असतात, नाहीं का ?

हें सिद्ध करावयाला मोठमोठीं उदाहरणें कशाला हवींत ? अगदीं साधीच गोष्ट पहा ना ! मी मुंबईला वारंवार जातों. स्टेशनावर मला न्यायला कुणी आलें नाहीं तरी मी वाट चुकणार नाहीं अगर गोंधळणार नाहीं हें मला कळतें. पण प्रत्येक वेळीं भायखळा स्टेशन मागें पडलें कीं मी उत्सुकतेनें बाहेर डोकावून पाहूं लागतों. अगदीं पहिल्यांदाच मुंबईला येणाऱ्या लहान मुलांच्या डोळ्यांनीं म्हणानात ! खाड खाड रूळ बदलून गाडीचा वेग मंद झाला कीं माझी दृष्टि प्लॅटफॉर्मवरल्या माणसांवरून अधीरतेनें भिरभिरत जाते. त्या गर्दींत कुणाची तरी ओळखीची मूर्ति किंवा कुणाचा तरी अर्धवट उंचावलेला हात पाहिला कीं क्षणभर विलक्षण आनंद होतो मला. पारिजातकाच्या ताज्या फुलांची ओंजळ कुणीतरी आणून द्यावी तसें माझ्या स्नेह्यांच्या हास्ययुक्त मुद्रांकडे पाहिलें कीं मला वाटतें, त्या एका क्षणांत प्रवासाचा सारा शीणभाग मी विसरून जातों.

कीर्ति, संपत्ति, संस्कृति इत्यादिकांच्या मागें धांवून मिळणारीं सुखें हीं

गाण्यांतल्या लांबलचक तानांसारखीं असतात. तीं बुद्धीला झुलवितात; पण हृदयाला हलवूं शकत नाहींत. उलट दररोजच्या साध्यासुध्या आयुष्यक्रमांतलि इवलीं इवलीं सुखें हीं गायनांतल्या लहान लहान मुरक्यांप्रमाणें वाटतात. त्यांच्यामुळेंच जीवनसंगीताला अवीट गोडी प्राप्त होते असें मला तरी वाटतें. आपला एकादा मित्र आजारी असला तर त्याच्याकरतां आपण कांहीं मुंबईहून विमानानें बडे बडे डॉक्टर आणूं शकत नाहीं. पण त्याला भेटायला जातांना एखादें टपोरें गुलाबाचें फूल घेऊन जाणें तरी आपल्या स्वाधीन आहे कीं नाहीं? आपला मित्र कवि नसला किंवा कुठल्याहि वस्तूंवर एखादें प्रतीक लादून गूढगुंजन करणाऱ्या कादंबऱ्यांचा त्याला कंटाळा येत असला, तरीहि त्या गुलाबाच्या फुलाकडे पाहून त्याच्या मुद्रेवर स्मितरेषा चमकल्याशिवाय राहणार नाहीं. जणूं कांहीं तें फूल त्याला मूकसंदेश देत असतें—' हांस, जरा हांस. काल आणि उद्यां हे भास आहेत. जगांत सत्य एकच आहे. आज—हा दिवस—ही—घटका—हा क्षण! कालची कळी उद्यां निर्माल्य होत असेल! पण आज ती फूल होऊन गात आहे, हंसत आहे. तूंहि असाच गात राहा, असाच हंसत राहा. '

भावनेचें हें माहात्म्य आपल्या पौराणिक कवींनीं किती सुंदर रीतीनीं चित्रित केलें आहे! कृष्णावर निरपेक्ष प्रेम करणारी कुब्जा किंवा सामोरें आलेलें सिंहासन लाथाडून चौदा वर्षें प्रभु रामचंद्रांच्या पादुकांची पूजा करीत बसणारा भरत यांचा कुणाला तरी विसर पडेल का?

या उदाहरणांवर पुराणांतल्या गोष्टी पुराणांतच, असा आक्षेप घेणारे निघणारच नाहींत असें नाहीं. त्यांना मी एवढेंच विचारतों—मोतिलाल नेहरू हे एक आधुनिक काळांतले मोठे बुद्धिमान् गृहस्थ होऊन गेले हें तुम्हांला मान्य आहे ना? भोग आणि त्याग या दोन्ही क्षेत्रांत त्यांनीं नांव गाजविलें आहे. त्यांचें चरित्र वाचून त्यांच्यांतली अविस्मरणीय गोष्ट कोणती तें तुम्हींच मला सांगा. माझी खात्री आहे कीं, तुम्ही एकाच प्रसंगाचें वर्णन कराल—जवाहरलाल तुरुंगाची वाट चालूं लागले आहेत, आजपर्यंत राजवैभवांत वाढलेल्या आपल्या प्रियपुत्राचे कारागृहांत किती हाल होतील याची कल्पना करीत मोतीलालजी आपल्या शयनगृहांत तळमळत आहेत; त्यांना पलंगावरली मऊ

मऊ गादी खुपूं लागते, आपल्या लाडक्या मुलाला तुरुंगांत जमिनीवर, अगदीं साध्या सतरंजीवर झोपावें लागणार या विचारानें व्याकुळ होतात आणि जमिनीवर एक साधीसुधी चटई पसरून ते तिच्यावर तळमळत पडतात!

# खिडक्या २

" छेः ! " नकळत माझ्या तोंडांतून उद्गार निघून गेला. ध्यानींमनीं नसतांहि बंदुकीची गोळी कानाजवळून सूं करीत जावी, तशी त्या घरमालकाची स्थिति झाली. तो माझ्याकडे पाहतच राहिला.

घर पाहायला आलों तेव्हां मी दारांतच त्याला म्हणालों होतों, " ' लग्न पाहावं करून नि घर पाहावं बांधून ' ही म्हण फार जुनी झाली आतां. ' लग्न ' करण्यापेक्षां संसार करणंच शतपटीनं कठीण आहे ! "

" नि घर बांधण्यापेक्षां ? " त्यानें उत्सुकतेनें प्रश्न केला होता.

" मनासारखं घर शोधून काढणं. भाड्याचीं घरं पाहून पाहून मी इतका कंटाळून गेलों आहें कीं, या दगदगीपेक्षां विन-भाड्याच्या घरांतच जाऊन राहणं बरं असं मला वाटूं लागलंय ! "

सदरहू घरमालक एखाद्या वर्तमानपत्राचा बातमीदार नव्हता म्हणून बरें ! नाहींतर दुसऱ्याच दिवशीं मी सत्याग्रह करून तुरुंगांत जाणार असल्याच्या बातम्या वृत्तपत्रांत फडकल्या असत्या !

हंसत हंसत त्यानें मला घर दाखवायला सुरुवात केली. पहिला नि दुसरा मजला पाहून मी तर अगदीं खूष होऊन गेलों. मुबलक जागा, विपुल प्रकाश, भिंतींना दिलेला फिक्कट निळा रंग—मला हवें होतें तसें घर होतें तें ! फक्त एकाच गोष्टीची उणीव होती. मला लिहायला बसायला निवान्त अशी खोली कुठेंच दिसत नव्हती.

" तिसऱ्या मजल्यावर अशी एक खोली मुद्दाम बांधली आहे " असें जेव्हां घरमालकानें मला सांगितलें, तेव्हां माझा आनंद गगनांत मावेना. मी धांवतच जिना चढलों म्हणानात !

खोली खरोखरच सुंदर होती. एखाद्या अंगठीमध्यें लहानसा हिऱ्याचा खडा बसवावा, तशी ती प्रथमदर्शनीं मला वाटली.

पुन्हा चौकस नजरेनें मीं तिच्या अंतरंगाचें निरीक्षण केलें आणि लगेच माझ्या तोंडून उद्गार निघाला, " छेः ! "

माझ्याकडे टकमक पाहणाऱ्या त्या घरमालकासाठीं या एकाक्षरी उद्गारावर भाष्य करणें आवश्यक होतें म्हणून मी म्हणालों, " तशी खोली छान आहे हो ! पण—"

" पण काय ? "

" हिला एकच लहान खिडकी आहे. नि ती सुद्धां रस्त्याच्या बाजूला नाहीं ! "

" या रस्त्यावर भयंकर रहदारी असते; म्हणून मुद्दामच मीं या बाजूला खिडकी ठेवली नाहीं ! "

मीं मनांत म्हटलें–काय अरसिक गृहस्थ आहे हा ! खिडकींत केवढें काव्य असतें याचा बिचाऱ्यानें कधींच अनुभव घेतला नसावा ! खिडकी म्हणजे मूर्तिमंत सौंदर्य–खिडकी म्हणजे मूर्तिमंत जीवन—खिडकी म्हणजे अंधार-कोठडींतल्या कैद्याला आनंदाचा किरण दाखविणारी देवता !

आगगाडींत चढल्याबरोबर लहान मूल एकदम खिडकी गांठतें तें काय उगीच ? व्याख्यानाला आलेल्या माणसांत खिडकीजवळचा श्रोता फार कमी कंटाळतो हा अनुभव कुणाला नाहीं ?

शाळेंत असतांना आपला नेहमीं पहिला नंबर असावा असें मला वाटे. त्याचें मुख्य कारण पहिल्या नंबरच्या जागेजवळ एक मोठी खिडकी होती हेंच असलें पाहिजे. जेव्हां जेव्हां माझा नंबर खालीं जाई, तेव्हां तेव्हां मला मनस्वी दुःख होई. सारे सोबती म्हणत—" अगदींच हळवा आहेस तूं ! या महिन्यांत नंबर खालीं गेला तर पुढच्या महिन्याला तो वर येईल ! आहे काय त्यांत ? " मला नंबर गमावल्याचें दुःख होत नसून खिडकीजवळची जागा गेल्यामुळें वाईट वाटत आहे, याच्यावर कांहीं केल्या त्यांचा विश्वासच बसत नसे. अपमान लपवून ठेवण्याकरितां मी एक लंगडी सबब पुढें करीत आहें असेंच रांना वाटे.

ज्याचें घर मी पाहायला आलों होतों तो मालकहि माझ्या शाळासोबत्यांचाच अवतार होता. इतर सर्व गोष्टी पसंत असूनहि स्वतःच्या बैठकीच्या खोलीला

खिडक्या नाहींत म्हणून घर नाकारणारा मनुष्य वेडाचे असला पाहिजे, हा अभिप्राय त्याच्या चर्येवर अगदीं स्पष्टपणें उमटला होता.

खोलींतून बाहेर पडतां पडतां मला घर नको असल्याचें मी त्याला सांगितलें.

माझा नकार ऐकून त्याला विलक्षण आश्चर्य वाटलें. मी नुकत्याच पाहून आलेल्या दुसऱ्या घरांपेक्षां त्यानें मला चार रुपये कमी भाडें सांगितलें होतें. पण—

लेखक नुसते लहरीच नसतात, तर थोडेफार वेडेहि असतात, अशी त्याची खात्री झाली असावी !

मला वाटतें, माझें हें खिडक्यांचें वेड भाड्याचे चार रुपये वांचवूं पाहणाऱ्या व्यावहारिक शहाणपणापेक्षां अधिक सुंदर व जीवनसंवर्धक आहे. खिडक्या असलेल्या खोलींत डोळ्यांना दिसणारा प्रकाश तर अधिक येतोच; पण आपल्या मनांतला काळोखहि सहजासहजीं उजळत जातो. खिडक्यांतून शरीराला सुखावह वाटणाऱ्या वायुलहरीच येतात असें नाहीं; कोमेजलेल्या मनाला प्रफुल्लित करणाऱ्या जीवनलहरीहि त्यांतूनच आपल्यापर्यंत येऊन पोहोंचतात.

तासन् तास ठरलेली जागा न सोडतां काम करणारा मनुष्य हा एक प्रकारचा कैदीच असतो. तो वारंवार कंटाळून जातो. किती तरी वेळां त्याला आपल्या कायम ठशाच्या आयुष्याचा उबग येतो. अशा वेळीं त्याला एखाद्या खिडकी-जवळ जाण्याची संधि मिळाली कीं, लगेच त्याच्या मनांत नवी पालवी फुलूं लागते. खिडकींतून अनंत आकाश त्याला आपल्याकडे बोलावतें. निळसर हंसऱ्या टेकड्या आपला मूक संदेश त्याला सांगतात. वर्षाकाल धरणीला करीत असलेला अभिषेक पाहून त्याचें मन प्रसन्न होतें. त्या अभिषेकाच्या वेळीं वृक्षराजी चवऱ्या ढाळीत असल्याचें दृश्य दिसतांच तोहि त्यांच्याप्रमाणें डोलूं लागतो. थंडीच्या दिवसांतल्या एखाद्या शनिवारीं बाहेर धुकें पसरलेलें पाहून सृष्टि जणूं कांहीं आपल्याला लपंडाव खेळायला बोलावीत आहे असा त्याला भास होतो.

खिडकींतून दिसणाऱ्या निर्जीव निसर्गाशीं समरस होतांच मनुष्याच्या जीवन-शक्तीला भरतीच्या लाटा येऊं लागतात. मग खिडकीपाशीं उभें राहिल्या-

वर क्षणाक्षणाला मानवतेचें जें सुंदर आणि सजीव दर्शन होतें, त्यानें मनुष्य आपलें दुःख विसरून जात असला तर त्यांत नवल तें कसलें ?

खिडकीपाशीं उभें राहणें हें मनाच्या उदासीनतेवरलें रामबाण औषध आहे, हा अनुभव मी अनेकदां घेतला आहे. दुपारीं खिडकींतून रस्त्याकडे नजर टाकली कीं, जीवनकलहाची तीव्रता चटकन् मनाला पटते. बाहेर भाजून टाकणाऱ्या उन्हांत पाथरवट दगड फोडीत बसलेला दिसतो, तान्ह्या मुलाला झांकण्याइतकीसुद्धां ज्याची लांबीरुंदी नाहीं, असें लुगडें नेसलेली भिकारीण दारोदार भाकरीच्या तुकड्याकरितां टाहो फोडीत असल्याचें दृश्य दृष्टीला पडतें, आणि मग स्वतःच्या क्षुल्लक अडचणींचा बाऊ करून दुःखी होणाऱ्या आपल्या मनाची आपल्यालाच लाज वाटूं लागते.

संध्याकाळच्या वेळीं खिडकींतून रहदारीच्या रस्त्यानें पाहिलें कीं 'शाळा सुटली, पाटी फुटली' हें अक्षर-वाङ्मयांतलें अभिजात शिशुगीत मोठमोठ्यानें म्हणत घराकडे धांव घेणारीं लहान लहान मुलें आपलें मन वेधून घेतात, फुटबॉल किंवा क्रिकेटचें सामान हातांत घेऊन तावातावानें बोलत जाणारीं चौदापंधरा वर्षांचीं मुलें आपल्याला उल्हसित करतात, नटून-थटून हळदी-कुंकवाला निघालेल्या बायकांचेंहि मधून मधून मधुर दर्शन घडतें आणि देवाला चाललेल्या म्हाताऱ्या आजीबाईची बरोबरच्या अवखळ नातवंडाला संभाळण्याकरितां चाललेली धांदल पाहून तर मनामध्यें वत्सल आणि हास्य या दोन्ही रसांचा विलक्षण गोड असा संगम निर्माण होतो. आपल्या खोलींतल्या आणि आपल्या वैयक्तिक जीवनांतल्या सांठलेल्या पाण्यांत खिडकींतून आंत येणाऱ्या जीवन-सागराच्या लाटा हां हां म्हणतां नवें चैतन्य निर्माण करतात.

आणि म्हणूनच ज्या खोलीला विपुल खिडक्या नाहींत ती कितीहि सुंदर असली तरी मला आवडत नाहीं. मित्राचे नाकडोळे रेखीव आहेत कीं काय हें आपण कधींच पाहत नाहीं ! पण ज्याचे ओठ हंसण्याकरितां कधीं उघडत नाहींत आणि ज्याच्या हास्यांतून अंतरंगांतल्या मधुर भावनांचें दर्शन कधीं होत नाहीं, अशा माणसाशीं कुणी तरी मैत्री करील का ? खिडक्या नसलेली खोली ही अशा रूक्ष भावनाशून्य माणसासारखीच वाटते मला.

जग सुधारत चाललें आहे हें सिद्ध करण्याकरितां हल्लींचे पुष्कळ पंडित

मोठमोठीं प्रमाणें पुढें करतात, तेव्हां मला हंसूं येतें. मी मनांत म्हणतों—हें खोटें आहे असें कोण लेकाचा म्हणतो ? माणसें पूर्वीपेक्षां घराला अधिक खिडक्या ठेवूं लागलीं आहेत या एकाच गोष्टीवरून या सिद्धान्ताची सत्यता कुणालाहि पटेल.

# हिरवा रंग

३

पत्नीच्या मागून कापडदुकानांत शिरतांना माझें मलाच हंसूं येत होतें.

दासबाबूंना झटकन् कुलूप काढतां येत नसे म्हणतात. त्यांचें मोठेंपण माझ्यापाशीं नसलें तरी लहानसहान गोष्टींत अगदीं त्यांच्यासारखा गोंधळून जातों मी ! चार तासांत दहा पानांची लघुकथा लिहायची असली तर त्याची मला फिकीर वाटत नाहीं ! पण कुणाच्या पायांतला कांटा काढायचा असला तर मात्र माझी पांचावर धारण बसते. वाटतें—आपण कांटा काढायला लागलों नि त्या माणसाच्या पायांत सुई मोडली तर ? हो. धर्म करतां कर्म उभें राहायचें. एखाद्या सभेपुढें तासभर अस्खलित भाषण करायचें मला जेवढें भय वाटत नाहीं तेवढें स्टोव्हवरती चहा करायचें वाटतें. स्टोव्हजवळ बसलें कीं मागें मुंबईच्या वर्तमानपत्रांमध्यें दररोज येणाऱ्या त्या अपघातांच्या बातम्या, त्या साड्या नेसणाऱ्या गुजराथी बायका, ते कॉरोनर आठवल्यांचे निकाल इत्यादि गोष्टी डोळ्यांपुढें उभ्या राहतात ! आणि मग पिन करतांना नि पंप करतांना आपण अक्षरशः विस्तवाशीं खेळत आहों असा भास होतो मला.

व्यवहारांतल्या अगदीं साध्या गोष्टींत ज्याचा असा गोंधळ होतो, त्याची अक्कल कापडदुकानांत कितीशी चालणार ? खोटा जर आणि खरा जर यांच्यातलें अंतर ओळखायला कुणीं एक हजार रुपयांचें बक्षीस लावलें तरी तें या जन्मांत मला मिळणार नाहीं हें मी खात्रीपूर्वक सांगतों. कापडदुकानांत माझ्या मनाचा गोंधळ उडण्याचें आणखीहि एक कारण आहे. एखाद्या सुंदर बागेंत जाऊन तिथलें एकच फूल तोडायला सांगितलें तर माणसाचा किती विरस होईल ! कापडदुकानांत माझी हुबेहूब तशी स्थिति होते. इतक्या अडचणींतून एखादें सुंदर वस्त्र निवडलेंच तर त्याच्यावर जो व्यापारी आंकडा लिहिलेला असतो तो पाहिला कीं—

मला अशा वेळीं एकच विचार सुचतो. आपल्या गोड गोड लेखनांतून मोठीं

मोठीं तत्त्वें सांगणाऱ्या लेखकांच्या पोकळ अंतरंगांचा पत्ता जसा श्रद्धाळू वाचकाला लागत नाहीं, त्याचप्रमाणें व्यापारी आंकड्यांची खरी किंमत ब्रह्मदेवालाहि कळणें शक्य नाहीं !

हें सारें मनांत येऊनहि मी पत्नीबरोबर गेलों याचें एकच कारण ! तिचा आग्रह ! हायकोर्टच्या निकालावर प्रीव्हि कौन्सिलकडे अपील तरी करतां येतें, पण पत्नीच्या निकालावर ? छेः ! अब्रह्मण्यम् !

तिला जें लुगडें विकत घ्यायचें होतें तें मीं पसंत करावें अशी तिची इच्छा होती.

लुगडीं आणि आइनस्टाइनचा सापेक्षतेचा सिद्धांत यांविषयीं मला सारखेंच ज्ञान आहे असें सांगून मी तिच्याबरोबर बाजारांत जायचें टाळूं लागलों, तेव्हां ती म्हणाली, ' परवाचं तुमचं शर्टचं कापड मीं पसंत केलंय् हं ! तेव्हां आजचं लुगडं तुम्हीच—'

मुकाट्यानं बाजारांत जायला तयार झालों मी ! हा प्रश्न बुद्धीचा नसून भावनेचा आहे हें मीं ओळखलें. पतीनें पत्नीच्या डोळ्यांनीं पाहावें आणि पत्नीनें पतीच्या डोळ्यांनीं निरीक्षण करावें ही सुखी संसाराची गुरुकिल्ली आहे, हें कोण नाकबूल करील ? मात्र तिच्याबरोबर लुगडें विकत घ्यायला जातांना एकसारखें माझ्या मनांत येत होतें—लग्नांत नवराबायकोंनीं एकमेकांना घांस देण्याची जी जुनी पद्धत होती तिच्यांतहि असाच कांहीं खोल अर्थ असेल का ? दोघांनीं दोन ताटांत जेवणें निराळें आणि एकमेकांनीं एकमेकांना घांस देणें निराळें. पहिला व्यवहार आहे नि दुसरें काव्य आहे. आणि ज्याला आपण सुख सुख म्हणतों त्याचें खरें स्वरूप एकच आहे—काव्यदृष्टीनें जगाकडे पाहण्याची शक्ति !

कापड-दुकानांत माझ्या पत्नीभोंवतीं विविध रंगांचीं, तऱ्हतऱ्हेच्या कांठांचीं सुंदर सुंदर लुगडीं येऊन पडूं लागलीं. त्यांच्याकडे पाहतां पाहतां माझ्या मनांत आलें—आपण चित्रकार असतों तर या दृश्याकडे पाहून ' संध्या-देवता ' म्हणून एक चित्र आपण नक्की काढलें असतें !

मी ऐकूं लागलों. माझी ' संध्या-देवता ' काव्यबिव्य गुंडाळून ठेवून दुकानदाराला विचारीत होती, ' हें चांगलं लांब-रुंद आहे ना ? ' ' नि याचा रंग ? नाहींतर धुतलं कीं आपलं पोतेरं होईल ! ' ' याची किंमत काय ? नक्की सांगा हं ! '

लुगड्यांचें बारकाईनें निरीक्षण करण्यांत ती इतकी रंगून गेली होती कीं बोलून सोय नाहीं. हें पाहून मला एक विचित्र कल्पना सुचली—द्रौपदीवस्त्रहरण हा महाभारतांतला मोठा करुण प्रसंग मानतात. पण सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर तो तसा नाहीं. कृष्णानें पुरविलेल्या विविध वस्त्रांच्या राशी भोंवतालीं जेव्हां दिसूं लागल्या असतील तेव्हां द्रौपदीला सुद्धां आपल्या दुःखाचा विसर पडला असेल! कदाचित् त्या राशींतला एखादा शालू हातांत घेऊन तिनें 'याची किंमत काय?' म्हणून दुःशासनाला प्रश्नहि केला असेल! आणि मग—

पत्नीच्या प्रश्नानें मी माझ्या या विचित्र तंद्रींतून जागा झालों. ती म्हणत होती, 'कुठलं घेऊं यांतलं?' एक अस्मानी व एक गुलाबी, अशीं दोन सुंदर लुगडीं तिनें निवडून काढलीं होतीं.

पण माझी दृष्टि पलीकडे पडलेल्या एका हिरव्या लुगड्याकडे गेली. मीं म्हटलें 'तें हिरवंच घे ना!'

'इश्श! गतवर्षीं असलंच घेतलं होतं कीं!'

मी बोलून गेलों, 'हिरव्या रंगाचा माणसाला कधींच कंटाळा येत नाहीं!'

मी जागेवरून उठलों नि तें हिरवें लुगडें उचलून पाहिलें. त्या सुंदर रंगांत जगांतल्या साऱ्या आशा एकवटल्या आहेत, सारीं हास्यें हातांत हात घालून नाचत आहेत, असा भास झाला मला!

पत्नीचा विरस होऊं नये म्हणून तिला आवडलेलें अस्मानी लुगडेंहि घ्यायला मीं सांगितलें. मात्र घरीं परत येतांना मीं हळूच म्हटलें, 'बायका नवऱ्याला कापडदुकानांत कां घेऊन जातात तें आज मला कळलं! आयतीं एकाऐवजीं दोन लुगडीं मिळतात! एक त्याच्या आवडीचं नि एक आपल्या स्वतःच्या आवडीचं!'

'पण हिरवा रंगच आपल्याला कां आवडतो इतका?'

तिच्या या प्रश्नाचें मीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. मनोमन पटणाऱ्या गोष्टींची चर्चा कुणी रस्त्यावर करीत बसतें का?

आकाशाचा फिकट निळा रंग मला आवडत नाहीं असें नाहीं. तो पाहिला कीं युरोपिअन बालकांच्या निळसर डोळ्यांची आठवण मला होते. क्षितिजापाशीं समुद्राच्या काळसर लाटांवर टेकलेला आकाशाचा नीलिमा पाहिला कीं त्या

बालकांचे डोळे काजळ घातल्यावर किती मोहक दिसतील याची मला कल्पना येते. पण असें असूनहि निळ्या रंगाचें विलक्षण आकर्षण मला कधींच वाटत नाहीं.

पांढऱ्या रंगाचा पावित्र्याशीं किती निकट संबंध आहे हें सूर्यापासून खादी-पर्यंत कुठल्याहि पदार्थाकडे पाहिलें तरी सहज कळून येण्याजोगें आहे. सकाळीं दिशा उजळूं लागतात तेव्हां निश्चेष्ट झालेला मनुष्य शुद्धीवर येत असल्याचा जो सुंदर भास होतो, त्याचा आनंद मीं अनेकदां लुटला आहे. पण असें असूनहि पांढऱ्या रंगाविषयीं कांहीं केल्या मला विशेष प्रेम वाटत नाहीं.

तांबडा रंग पाहिला कीं ज्यांनीं देशासाठीं धारातीर्थीं रक्त सांडलेलें आहे किंवा समाजासाठीं आपल्या स्वार्थाला नि सुखाला हंसत अग्नि दिला आहे, अशा अनेक महात्म्यांच्या मूर्ती माझ्या डोळ्यांपुढें उभ्या राहतात. पिवळ्या रंगाला आपलें मोठेंपण या पद्धतीनें सिद्ध करतां आलें नाहीं तरी तो सोन्याचा रंग आहे ही एकच गोष्ट त्याची आजकालची लोकप्रियता दर्शविण्याला पुरेशी आहे.

काळ्या रंगांत किती गूढ नि मोहक काव्य भरलें आहे हें पाहण्याकरितां अमावास्येच्या रात्रीं टेकडीवर मी एकटाच जाऊन बसलों आहें. एखादा पतंग ज्याप्रमाणें उडत उडत उंच जाऊन दिसेनासा व्हावा त्याप्रमाणें त्या उदासरम्य वातावरणांत मी स्वतःपासून किती दूर गेलों होतों याची आठवण मी अजून विसरलों नाहीं. पण असें असूनहि काळा रंग हा माझा आवडता रंग आहे असें मात्र मला कधींच वाटलें नाहीं.

हिरवा रंग सर्वश्रेष्ठ नसता तर घरोघर पोपटांचे पिंजरे दिसले असते का ?

आमच्या घराच्या मागच्या बाजूला एका लहान घराच्या अगदीं छोट्या अशा अंगणांत केळी लावलेल्या आहेत. आडदांड वारा त्या केळींच्या पानांच्या जोरजोरानें चिंधड्या करीत असतो. लहान मुलाला जेवायला उपयोगी पडेल असा फाळकासुद्धां एकाहि केळीवर मिळणार नाहीं इतकी त्यांची दुर्दशा झाली आहे. पण असें असून त्या केळी उपटून टाकण्याची इच्छा घरमालकाला होत नाहीं ! याचें कारण एकच आहे असें मला वाटतें...त्या पानांचा सौम्य सुंदर हिरवा रंग.

हिरवा रंग हा जीवनाचा रंग आहे. हें ज्यांना खोटें वाटत असेल त्यांनीं

आपल्याकडली एक रूढि अवश्य लक्षांत घ्यावी. पहिल्या डोहाळजेवणाचे वेळीं भावी मातेला हिरव्या रंगाचें लुगडें नेसवलें जातें, हिरव्या रंगाची चोळी घातली जाते नि तिला कांकणें भरतात तींहि हिरव्या रंगाचींच असतात.

पण जुन्या चालींवर ज्यांची श्रद्धा नसेल त्यांना हें कसें पटावयाचें ? त्यांना मी एकच विनंति करतों—कृपा करून माझ्याकडे या. माझ्या घराच्या मागेंच खासबागेंतलें मैदान आहे. उन्हाळ्यांत या मैदानांत मुलें खूप खेळ खेळत असत. त्या वेळीं मुलें नसलीं म्हणजे या मैदानाकडे पाहवतसुद्धां नसे. जिकडे तिकडे माती दिसावयाची ! नि वावटळ सुटली कीं एकसारखे धुळीचे लोट उठायचे. पण उन्हाळ्यांतल्या या शून्य मैदानाकडे ढुंकूनसुद्धां न पाहणारा मी आतां तें निर्जन असतांनासुद्धां घटका घटका त्याच्याकडे पाहत उभा राहतों. मैदान हा शब्दसुद्धां त्याच्या बाबतींत आतां कसासाच वाटतो मला. निदान पाचूचें मैदान म्हणेन मी त्याला. कुठंहि नजर टाका–जिकडे तिकडे हिरवळ पसरली आहे. जणुं कांहीं वर्षादेवीच्या नृत्याकरितां धरणीनें जपून ठेवलेला आपला आवडता गालिचाच पसरला आहे.

साधी हिरवळ आहे ही. तिला वेलीप्रमाणें फुलें येत नाहींत किंवा झाडांप्रमाणें फळें येत नाहींत ! पण हा हिरव्या रंगाचा वीतभर खोल असा समुद्र पाहिला कीं मन कसें प्रसन्न होतें ! झोंपेनंतर शरिराला जशी हुशारी वाटते, तसें या हिरवळीकडे पाहत राहिलें कीं, हृदय उल्हसित होतें. कुणी बीं पेरायला नको, कुणी मशागत करायला नको, जमीन सुपीक असायला नको, कांहीं नको ! थोडासा कुठें ओलावा मिळाला कीं हिरवळ जमिनींतून आपलें डोकें वर काढते. मनुष्याच्या उत्कट जीवनेच्छेचें इतकें सुंदर प्रतीक दुसरीकडे कुठें तरी मिळेल काय ?

आणि म्हणून मला वाटतें—बायकोनें कापडदुकानांत नेल्याबरोबर मीं जसा तिला हिरवें लुगडें घेण्याचा सल्ला दिला, तशी रशियांतल्या क्रांतीच्या वेळीं कुणी तरी लेनिनला एक विनंति करायला हवी होती—' तुमचें निशाण तांबडें ठेवूं नका, हिरवें ठेवा. ' रेड आर्मी ' हें ' ग्रीन आर्मी ' होऊं द्या. कारण क्रांतीला आपले हात नाइलाजानें लाल करावे लागत असले तरी तिच्या डोळ्यांत नव्या जीवनाचें तेजच नाचत असतें. क्रांति ही कठोर कृत्या नाहीं; ती प्रेमळ माता आहे.'

# आभार ४

त्या पुस्तकांतली एकच गोष्ट वाचावयाची उरली होती. प्रवास संपत आला कीं मनुष्याची धांदल होते ना ! अगदीं तश्शी गडबड उडाली होती माझी ! मी मनांत म्हणत होतों—एवढीं दोन पानें वाचलीं कीं—

पण त्या दोन पानांतल्या पहिल्या पांच ओळी वाचतांच मी गोंधळून गेलों. गोष्ट नव्हतीच ती ! कीर्तन संपलें कीं 'हेंचि दान देगा देवा' म्हणतात ना ? त्याचेंच अनुकरण त्या लेखकानें केलें होतें.

पुस्तक मिटून बाजूला ठेवण्याच्या बेतांत होतों मी. पण त्या पानावरल्या मधल्याच एका वाक्यानें माझें लक्ष वेधून घेतलें. त्यांत लेखकानें आपल्या पत्नीचे मनःपूर्वक आभार मानले होते.

मला वाटलें—सदरहू लेखकमहाशयाची बायको चांगली सुशिक्षित असेल. तिनें लेखनाच्या कामीं त्याला खूप मदत केली असेल. हो ! लेखक म्हटला कीं त्याचें अक्षर हें वाईट असायचेंच ! तें अक्षर लावून तिनें त्याच्या लिखाणाची सुंदर मुद्रणप्रत तयार केली असेल—

कल्पनेच्या पतंगाची दोरी आंखडून मी पुस्तकांतला तो भाग वाचूं लागलों. लेखक शांतपणानें म्हणत होता : 'मी माझ्या पत्नीचा अत्यंत आभारी आहे. सिनेमाला जातांना प्रत्येक वेळीं मी बरोबर असलेंच पाहिजे असा तिनें हट्ट धरला असता तर या पुस्तकांतल्या कित्येक गोष्टी लिहायला मला सवडच मिळाली नसती !'

हें वाक्य वाचून मी स्वतःशींच हंसलों आणि पुढला मजकूर मोठ्या उत्सुकतेनें वाचूं लागलों.

लेखकानें आपल्या खोलीच्या वर राहणाऱ्या व नृत्याचे धडे घेणाऱ्या बाईचेहि आभार मानले होते. कारण ती जर चोवीस तास त्याच्या डोक्यावर नाचत राहिली असती तर त्याला लेखनाला स्वास्थ्यच मिळालें नसतें.

मीं पुढल्या भागावर नजर टाकली. त्याची आभारांची यादी खूपच मोठी झाली होती. तिच्यांत निर्भेळ दारू देणाऱ्या दुकानदाराचा सुद्धां समावेश केला होता त्यानें !

ही यादी वाचतांना मला हंसूं आलें नाहीं असें नाहीं. ती तयार करतांना स्मरणशक्तीपेक्षांहि विनोदबुद्धीचाच सदरहू लेखकानें अधिक उपयोग केला होता हें खरें ! पण एकीकडे हंसत असतांना दुसरीकडे माझें मन म्हणत होतें–' या विनोदाच्या मागें एक नाजूक भावना लपलेली आहे–एक चिरंतन सत्य या विनोदाच्या बुरख्यांतूनहि बाहेर डोकावून पाहत आहे–किती सूक्ष्म ऋणानुबंधानें आपण सर्व बांधले गेलों आहों हें त्याच्यांतून सूचित होत आहे.'

उठल्या सुटल्या तोंडाचा चंबू करून ' थँक्यू ' म्हणत सुटणाऱ्या माणसांचा मला राग येतो. सभेच्या शेवटीं आभार-प्रदर्शनाकरितां उठून रंगाचा बेरंग करणाऱ्या प्राण्याबद्दल तर मला तिटकाराच वाटतो. अंतःकरणपूर्वक आभार मानण्याऐवजीं आपल्या तुटपुंज्या विद्वत्तेचें प्रदर्शन करण्यांतच त्याला अधिक धन्यता वाटते. पण कृत्रिम फुलांना वास येत नाहीं, म्हणून कांहीं कुणी वेलीवर उमललेल्या फुलांचा वास घेतल्याशिवाय राहत नाहीं. आभारांचेंहि तसेंच आहे.

पत्नीपासून दारू-दुकानदारापर्यंत सर्वांचे आभार मानणाऱ्या त्या लेखकाप्रमाणें मीहि मधूनमधून अनेकांचे आभार मानीत असतों. अरुंद रस्त्यानें जातांना समोरून मोटार लॉरीचें धूड येत असावें ! तें अंगावरून निघून गेल्यावर नि धुळीशिवाय आणखी कांहीं प्रसाद आपल्याला मिळाला नाहीं अशी खात्री झाल्यावर मी तो भव्य रथ हांकणाऱ्या ड्रायव्हरचे मनांतल्या मनांत आभार मानतों. त्यानें थोडेंस दुर्लक्ष केलें असतें तर ' मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ' हा कालिदासाचा सिद्धान्त मला तत्काळ अनुभवाला आला असता हें मी अशा वेळीं विसरत नाहीं. खाणावळींत जेवल्यानंतर दोन-तीन दिवसांत प्रकृति बिघडली नाहीं म्हणजे तिच्या मालकाचे आभार मानण्याची हुक्कीहि मला येते. वरणांत पडलेली पाल वेळींच काढून टाकण्याची दक्षता त्याच्यासारखे लोक घेतात हें आमचें केवढें भाग्य ! नाहीं तर आमच्या नांवामागें " कै. " ही पदवी केव्हांच लागून गेली असती !

मात्र हे आभार मानतांना मधूनच माझ्या मनांत येतें—सामान्य मनुष्याचा

दृष्टि किती अधू असते ! वर्तमानकालाच्या, किंबहुना त्यांतल्या चालू घटकेच्या पलीकडे तिला कांहीं दिसतच नाहीं. नाहीं तर आपल्या आयुष्यांत ज्यांनीं ज्यांनीं आपल्यावर थोडेफार उपकार केले आहेत त्या सर्व माणसांच्या मूर्ती तिला दिसल्या असत्या आणि कृतघ्नता हा शब्द नुसता शब्दकोशांतच उरला असता !

पुंडलिकाच्या सुप्रसिद्ध कथेचेंहि हेंच मर्म असलें पाहिजे. लहानपणीं आपल्यासाठीं आईबापांनीं किती कष्ट सोसले असतील याची तरुण मनाला कल्पनाच करतां येत नाहीं. तें यौवनसुलभ उन्मादानें नाचूं लागतें. आपल्या या अवखळ नृत्यांत अत्यंत पवित्र व कोमल भावनांचा चुराडा होत आहे, आपलीं पावलें जाईजुईच्या राशीवर पडत आहेत हें त्याच्या खिजगणतींतहि नसतें. एकदां तें कळलें कीं मग मातापितरांचें महत्त्व परब्रह्मापेक्षांहि अधिक वाटूं लागतें. स्वतःच्या रंगांत रंगून जाणाऱ्या असल्या तरुण मनाचा विचार करूं लागलें कीं, कुठें तरी वाचलेला एक चुटका मला चटकन् आठवतो. देवळाचा पाया आणि त्याचा कळस यांची गोष्ट आहे ती ! अगदीं दुरूनहि भक्त आपल्याला नमस्कार करतात म्हणून तो कळस अभिमानानें फुगून जातो. त्या धुंदींत ' तुझ्याकडे कुणी ढुंकूनहि पाहत नाहीं ' म्हणून तो पायाला हिणवतो. हे अपमानाचे शब्द ऐकतांच पाया रागानें थरथर कांपूं लागतो. पण त्याच्याबरोबर आपणहि कोसळून पडणार असें वाटतांच कळस त्याला शरण जातो.

मला वाटतें—आयुष्यांत आपलीहि अशीच स्थिति होते. आईबाप, बहीणभाऊ, मित्र-स्नेही, मुलें-बाळें इत्यादिकांची खरीखुरी किंमत आपल्याला क्वचितच कळते. त्यांच्या प्रेमाच्या ओलाव्यावर आपली जीवनलता फुलत असते हें आपल्या लक्षांतच येत नाहीं. लहानसहान गोष्टी आपल्या मनासारख्या झाल्या नाहींत कीं आपण त्यांच्यावर रागवतों, त्यांना तुच्छ लेखतों आणि त्यांच्यावांचून आपलें जीवन नीरस होईल हेंहि विसरून जातों. अशा वेळीं एखादा चमत्कार होऊन ज्या व्यक्तीवर आपण रागावलों आहों तिनें आपल्यावर केलेल्या उपकारांचा चित्रपट डोळ्यांपुढून जाऊं लागला तर—

असा चमत्कार होणें कांहीं अशक्य नाहीं. मी जें पुस्तक वाचीत होतों त्याच्या लेखकानें ज्या दृष्टीनें आभारांची नोंद केली आहे, त्या दृष्टीनें आपण

आपल्या आयुष्याकडे पाहूं लागलों तर जगांतलें निम्में दुःख हां-हां म्हणतां नाहींसें होईल.

आणि म्हणून मला वाटतें—डायरी ठेवण्यापेक्षां लहानपणापासून प्रत्येकानें एक आभारांचें पुस्तक ठेवायला शिकावें. आपल्यावर निरपेक्ष प्रेम करणारांची नोंद या पुस्तकांत न चुकतां त्यानें ठेवावी. मीं असें पुस्तक ठेवलें असतें तर—त्या पुस्तकावरून ओझरती नजर टाकतांच आयुष्याच्या हिशेबांत मीच जगाचें ऋण लागत आहें अशी माझी खात्री झाली असती !

आणखी एक विचार मनांत येतो अशा वेळीं ! मीं असलें पुस्तक ठेवलें नाहीं म्हणून जगाचें कांहीं फारसें बिघडलें नाहीं. पण हिटलरला मात्र ही संवय कुणी तरी लहानपणापासून लावायला हवी होती. अशी संवय त्याला लागली असती तर वर्षानुवर्षे दररोज सकाळीं महायुद्धाचीं भयंकर वर्णनें वाचण्याचा प्रसंगच आपल्यावर आला नसता !

# मित्र कसे मिळवावेत ? ५

रामभाऊच्या खोलींत मीं पाऊल टाकलें मात्र—माझा अगदीं दगडी पुतळा झाला !

अपघातांच्या व अत्याचारांच्या भयंकर बातम्या रोज रोज वाचणाऱ्या माझ्या वाचकमित्रांच्या डोळ्यांपुढें भलतींच कल्पनाचित्रें तरळूं लागतील ! म्हणून आधींच सांगून टाकतों कीं, रामभाऊ बिछान्यावर निपचित पडलेला असून त्याच्या उशाजवळ तळाशीं काळसर चोथा असलेला पेला पडला होता, असलें कांहीं दृश्य त्या खोलींत बिलकूल नव्हतें. ' वस्तरा ', ' रक्ताचें थारोळें ', वगैरे वगैरे शब्दांनीं डोळ्यांपुढें उभ्या राहणाऱ्या भयानक चित्राचाहि माझ्या आश्चर्याशीं संबंध नव्हता. मी चकित होण्याचें कारण दुसरेंच होतें : रामभाऊ एक पुस्तक वाचीत पडला होता.

आपल्या मनानें प्रत्येक व्यक्तीचें एका विशिष्ट बैठकीचें एक चित्र काढून ठेवलेलें असतें. बुद्ध हा शब्द उच्चारला, कीं माझ्या डोळ्यांपुढें गंभीर ध्यानस्थ मूर्तिच उभी राहते. जगांतल्या विलक्षण दुःखाची पहिली तीव्र जाणीव झाली, त्या वेळचा गोंधळून गेलेला सिद्धार्थ कांहीं केल्या मला डोळ्यांपुढें उभा करतां येत नाहीं. गांधीजींची आठवण झाली कीं दांडीयात्रेच्या दिव्य दृश्यांतली किंचित् वांकलेली पण आपल्या हातांतल्या काठीनें धरित्रीला वांकविणारी महात्माजींची कृश शरीरयष्टि माझ्या पुढून जात आहे असा मला भास होतो. गांधीजी चरखा चालवीत आहेत अशीं अनेक छायाचित्रें मी पाहिलीं असतील. पण त्यांतलें एकहि माझी कल्पना मूर्तिमंत उभें करूं शकत नाहीं.

मानसशास्त्र या कोड्याचा उलगडा कोणत्याहि रीतीनें करो, पण रामभाऊचा आणि माझा अनेक वर्षे परिचय असूनहि त्याचें नांव घेतलें कीं माझ्या डोळ्यांपुढें पत्त्यांत गुंगून गेलेला एक साधाभोळा कारकून दिसूं लागतो. त्याच्या खोलींत मीं पाऊल टाकलें तेव्हां आंत दुसरें कोणी नाहीं हें मला

ठाऊक होतें. पण त्याबरोबरच आंत रामभाऊ एकटाच खेळत बसला असला पाहिजे, अशीहि मनाची वालंबाल खात्री होती.

पण खात्रीचा हा दगडी बंगला एकदम पत्त्यांचा ठरला ! रामभाऊची स्वारी आरामखुर्चीत पडली होती खरी. पण ती नुसती डोळे मिटून नाहीं-तर एक पुस्तक वाचीत ! तो पुस्तकांत इतका गुंग होऊन गेला होता कीं, मी आंत आलों हें त्याला कळलें सुद्धां नाहीं.

मी थक्कच झालों. रामभाऊची जन्मांत एखाद्या पुस्तकाशीं इतकी भयंकर दोस्ती होईल असें त्याच्या मित्रांपैकीं कुणालाहि स्वप्न सुद्धां पडलें नव्हतें. एखादी चांगली कादंबरी वाचायला दिली तरी तो ती वरवर चाळून म्हणे: ‘ आपल्याला नाहीं बुवा असल्या भाकडकथा आवडत ! एका तरुणीचें एका तरुणाशीं सूत जुळतें हें दाखवायला चारचारशें पानें खरडण्याची काय जरूरी आहे ? आम्हीं राजाराणीचें लग्न सुद्धां पांच मिनिटांत जुळवितों ! ’

अशा या शुक्राचार्याच्या तपश्चर्येचा भंग कोणत्या रंभेनें केला हें पाहण्यासाठीं मी मांजराच्या पावलांनीं पुढें झालों. पाहिलें तों रामभाऊची विलक्षण समाधि लागली आहे !

मी हळूच खोकलों ! थोडासा खाकरलोंहि. शिंकलोंसुद्धां असतों; पण खोकल्याइतकी शिंक हुकमी नसल्यामुळें माझा नाइलाज झाला.

रामभाऊनें पापणीसुद्धां वर केली नाहीं. माझ्या मनांत आलें—माकड-खोकल्यानें सुद्धां रामभाऊच्या या रंगाचा भंग होणें शक्य दिसत नाहीं.

मीं मोठ्यानें प्रश्न केला, ‘ काय रामभाऊ, कसलं वाचन चाललंय ? ’

मान वर न करतांच रामभाऊनें उत्तर दिलें, ‘ काय सुंदर पुस्तक आहे ! दहा लाखांवर खपलंय तें कांहीं उगीच नाहीं ! ’

दहा लाखांवर खप झालेलें पुस्तक ! कुठची तरी अतिशय लोकप्रिय इंग्रजी कादंबरी रामभाऊच्या हाताला चुकून लागली असावी अशी माझी खात्री झाली. अभाग्याच्या घरीं आलेल्या या कामधेनूचें नांव—

मीं प्रश्न केला, ‘ कुणाची रे कादंबरी वाचतोयस् ? ’

‘ कादंबरी ? ’ एवढा शब्द उच्चारून रामभाऊ आपला हंसत सुटला. हंसत हंसतच तो म्हणाला, ‘ रात्रीं तीन वाजतां हें पुस्तक संपवून निजलों.

पण उठल्याबरोबर पुन्हां त्याची आठवण झाली. चहा घेऊन जो वाचायला बसलों—'!

रामभाऊला एका पुस्तकानें इतकें वेड लावावें ? विश्वामित्राला मोहिनी घालायला मेनकेलाच स्वर्गांतून खालीं उतरावें लागलें होतें. या पुस्तकांतहि तसेंच विलक्षण सौंदर्य असलें पाहिजे. नाहीं तर आमचा हा बिझिक-सम्राट्—

मीं उत्सुकतेनें रामभाऊच्या हातांतलें पुस्तक काढून घेऊन त्याचें नांव पाहिलें—' How to win friends and influence people ?'

आतां हंसण्याचा हक्क माझा होता. मीं रामभाऊची थट्टा करण्याकरितां म्हटलें, ' भले महाराज ! ब्रह्मचाऱ्यानें शूर्पणखेवर भाळावें तसला प्रकार दिसतोय हा ! काय पण पुस्तक शोधून काढलेंस ? ' मित्र कसे मिळवावेत ? ' अरे बाबा, मित्र म्हणजे काय मंडईतली भाजी आहे होय ? आग्ऱ्याच्या प्रवासाचं पुस्तक वाचून कांहीं ताजमहाल पाहायला मिळत नाहीं कुणाला ! '

आपल्या दैवताची थट्टा कुठला भगत सहन करूं शकेल ? रामभाऊ रागानेंच म्हणाला, ' हें पहा, पुस्तक वाचल्याशिवाय उगीच अद्वातद्वा टीका करण्यांत काय अर्थ आहे ? रामदासांनींच म्हटलं आहे कीं—तें जाऊं द्या. आधीं याचीं पांचदहा पानें तरी वाच नि मग—'

रामभाऊनें मला पंचाहत्तरावें पृष्ठ काढून दिलें नि चहा सांगण्याकरितां तो घरांत निघून गेला.

मी वाचूं लागलों. प्रकरणाच्या आरंभींच लिहिलें होतें, ' लोकप्रिय होण्याचे सहा मार्ग ! '

मी हंसत हंसत मनांत म्हटलें—' जिथें शेंकडा नव्याण्णव लोकांना एकसुद्धां मार्ग सांपडत नाहीं, तिथें हा लेखक सहा मार्ग दाखवावयाला तयार आहे ! चैन आहे म्हणायची ! आंधळा मागतो एक डोळा नि देव देतो सहा, अशांतला मामला दिसतोय हा ! '

मी तें प्रकरण वाचूं लागलों. लेखकानें आरंभींच लोकप्रियता मिळविण्याकरितां एक गुरु करणें आवश्यक आहे असें प्रतिपादन केलें आहे. तो गुरु म्हणजे कुत्रा ! लेखकमहाशय पुढें म्हणत होते, ' कुत्र्याचें प्रेम किती निरपेक्ष असतें ! त्याला

कांहीं तुमच्याशीं किफायतशीर सौदा करायचा नसतो किंवा तुमच्याशीं लग्नहि लावायचें नसतें !'

नेपोलियनसारखा मनुष्य मित्राला कां महाग झाला, थर्स्टन नांवाचा जादुगार आपले खेळ सुरू करण्यापूर्वी ' हे सारे प्रेक्षक माझे मित्र आहेत— माझं यांच्यावर प्रेम आहे ' हीं वाक्यें स्वतःशींच कां घोकीत असे, मित्रांचे वाढदिवस डायरींत टिपून ठेऊन त्या दिवशीं त्यांना आनंददर्शक तारा पाठविण्यानें स्नेहाला गाढ स्वरूप कसें येतें, मागच्या महायुद्धांत कैसरचा पराभव होऊन जीव बचावण्यासाठीं त्याला हॉलंडमध्यें जावें लागलें असतांना एका लहान मुलानें त्याला एक गोड पत्र कसें लिहिलें आणि या पत्राचा परिणाम कैसरचें त्या मुलाच्या विधवा आईशीं लग्न होण्यांत कसा झाला इत्यादि गोष्टी लेखकानें या प्रकरणांत मोठ्या चटकदार रीतीनें निवेदन केल्या होत्या.

मात्र ग्यानबाची मेख पुढेंच होती ! प्रकरणाच्या शेवटीं प्रख्यात मानसशास्त्रज्ञ अॅडलर याच्या आधारानें त्यानें एक उपदेशपर छोटें वाक्य लिहिलें होतें: 'Become genuinely interested in other people.' लोकप्रिय होण्याचा मार्ग एकच आहे—' दुसऱ्या लोकांकडे लक्ष द्या—आपल्या भोंवतालच्या माणसांशीं समरस व्हा—मित्रांच्या जीवनांत मिसळून जा—'

यांतलें प्रत्येक वाक्य सांगायला सोपें आहे. पण आचरणांत आणायला ?

हें पुस्तक काल रात्रीं आधाशीपणानें वाचून पुन्हां सकाळीं तें अगदीं तन्मयतेनें वाचणाऱ्या रामभाऊचें मला हंसूं येऊं लागलें.

माझ्यांतला टीकाकार पुरा जागा झाला ! तो म्हणत होता—' पोहण्यावरलीं पुस्तकें वाचून कुणी कधीं पोहायला शिकला आहे का ? त्यासाठीं पाण्यांतच उतरावें लागतें नि प्रसंगीं गटंगळ्याहि खाव्या लागतात. पाकशास्त्र वाचून सुगरण झालेली एक तरी बाई तुम्हीं आम्हीं पाहिली आहे काय ? चांगला स्वयंपाक करणाऱ्या माणसांनीं आपले हात आधीं अनेकदां चुलीपाशीं भाजून घेतलेले असतात ! कांहीं झालें तरी पुस्तकें हीं जीवनाचीं तुटक नि अन्धुक प्रतिबिंबें असतात. तीं माणसाला काय शिकविणार ? स्वतःचें कसलेंहि प्रतिबिंब पाहण्यांत माणसाला आनंद वाटतो, म्हणून जगांत आरसे आणि पुस्तकें खपतात एवढेंच !'

रामभाऊनें आणलेला चहा घेतां घेतां माझी दृष्टि पुस्तकाच्या मुखपृष्ठावरल्या पहिल्याच वाक्याकडे गेली. एकं, दहं, शतं—अरे बापरे ! या पुस्तकाच्या दहा लाखांवर प्रती खपल्या आहेत ! ' आजच्या काळांतलें ललितेतर वाङ्मयांतलें अत्यंत लोकप्रिय पुस्तक ' असें याच्यावर चक्क लिहिलेंच आहे कीं !

मी मनांतल्या मनांत म्हणत होतों—जग हा वेड्यांचा बाजार आहे हें वाक्य ज्यानें प्रथम उच्चारलें, तो जगांतला सर्वांत शहाणा मनुष्य असला पाहिजे. दुनियेला कुणीतरी झुकानेवाला हवा असतो हेंच खरें ! ' सत्यनारायण केला म्हणजे संकटें टळतात ' असें सांगणारा भिक्षुक आणि असें वागलें किंवा तसें वागलें म्हणजे मित्र मिळतात असें सांगणारा लेखक या दोघांत काय अंतर आहे ? दोघेही लोकांच्या भोळ्या भावनेचा किंबहुना दुबळ्या मनोवृत्तीचा फायदा घेतात ! नाहीं का ?

आपल्याला पुष्कळ मित्र असावेत असें कुणाला वाटत नाहीं ? विद्येला संपत्ति म्हणण्याचा प्रघात फार जुना असला तरी मोठें मित्रमंडळ हेंच माणसाच्या आयुष्यांतलें खरेंखुरें वैभव असतें. पण जगांतलें कुठलेंहि वैभव केवळ पुस्तकी ज्ञानानें संपादन करणें शक्य आहे काय ?

माझ्या हातांतलें पुस्तक आणि घोड्यांच्या शर्यतींच्या ' टिप्स ' देणारें चोपडें यांत कांहींतरी विलक्षण साम्य आहे असें मला वाटूं लागलें. दोन्हींचा खप विलक्षण होण्याचें कारण एकच–कष्टावांचून कुठलीहि गोष्ट शक्य तितक्या लवकर आणि शक्य तितकी विपुल मिळविण्याची मनुष्याची इच्छा ! घोड्यावर पांच आणे लावून एखाद्याला एखाद्या वेळीं पांच रुपये मिळाले असतील ! पण तेवढ्यामुळें शर्यत हा कांहीं द्रव्यसंपादनाचा विश्वसनीय मार्ग होऊं शकत नाहीं. शर्यतीच्या पत्रकांत दिलेल्या ' टिप्स ' अनेक वेळां चुकतात. पण त्यांची लोकप्रियता कांहीं केल्या कमी होत नाहीं. मित्र मिळविण्याचा राजमार्ग दाखविणारें माझ्या हातांतलें पुस्तक इतकें खपलें याचें कारण माणसाच्या या आशाळ स्वभावांतच आहे, लेखकाच्या सामर्थ्यांत नाहीं.

चहा होतांच रामभाऊ म्हणाला, ' तूं हें पुस्तक एकदां वाच नि मग—'

पाहुण्याला कुणी पक्वान्नाचा आग्रह करणार नाहीं, इतका मीं तें पुस्तक वाचलेंच पाहिजे असा रामभाऊनें हट्ट धरला.

चारदोन दिवस पुस्तक घरीं ठेवायचें नि न वाचतांच तें रामभाऊकडे साभार परत नेऊन द्यायचें असा बेत करीत मी घरीं आलों. रामभाऊला चिडविण्याकरितां त्यांतलीं कांहीं वाक्यें लक्षांत ठेविलीं पाहिजेत म्हणून दुसरे दिवशीं सकाळीं पडल्या पडल्या मी तें चाळूं लागलों—

आणि मग मात्र—

प्रवाहाबरोबर वाहून जाणाऱ्या होडीप्रमाणें मी तें झरझर वाचीत गेलों. पुस्तक संपलें केव्हां हें मला कळलें नाहीं. पण संपलें तेव्हां मोठी चुटपुट लागली माझ्या मनाला.

काल सकाळीं या पुस्तकावर खूष झाल्याबद्दल मी रामभाऊला हंसलों होतों. पण आज ? माझें मलाच हंसूं आलें. भुईमुगाच्या उकडलेल्या शेंगा किंवा काजूगर खायला लागल्यावर 'आतां पुरे' असें मनाला पुनः पुनः बजावीत माणसाचा हात समोरच्या पदार्थाकडे जातोच कीं नाहीं ? या पुस्तकाच्या बाबतींत अगदीं तशी स्थिति झाली होती माझी. 'एवढें प्रकरण वाचलें कीं बस्स !' असें म्हणत मीं सबंध पुस्तकाचा फडशा पाडला होता.

तसें पाहिलें तर या पुस्तकांत कांहीं नवीन सुंदर कल्पना होत्या, नाजुक नर्मविनोद होता, मानवी स्वभावाचें सूक्ष्म चित्रण होतें किंवा मनाला ओढ लावणारें एखादें सजीव कथानक होतें असें मुळींच नाहीं. या पुस्तकांतल्या प्रत्येक प्रकरणांत एखाद्या बहुश्रुत मित्राच्या गप्पांपेक्षां अधिक असें कांहींच नव्हतें. पुस्तकाच्या शेवटीं संसार सुखाचा करण्याकरितां लेखकानें ज्या अनेक युक्त्या सांगितल्या आहेत त्या अगदीं सर्वसामान्य मनुष्याला माहीत असलेल्या अशाच होत्या.

या बाबतींत लेखकानें पुरुषांना उपदेश केला होता—स्त्रीला आपण सुंदर दिसावें व लोकांनीं त्या सौंदर्याची प्रशंसा करावी अशी फार इच्छा असते. एका अठ्ठयाणव वर्षांच्या पणजीबाईला तिचा लहानपणींचा फोटो दाखविला तेव्हां दृष्टि मंद असल्यामुळें तिनें जें पहिलें वाक्य उच्चारलें तें हें होतें—'या फोटोंत माझा पोशाख कसा आहे तो सांगा ना ?' जी गोष्ट वेषभूषेची, तीच पाककौशल्याची. रशियामध्यें मेजवानी संपल्यावर स्वयंपाक्याला दिवाणखान्यांत आणून पाहुण्यांनीं त्याचें अभिनंदन करण्याची पद्धत होती, ती कांहीं उगीच

नाहीं. प्रत्येक नवऱ्यानें या दोन्ही बाबतींत बायकोची वेळोवेळीं स्तुति केली कीं संसारांतले दुःखाचे कांटे बोथट होतात आणि सुखाच्या कळ्या भराभर फुलूं लागतात.

पुस्तक वाचतांना मनांतल्या मनांत मीं या मजकुराची थट्टाच केली होती. पण पुस्तक संपल्यावर मला वाटूं लागलें—लेखकानें सांगितलेल्या या गोष्टी अगदीं साध्या असतील ! पण त्या सत्य आहेत ना ? आपल्या आजच्या जीवनांत या साध्या सत्यांचाच अभाव आहे ना ? म्हणूनच त्या सांगणें—कुणालाहि सहज पटतील अशा रीतीनें त्या सांगणें—अत्यंत आवश्यक आहे. हें पुस्तक इतकें लोकप्रिय झालें याचें कारण हेंच असलें पाहिजे.

आपल्यापैकीं प्रत्येकाला खूपखूप मित्र हवे असतात. त्या मित्राचें नि आपलें कधींहि वितुष्ट येऊं नये असें आपल्याला वाटत असतें. आपण आणि आपली पत्नी यांच्या हृदयांच्या तारा नेहमीं जुळून त्यांच्या नादलहरींवर संसारनौका तरंगत राहावी अशी उत्कट इच्छा पदोपदीं आपल्या मनांत निर्माण होते. पण प्रत्यक्षांतल्या अनुभवाचें मात्र या आशा, इच्छा आणि अपेक्षा यांच्याशीं कधींच जुळत नाहीं. पांचदहा वर्षांची जुनी मैत्री एखाद्या क्षुल्लक कारणानें मोडते, आपल्या आयुष्यांतल्या सुखाच्या साखरेंत कुणींतरी आधींच मीठ मिसळून ठेवलें आहे असा अनुभव येतो आणि आपण व आपली पत्नी यांच्यांत प्रेमकलहाऐवजीं कलहप्रेमच अधिक आहे ही गोष्ट शेजाऱ्या-पाजाऱ्यांना सुद्धां हळुहळु कळून चुकते.

पायांत कांट्यानें लहानसें टोंक मोडावें पण तेवढ्यानें मनुष्य अस्वस्थ होऊन जावा, तशी या बारीकसारीक सांसारिक दुःखांनीं आपल्या मनाची स्थिति होऊन जाते. भला मोठा विंचु चावला तर मनुष्याला मोठ्यानें रडतां येतें. इतर माणसेंहि त्याला सहानुभूति दाखवितात. पण पदोपदीं असमाधान निर्माण करणाऱ्या क्षुल्लक गोष्टी या विंचवासारख्या नसतात. त्यांना ढेंकणांचीच उपमा शोभेल. ढेंकूण माणसाला सळो का पळो करून सोडतात. पण त्या दुर्दैवी मनुष्याला आपलें हें दुःख दुसऱ्याला सांगतां सुद्धां येत नाहीं किंवा रडून व्यक्तहि करतां येत नाहीं. मित्र तुटत जाणें, साध्या व्यवहारांत फसगत होणें, घरांत उगीच बखेडे माजणें हीं सारीं दुःखें याच प्रकारचीं असतात. या दुःखांवर एखादा

उपाय मिळाला तर तो प्रत्येकाला हवा असतो. ' मित्र कसे मिळवावेत ? ' या कार्नेजीच्या पुस्तकाचा प्रचंड खप झाला याचें कारण त्यांत सामान्य मनुष्याच्या या अति सामान्य दुःखाचा त्यानें सहानुभूतीनें विचार केला आहे. इतकेंच नव्हे तर वैद्य जसा रोग्याला पथ्य सांगतो त्याप्रमाणें त्यानें अनेक मानसिक पथ्येंहि आपल्या वाचकांना सांगितलीं आहेत.

पण हीं पथ्यें सामान्य माणसांना पाळतां येतील किंवा काय अशी शंका अनेकांच्या मनांत येईल—माझ्याहि मनांत ती आलीच होती. तिचें निरसन कार्नेजीनें कुठेंच केलेलें नाहीं ! पण या पुस्तकाची अर्पणपत्रिका वाचली कीं त्याहि बाबतींत आशावादी राहायला कांहीं हरकत नाहीं असें मला वाटतें. लेखकानें आपलें हें पुस्तक होमर क्रॉय नांवाच्या तुम्हां–आम्हांला ठाऊक नसलेल्या एका मनुष्याला अर्पण केलें आहे. या आपल्या स्नेह्याचें वर्णन लेखकानें एकाच वाक्यांत केलें आहे—' ज्याला हें पुस्तक वाचण्याची मुळींच जरूरी नाहीं, त्या प्रिय मित्रास. '

असले उद्गार ऐकले कीं मला पर्जन्यवृष्टीच्या दृश्याची आठवण होते. पावसाळ्यांत आभाळ अंधारून येतें. दिव्याभोंवतीं जाड कागद गुंडाळल्यावर त्याचा उजेड जसा अगदीं अंधुक होतो तशी सूर्यप्रकाशाची स्थिति होते. शाळेंत इन्स्पेक्टरांनीं पाऊल टाकलें कीं मुलें आपापल्या वर्गांत गुपचूप बसतात ना? पांखरेंहि झाडावर किंवा घराच्या आडोशाला तशींच गप्प बसलेलीं दिसतात. चौखूर उधळलेल्या घोड्याप्रमाणें वारा सैरावैरा धांवत असतो. घराच्या खिडक्या आणि दारें धडाधड आपटूं लागतात. जगूं कांहीं बेफाम धांवऱ्या घोड्याच्या टापांचा खडखडाटच आपल्या कानांवर पडत आहे असें वाटतें.

अशा वेळीं प्रौढ माणसें खिडक्या नि दारें लावून घेऊं पाहतात. बाहेरच्या दृश्यांत त्यांना कांहींच मौज वाटत नाहीं. पण मुलें मात्र पावसाचें स्वागत करण्याकरितां घराबाहेर धांव घेतात, ‘ येरे येरे पावसा ’ हें स्वागत-गीत गाऊं लागतात. कुठल्याहि फाटक्या तुटक्या कागदांच्या होड्या करतात, आणि पावसाचे टपोरे थेंब अंगावर पडूं लागले कीं जणूं आपल्यावर पुष्पवृष्टि होत आहे, अशा आनंदानें नर्तनांत दंग होतात.

अन्नाच्या दृष्टीनें पर्जन्याचें जेवढें महत्त्व तेवढेंच आत्मविकासाच्या दृष्टीनें अश्रूंचें आहे. पण पाऊस म्हणजे चिखल, गार वारा आणि ओल्याचिंब छत्र्या यांपलीकडे जशी प्रौढांच्या दुबळ्या झालेल्या मनांची मजल जात नाहीं, त्याप्रमाणें अश्रू म्हणजे दुःख, ओलेचिंब झालेले हातरुमाल आणि सुजलेले डोळे यांपलीकडे आत्मनिष्ठ माणसाची कल्पना धांवतच नाहीं.

पण अश्रू म्हणजे दुःख या कल्पनेंत सत्याचा कितीसा भाग आहे? आज आपल्या आयुष्याचें सिंहावलोकन केलें तर प्रत्येकाला एक गोष्ट आठवून येईल. आपल्या गत आयुष्यांतल्या अनेक आनंददायक प्रसंगांचा अश्रूंशींच निकट संबंध आहे.

लहानपणीं मला पेढे फार आवडत. मी वडिलांपाशीं हट्ट धरून ते कितीदां खाल्ले असतील याची गणतीच करतां येणार नाहीं. त्या प्रसंगापैकीं एकहि मला आतां आठवत नाहीं. मी तापानें फणफणत असतांना डॉक्टरांच्या औषधानें सुद्धां मला जो आराम वाटला नव्हता, तो वडिलांच्या डोळ्यांतल्या अश्रूंनीं निर्माण केला होता ही आठवण मी कधीं विसरणार नाहीं. गुलबकावलीपासून

कालिकामूर्तीपर्यंत शेंकडों कथा मी बाळपणीं आवडीनें वाचल्या होत्या; भोळ्या चाळूच्या संगतींत तर मी खदखदां हंसलों होतों. पण लहानपणच्या त्या अधाशी वाचनापैकीं एकच गोष्ट जणूं कांहीं काल घडली असें मला अद्यापि वाटतें.

बाहेर मध्यरात्रीचा काळोख पसरला आहे, घरांतलीं सर्व माणसें गाढ झोपलीं आहेत. मी अंथरूणावर ' गड आला पण सिंह गेला ' वाचीत पडलों आहें. एवढें प्रकरण झालें कीं, दिवा मालवायचा नि झोपी जायचें, असा मी मनांतल्या मनांत निश्चय करीत आहे; पण उन्हाळ्यांत प्रशस्त विहिरींत पोहतांना ' आतां पुरे ' असें कधीं मनाला वाटतें का ? आश्विन-कार्तिकांतल्या चादण्यांत फिरतांना ' बस्स ' हा उद्गार कधीं कुणाच्या तोंडून निघाला आहे का ? हरिभाऊंची ती कादंबरी वाचतांना माझी स्थितिहि तशीच झाली आहे. शेवटीं कादंबरी संपते. शेल्यानें आच्छादलेलें तानाजीचें शव पाहून शिवाजीमहाराजांच्या डोळ्यांत उभे राहिलेले अश्रू माझ्याहि डोळ्यांतून पाझरूं लागतात.

तो क्षण मी कधींहि विसरणार नाहीं. अश्रूंचें पावित्र्य त्या क्षणीं मला पटलें. अश्रूंच्या उदात्तत्वाची त्या एका पळांत मला प्रचीति आली. असल्या अश्रूंची माळ हाच आत्मनिष्ठ मनुष्याला जगाशीं बांधणारा प्रेमपाश आहे याची अंधुक जाणीव त्या क्षणीं मला झाली.

आणि ती जाणीव गेल्या तीस वर्षांतल्या विविध अनुभवांनीं एकसारखी वाढतच आहे. मात्र या अनुभवांनीं शिकविलेली एक गोष्ट मी विसरूं शकत नाहीं. मित्रां-प्रमाणें अश्रूंतहि अनेक प्रकार असतात. कांहीं अश्रू स्वार्थी असतात; कांहीं अश्रू दुबळे असतात. असल्या अश्रूंनीं आत्म्याचा विकास होत नाहीं. आतां जिंकाव-याला जग उरलें नाहीं, म्हणून शिकंदर ढळढळा रडला असें सांगतात. पण त्या दिग्विजयी वीराच्या अश्रूंपेक्षां हिंगण्याच्या शाळेंतल्या एका शिक्षकाचे अश्रू मला अधिक मोलाचे वाटतात.

रागिणीकार वामनराव जोश्यांची त्यांच्या एका विद्यार्थिनीनें सांगितलेली आठवण आहे ही :

" मॅट्रिकच्या वर्गामधला शेवटचा दिवस. शेवटची प्रार्थना. प्रार्थना संपली. वामनराव विद्यार्थिनींना निरोप देतांना म्हणाले, ' मुलींनो, मी तुम्हांला पुष्कळ

# अश्रु

# ६

" चित्रपट फार चांगला आहे. पण—"

मनुष्य हा स्वभावतः कवि नसून टीकाकार आहे, या वाक्याची आठवण होऊन मी स्वतःशींच हंसलों. एखादी गोष्ट कितीहि आवडली तरी तिच्यांत कांहीं ना कांहीं दोष दाखविल्याखेरीज माणसाला चैनच पडत नाहीं जणूं कांहीं! नाहीं तर चित्रपट फार चांगला आहे, एवढेंच बोलून माझा मित्र गप्प बसला नसता का?

मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून तो म्हणाला, " या चित्रपटांतले दोन-तीन सीन कापायला हवे होते!"

सदरहू चित्रपटांत प्रेमाची रंगपंचमी भडक रंगांनीं साजरी केली असावी असा संशय येऊन मीं विचारलें, " अश्लीलबिश्लील कांहीं–?"

" छे रे! कृष्णराव मराठेसुद्धां तक्रार करणार नाहींत इतका सोवळा चित्र-पट आहे हा! पण—"

सामान्य मनुष्याचा 'पण' शब्द जुन्या काळच्या स्वयंवरांतल्या 'पणा' इतकाच त्रासदायक असतो, या उक्तीचा अनुभव प्रत्येकाला दररोज पंचवीस वेळां तरी येतोच. त्या अनुभवाची आजची माझी सव्विसावी वेळ असल्यामुळें मी उतावळेपणानें म्हटलें, " कुठलीं दृश्यं कापायला हवींत तें सांग ना!"

" हा चित्रपट पाहतांना दोनतीन ठिकाणीं अगदीं रडायला येतं बघ. अरे, मी एवढा पुरुषासारखा पुरुष, पण माझ्या डोळ्यांत सुद्धां अश्रु उभे राहिले! मग बायकांची गोष्ट तर विचारूंच नकोस. त्यांच्याजवळ हातरुमालाऐवजीं टॉवेल असते तर ते सुद्धां ओलेचिंब झाले असते! लोक पैसे देऊन चित्रपट पाहायला येतात ते काय रडण्याकरितां?"

या मित्राशीं वाद घालण्यांत कांहींच अर्थ नव्हता. स्वतःच्या मताला जळू-प्रमाणें चिकटून राहायची त्याच्या स्वभावाची खोड मला पुरी ठाऊक होती, म्हणून मीं त्याला म्हटलें, " मग हा चित्रपट पाहायलाच हवा मला!"

त्यानें उत्तरादाखल नुसती मान उडविली. " तूं रडवा आहेस. तेव्हां तुला असले रडके चित्रपटच आवडायचे ! " एवढा अर्थ त्याच्या मानेच्या त्या लहानशा झटक्यांत भरला होता !

माझ्या या मित्राप्रमाणेंच अश्रूंविषयीं बहुतेकांचें प्रतिकूल मत असतें, असा माझा अनुभव आहे. या लोकांना अश्रूंची बॉंबगोळ्याहूनहि अधिक भीति वाटते ! करुणरसानें भरलेली एखादी कादंबरी वाचायची म्हटलें कीं यांच्या कपाळाला आठ्या पडल्याच म्हणून समजावें. आयुष्य हें गीत आहे, जीवन हें नृत्य आहे, इत्यादि सुभाषितें या लोकांच्या जिभेवर नेहमीं नाचत असतात. जीवनाची कल्पना चित्राच्या रूपानें व्यक्त करायला यांना सांगितलें तर ' ऊठ साकी दे भरोनी वारुणीचा एक प्याला ' हें गीत गाणाऱ्या उमरखय्यामचीच मूर्ति ते चितारतील. त्यांच्या कोशांत अश्रू म्हणजे दुःख आणि हास्य म्हणजे सुख, एवढेच अर्थ दिलेले असतात. त्यामुळें समुद्रकिनाऱ्यावरले लहान लहान खेकडे कसलाहि आवाज झाला कीं जशी वाळूंतल्या बिळाकडे चटकन् धांव घेतात, त्याप्रमाणें कुठेंहि अश्रू दिसले कीं, सदान्कदा आनंदाचा पाठलाग करणारी ही मंडळी त्यांच्याकडे त्वरेनें पाठ फिरवितात.

या स्वप्नाळुपणाचें राहून राहून मला हंसूं येतें ! आयुष्य हें गीत आहे, नाहीं कोण म्हणतो ? पण तें जसें रडगाणें नाहीं, तशी निव्वळ शृंगारानें भरलेली उन्मादक लावणीहि नाहीं ती ! आणि जीवनाची नृत्याशीं तुलना करायचा या सुखलोलुप मंडळींचा अट्टाहासच असला तर मी त्यांना म्हणेन : ' जीवन हें नृत्य आहे असें तुम्ही म्हणतां. कबूल ! पण तें नृत्य नर्तिकेचें नाहीं; शंकराचें आहे ! जीवन हें तांडवनृत्य आहे ! '

क्रॉम्वेल मोठा पराक्रमी पुरुष होता. पण त्याचें रूप यथातथाच होतें. तथापि त्यानें आपली छबी काढणाऱ्या चित्रकाराला बजावून सांगितलें, ' मी जसा आहें तसेंच माझें चित्र काढ. ' मानवी जीवनहि कलावंतापाशीं हीच मागणी करीत असतें. पण अशा चित्रणांत करुणरसाचे प्रसंग आले कीं माझ्या मित्रासारखे दुबळे जीव डोळे झांकून घेतात आणि ओरडतात, ' छेः ! हें अगदीं असह्य आहे बुवा ! रडून रडून आमचे डोळे सुजतात ना ? आम्ही पैसे देऊन चित्रपट पाहातों नि कादंबऱ्या विकत घेतों तें काय लहान पोरांसारखं रडत बसायला ? '

असले उद्गार ऐकले कीं मला पर्जन्यवृष्टीच्या दृश्याची आठवण होते. पावसाळ्यांत आभाळ अंधारून येतें. दिव्याभोंवतीं जाड कागद गुंडाळल्यावर त्याचा उजेड जसा अगदीं अंधुक होतो तशी सूर्यप्रकाशाची स्थिति होते. शाळेंत इन्स्पेक्टरांनीं पाऊल टाकलें कीं मुलें आपापल्या वर्गांत गुपचूप बसतात ना ? पांखरेंहि झाडावर किंवा घराच्या आडोशाला तशींच गप्प बसलेलीं दिसतात. चौखूर उधळलेल्या घोड्याप्रमाणें वारा सैरावैरा धांवत असतो. घराच्या खिडक्या आणि दारें धडाधड आपटूं लागतात. जणूं कांहीं बेफाम धांवत्या घोड्याच्या टापांचा खडखडाटच आपल्या कानांवर पडत आहे असें वाटतें.

अशा वेळीं प्रौढ माणसें खिडक्या नि दारें लावून घेऊं पाहतात. बाहेरच्या दृश्यांत त्यांना कांहींच मौज वाटत नाहीं. पण मुलें मात्र पावसाचें स्वागत करण्याकरितां घराबाहेर धांव घेतात, ‘ येरे येरे पावसा ’ हें स्वागत-गीत गाऊं लागतात. कुठल्याहि फाटक्या तुटक्या कागदांच्या होड्या करतात, आणि पावसाचे टपोरे थेंब अंगावर पडूं लागले कीं जणूं आपल्यावर पुष्पवृष्टि होत आहे, अशा आनंदानें नर्तनांत दंग होतात.

अन्नाच्या दृष्टीनें पर्जन्याचें जेवढें महत्त्व तेवढेंच आत्मविकासाच्या दृष्टीनें अश्रूंचें आहे. पण पाऊस म्हणजे चिखल, गार वारा आणि ओल्याचिंब छत्र्या यांपलीकडे जशी प्रौढांच्या दुबळ्या झालेल्या मनांची मजल जात नाहीं, त्याप्रमाणें अश्रू म्हणजे दुःख, ओलेचिंब झालेले हातरुमाल आणि सुजलेले डोळे यांपलीकडे आत्मनिष्ठ माणसाची कल्पना धांवतच नाहीं.

पण अश्रू म्हणजे दुःख या कल्पनेंत सत्याचा कितीसा भाग आहे ? आज आपल्या आयुष्याचें सिंहावलोकन केलें तर प्रत्येकाला एक गोष्ट आठवून येईल. आपल्या गत आयुष्यांतल्या अनेक आनंददायक प्रसंगांचा अश्रूंशींच निकट संबंध आहे.

लहानपणीं मला पेढे फार आवडत. मी वडिलांपाशीं हट्ट धरून ते कितीदां खाल्ले असतील याची गणतीच करतां येणार नाहीं. त्या प्रसंगापैकीं एकहि मला आतां आठवत नाहीं. मी तापानें फणफणत असतांना डॉक्टरांच्या औषधानें सुद्धां मला जो आराम वाटला नव्हता, तो वडिलांच्या डोळ्यांतल्या अश्रूंनीं निर्माण केला होता ही आठवण मी कधीं विसरणार नाहीं. गुलबकावलीपासून

कालिकामूर्तीपर्यंत शेंकडों कथा मी बाळपणीं आवडीनें वाचल्या होत्या; भोळ्या चाळूच्या संगतींत तर मी खदखदां हंसलों होतों. पण लहानपणच्या त्या अधाशी वाचनापैकीं एकच गोष्ट जणूं कांहीं काल घडली असें मला अद्यापि वाटतें.

बाहेर मध्यरात्रीचा काळोख पसरला आहे, घरांतलीं सर्व माणसें गाढ झोपलीं आहेत. मी अंथरूणावर ' गड आला पण सिंह गेला ' वाचीत पडलों आहें. एवढें प्रकरण झालें कीं, दिवा मालवायचा नि झोपी जायचें, असा मी मनांतल्या मनांत निश्चय करीत आहे; पण उन्हाळ्यांत प्रशस्त विहिरींत पोहतांना ' आतां पुरे ' असें कधीं मनाला वाटतें का ? आश्विन-कार्तिकांतल्या चादण्यांत फिरतांना ' बस्स ' हा उद्गार कधीं कुणाच्या तोंडून निघाला आहे का ? हरिभाऊंची ती कादंबरी वाचतांना माझी स्थितिहि तशीच झाली आहे. शेवटीं कादंबरी संपते. शेल्यानें आच्छादलेलें तानाजीचें शव पाहून शिवाजीमहाराजांच्या डोळ्यांत उभे राहिलेले अश्रू माझ्याहि डोळ्यांतून पाझरूं लागतात.

तो क्षण मी कधींहि विसरणार नाहीं. अश्रूंचें पावित्र्य त्या क्षणीं मला पटलें. अश्रूंच्या उदात्तत्वाची त्या एका पळांत मला प्रचीति आली. असल्या अश्रूंची माळ हाच आत्मनिष्ठ मनुष्याला जगाशीं बांधणारा प्रेमपाश आहे याची अंधुक जाणीव त्या क्षणीं मला झाली.

आणि ती जाणीव गेल्या तीस वर्षांतल्या विविध अनुभवांनीं एकसारखी वाढतच आहे. मात्र या अनुभवांनीं शिकविलेली एक गोष्ट मी विसरूं शकत नाहीं. मित्रां-प्रमाणें अश्रूंतहि अनेक प्रकार असतात. कांहीं अश्रू स्वार्थी असतात; कांहीं अश्रू दुबळे असतात. असल्या अश्रूंनीं आत्म्याचा विकास होत नाहीं. आतां जिंकाव-याला जग उरलें नाहीं, म्हणून शिकंदर ढळढळा रडला असें सांगतात. पण त्या दिग्विजयी वीराच्या अश्रूंपेक्षां हिंगण्याच्या शाळेंतल्या एका शिक्षकाचे अश्रू मला अधिक मोलाचे वाटतात.

रागिणीकार वामनराव जोश्यांची त्यांच्या एका विद्यार्थिनीनें सांगितलेली आठवण आहे ही :

" मॅट्रिकच्या वर्गामधला शेवटचा दिवस. शेवटची प्रार्थना. प्रार्थना संपली. वामनराव विद्यार्थिनींना निरोप देतांना म्हणाले, ' मुलींनो, मी तुम्हांला पुष्कळ

बोललों असेन, पण तें सारं तुमच्या बऱ्याकरितांच होतं. आतां तुम्ही येथून दूर जाणार. जिथं जाल तिथं सुखी असा, हाच माझा तुम्हांला आशीर्वाद.' हें बोलतां बोलतां त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले."

असल्या अश्रूंनींच आजपर्यंत जगांतल्या मानवतेचें पोषण केलें आहे. बुद्धा-पासून गांधींपर्यंत अनेक महात्म्यांनीं गाळलेल्या अश्रूंमुळेंच पाशवी मनोवृत्तीच्या वणव्यांत जळणाऱ्या जगाचा अद्यापिहि माणुसकीवरील विश्वास उडून गेलेला नाहीं. आणि म्हणूनच माझे अत्यंत आवडते कवीसुद्धां अश्रूंची फुलांशीं तुलना करूं लागतात तेव्हां चित्रपटांतले करुणरसाचे प्रसंग कापून टाकण्याची सूचना करणाऱ्या माझ्या मित्राइतकेंच तेहि जीवनाचें अज्ञान प्रकट करतात असें मला वाटतें. हास्य हें जीवनवृक्षाचें फूल आहे; पण अश्रू हें त्याचें फळ आहे.

# टॉलस्टॉयचीं पुस्तकें ७

ट्रंक पुस्तकांनीं अगदीं भरून गेली. तरी माझा पुतण्या कपाटांतलीं पुस्तकें काढीतच होता! चॉकोलेटच्या बरणींत हात घालून मूठ भरून घेतली तरी लहान मुलांचें मन अतृप्तच राहतें ना? अगदीं तशी त्याची स्थिति झाली होती. मीं मनांत म्हटलें सुद्धां—माणूस हा अधाशी प्राणी आहे हेंच खरें! थोड्यांत त्याला कधींच गोडी वाटत नाहीं. मग ते पेढे असोत, पुस्तकें असोत, नाहींतर पैसे असोत! 'पुरे' हा शब्द आयुष्यांत त्याच्या तोंडून बाहेर पडणें कठिण!

त्याचा हा पुस्तकांचा सोस पाहून मीं थट्टेनें म्हटलें, 'गोल्डस्मिथच्या कादंबरींतल्या त्या चित्रासारखी तुझ्या ट्रंकेची स्थिति होईल हं!'

थट्टा ही गुदगुल्यांसारखी असते. पण बधिर शरिराला गुदगुल्या कळतच नाहींत. त्याचेंहि तसेंच झालें. परडींतल्या पुष्पांच्या राशीकडे पाहून भान विसरणाऱ्या भक्ताप्रमाणें त्याची स्थिति झाली होती. पुस्तकांपलीकडे त्याला दुसरें कांहीं दिसतच नव्हतें. मी पुन्हां म्हणालों, 'त्या कादंबरींतलें तें चित्र एवढं मोठं असतं कीं, दरवाजांतून तें घरांत जाऊंच शकत नाहीं. तुझीहि अशचि पंचाईत होईल वाटेंत. एका मोटारींतून दुसऱ्या मोटारींत ही जड ट्रंक टाकावयाची म्हणजे चांगला पहिलवानच हवा या कामाला! हमालाला ही उचलेनाशीं झाली कीं ती हलकी करण्याकरितां तुला एक एक पुस्तक काढून बाहेर फेकून द्यावं लागेल. तसा प्रसंग येण्यापेक्षां थोडीं कमी पुस्तकें नेलीस म्हणून काय बिघडणार आहे?'

तो हंसला. मला वाटलें—माझा उपदेश त्याला पटला. पण कपाटांतल्या वरच्या कप्प्यांत ओळीनें पंधरावीस पुस्तकांकडे पाहत तो म्हणाला, 'टॉलस्टॉय फार चांगला आहे! नाहीं कां?'

टॉलस्टॉयला पळविण्याचा त्याचा विचार उघड उघड दिसत होता ! पण तो पार पडूं नये म्हणून या बोटाची थुंकी त्या बोटावर करून त्याच्या वाङ्मयाची यथेच्छ निंदा करायला मी कांहीं एखाद्या साप्ताहिकाचा संपादक किंवा उपसंपादक नव्हतों.

मीं म्हटलें, ' प्रत्येक तरुणानं टॉलस्टॉय अवश्य वाचला पाहिजे ! '

पडत्या फळाची आज्ञा घेऊन त्यानें टॉलस्टॉयचीं सारीं पुस्तकें कपाटांतून खालीं काढलीं. त्यांतलीं एकदोन सहज चाळीत मी म्हणालों, ' हीं सारींच कशाला घेऊन जातोस ? '

' एखादा लेखक संपूर्ण वाचण्यांत मोठी मौज असते ! एखाद्या गवयाच्या निरनिराळ्या रागांतल्या चिजा ऐकतांना जसा आनंद होतो— '

तो म्हणाला तें कांहीं खोटें नव्हतें. नदींत मधून मधून डुंबण्यापेक्षां पोहून पैलतीर गांठण्यांत कांहींतरी विशेष आहे हें कोण नाकबूल करील ?

पण—

मी त्याला म्हटलें, ' मधून मधून मलासुद्धां टॉलस्टॉय वाचण्याची लहर येते. हीं सारींच पुस्तकें तूं नेलींस तर– '

त्यानें निम्मीं पुस्तकें ट्रंकेंत घातलीं व निम्मीं परत कपाटांत ठेवलीं.

हां हां म्हणतां या गोष्टीला तीन महिने होऊन गेले. कपाटांत कुठेंशीं कसर दिसली म्हणून मी सारीं पुस्तकें झाडून तीं परत ठेवूं लागलों. मध्येंच टॉलस्टॉयचीं तीं पुस्तकें माझ्या हाताला लागलीं. तीं चाळतां चाळतां माझ्या मनांत आलें—उगीच ठेवून घेतलीं हीं आपण ! गेल्या तीन महिन्यांत या पुस्तकांतलें अक्षरसुद्धां वाचलें नाहीं आपण. त्या दिवशीं राजारामला हीं नेऊं दिलीं असतीं तर त्यानें एव्हांना वाचून पुरींसुद्धां केलीं असतीं !

गव्हाणींतल्या कुत्र्याची गोष्ट मला आठवली. त्याला स्वतःला गवत नको होतें. पण तें खायला येणाऱ्या बैलाच्या अंगावर धावून जाण्यांत मात्र त्याला पुरुषार्थ वाटत होता. मीं मनांत म्हटलें—अगदीं अंतरंगांत मनुष्यप्राणीसुद्धां त्या कुत्र्याइतकाच मूर्ख आहे ! ज्यांचा स्वतःला उपयोग नाहीं त्या गोष्टींचा लोभ कांहीं त्याला सोडवत नाहीं. ' माणसाला किती जमीन लागते ? ' या प्रश्नाचें उत्तर शेवटीं ' जास्तींत जास्ती साडेतीन हात ' हेंच आहे. पण शिकं-

दरापासून हिटलरपर्यंत जगाचा इतिहास पाहिला तर प्रत्येक मनुष्याची धडपड मात्र पृथ्वी पादाक्रांत करण्याकरितां चालली आहे.

आणि या लोभाचा परिणाम ?

मुंबईंत चाळीचाळीला मधमाशांच्या पोळ्यांचें किंवा वाळवीच्या वारुळाचें स्वरूप प्राप्त झालें असतांना मलबार-हिलवरले मोठमोठे बंगले रिकामे राहतात ! सुंदर वस्त्रांनीं शहरांतलीं कापड-दुकानें भरलीं असतांनाहि खेड्यांतल्या लाखों बायकांना लंगोटीवजा कापडाच्या तुकड्यावर आपल्या लज्जेचें रक्षण करावें लागतें. औषधाच्या कारखान्यांत नवनवीन औषधें निर्माण होत असतांना कितीतरी गोरगरीबांवर मुकाट्यानें मृत्यूच्या स्वाधीन होण्याची पाळी येते. एकेकाच्या बँकबुकांत कोट्यवधि रुपये असतांना एका रुपयाकरितां—चांदीच्या एका हिणकस तुकड्याकरितां–अनेक दुर्दैवी स्त्रियांना पोटचा गोळा किंवा त्याच्याइतकेंच प्रिय असलेलें शील यांच्यावर पाणी सोडावें लागतें. मनुष्याच्या अवास्तव लोभानेंच जगांतलीं सर्व दुःखें निर्माण केलीं आहेत. हा विकृत लोभ मनुष्याच्या अंतर्मनांत लपून बसलेला नसता तर टॉलस्टॉयचीं पुस्तकें ठेवून घेण्याचा मोह मला कशाला झाला असता ?

संन्याशानें एका गांवांत तीन दिवसांपेक्षां अधिक दिवस राहूं नये, दुसऱ्याकडे पुढील जाऊनच आपला उदरनिर्वाह चालवावा, इत्यादि आपल्यांतल्या जुन्या नियमांचें कारण आतां माझ्या लक्षांत आलें. त्याग हा संन्याशाचा आत्मा आहे. पण तीन दिवसांपेक्षां एका जागीं मनुष्यानें अधिक काळ घालविला कीं त्याला त्या स्थळाविषयीं आपलेपणा वाटूं लागतो, तो त्या जागेला घर म्हणूं लागतो. हळूहळू तें रिकामें घर त्याच्या डोळ्यांना कसेंसेंच दिसूं लागतें. तें भरण्याकरितां तो आटोकाट प्रयत्न करतो. आणि या प्रयत्नांत बाहेरच्या हजारों लोकांना आवश्यक असलेल्या गोष्टी तो आपल्या घरांत आणून भरतो ! शेवटीं मोहरांच्या हंड्यावर बसलेल्या नागासारखी स्थिति होते त्याची !

मनुष्याचा बेछूट स्वार्थ, त्याचा राक्षसी लोभ, त्याच्या मालकी हक्काच्या विलक्षण कल्पना यांनीं अगदीं बेचैन करून टाकलें मला. धुरानें कोंदटलेल्या खोलींत पाऊल टाकल्याबरोबर जीव गुदमरून जातो ना ? तशी माझ्या मनाची स्थिति झाली.

खालीं घंटा वाजली.

मीं दार उघडून पाहिलें. टपाल आलें होतें. पोस्टमननें दिलेलीं पत्रें मीं भरभर चाळूं लागलों. माझ्या पुतण्याचेंहि एक पत्र होतें त्यांत! बहुधा त्यानें तीं उरलेलीं टॉलस्टॉयचीं पुस्तकें मागितलीं असतील असें मला वाटलें. आजच्या टपालानें तीं पाठवून द्यायचींच असें मनांत ठरवून मी पत्र उघडलें. त्यानें लिहिलें होतें,

' तुम्हांला राग येईल म्हणून इतके दिवस लिहिलें नाहीं मी! पण आज माझी मलाच लाज वाटली. अगदीं राहवेना म्हणून लिहीत आहे.

इतकीं पुस्तकें आणलीं मी इथं! पण अजून त्यांतलीं चार सुद्धां पुरीं वाचून झालीं नाहींत. मला सवड होत नाहीं कीं मी मूळचाच आळशी आहे, कुणाला ठाऊक! पण कपाटांत उभीं असलेलीं हीं तुमचीं सारीं पुस्तकें माझा उपहास करताहेत! कर्जदाराच्या दारांत सावकारांनीं धरणें धरावें तशीं तीं वाटतात मला! त्यांतल्या त्यांत टॉलस्टॉयच्या पुस्तकांकडे नजर गेली कीं अगदीं ओशाळून जातों मी मनांत!

तुमच्याकडून संपूर्ण टॉलस्टॉय मी आणणार होतों! आतां वाटतें, आणला नाहीं तें बरें झालें. मनुष्याच्या लोभांत उपभोगाचा किंवा उपभोगापेक्षां स्वामित्वाचाच भाग अधिक असतो. नाहींतर तुमच्याकडून आणलेलीं हीं टॉलस्टॉयचीं पुस्तकें थोडीं तरी वाचलीं नसतीं का? तीं माझ्याकडे राहिल्यामुळें तुमची मात्र फार अडचण झाली असेल! आतां तिकडे येणारा मनुष्य मिळतांच तीं परत पाठवून देतों. '

मला हंसूं आवरेना. मनुष्य आपल्यावरून जग ओळखतो, ही म्हण खरी असती तर आग्रहानें पुस्तकें नेलीं किंवा ठेवून घेतलीं म्हणून तीं कांहीं कुणी वाचीत नाहीं हें आम्हां दोघांनाहि कळायला हवें होतें!

पण हा आग्रह तरी मनुष्य कां धरतो? ज्या गोष्टींचा उपभोग आपल्याला घेतां येत नाहीं तीं जवळ असावी असा अट्टाहास तो कां बाळगतो? मला वाटतें—याचें कारण एकच आहे. आपल्याला त्या वस्तूची जरूरी लागेल तेव्हां ती मिळेलच अशी त्याला खात्री वाटत नाहीं. मनुष्याच्या अवास्तव संग्रहबुद्धीच्या मुळाशीं आजची विषम समाजरचनाच आहे. आजकाल मालकी-

हक्कावांचून मनुष्याला कशाचाच उपभोग मिळूं शकत नाहीं. मग तीं रेडिओ-वरलीं गाणीं असोत किंवा बागेंत फुललेलीं फुलें असोत. त्याची संग्रहबुद्धि बळावत जाते, याचें कारण हेंच आहे. माझा पुतण्या जिथें शिक्षक होऊन गेला होता तिथें टॉलस्टॉयचीं पुस्तकें आहेत नि तीं हवीं तेव्हां आपल्याला मिळतील असें जर त्याला आधीं कळलें असतें तर ती अवजड ट्रंक अधिक जड करून नेण्याची दगदग त्यानें तरी कशाला केली असती ?

# दुसऱ्या वर्गाचा प्रवास

८

स्टेशनवर गेलों नि थेट पुण्याच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्याकडे पाहिलें मात्र ! स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना माझा ! एका डब्यांत इतकीं माणसें बसूं शकतील हें स्वप्नांत सुद्धां मला खरें वाटलें नसतें. पण विसावें शतक हें स्वप्नांत खऱ्या न वाटणाऱ्या गोष्टी सत्यसृष्टींत पाहण्याचें युग आहे, हें लक्षांत आल्यावर माझे डोळे समोरचा देखावा मुकाट्यानें पाहूं लागले. एखाद्या पुस्तकी पंडितानें आपल्या डोक्यांत कोंबलेल्या असंख्य कल्पनांप्रमाणें डब्यांत दाटीवाटीनें बसलेलीं तीं माणसें दिसत होतीं. त्या गर्दींत शिरण्याचें माझ्या अगदीं जिवावर आलें. डब्याच्या दरवाज्यापाशीं डोंगराएवढें सामान पडलें होतें. या पर्वताचें उल्लंघन करून आंत प्रवेश मिळविला तरी खडा पारशी किंवा कटीवर हात ठेवणारा पंढरीनाथ होण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. त्या कल्पनेनेंच माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. मी परत गेलों आणि मुकाट्यानें दुसऱ्या वर्गाचें तिकिट काढलें.

गाडी सुटेपर्यंत दुसऱ्या वर्गाच्या डब्याच्या खिडकींतून मोठ्या ऐटीनें बाहेर डोकावून पाहत होतों. डब्यांत दुसरा उतारूच नव्हता.

'I am the monarch of all I survey,
My right there is none to dispute.'

या ओळी पुनःपुन्हां आठवत होत्या. कुणीतरी ओळखीचा मनुष्य प्लॅटफॉर्मवरून जातांना ' काय, कुठं चाललांत ? ' असा प्रश्न करी, डब्यांत डोकावून पाही नि हंसत हंसत म्हणे, ' आज काय चैन आहे तुमची ! चिटपांखरूं देखील डब्यांत नाहीं ! कोल्हापूर सुटल्यावर जी ताणून द्याल ते घोरपडी आल्यावर उठाल ! '

गाडी सुटेपर्यंत माझें मनहि याच कल्पनेच्या झोपाळ्यावर बसून उंच झोंके घेत होतें.

पण गाडी सुटल्याबरोबर मला एक विलक्षण भास झाला—आपण आग-गाडीच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत नाहीं, तुरुंगांतल्या अंधारकोठडींत आहों.

मी चटकन् दिव्याचें बटन लावलें. अंधारांत लहान मुलाला भिवविणारा बागुलबोवा प्रकाश दिसतांच पळून जातो ना? माझ्या मनांतला तो विचित्र भास क्षणार्धांत तसाच नाहींसा झाला.

वाचण्याकरितां बरोबर आणलेलें पुस्तक मीं उघडलें. पण कांहीं केल्या माझें वाचनाकडे लक्ष लागेना. दिव्याच्या मंद प्रकाशावर टीका करीत मीं तें पुस्तक बाजूला ठेवलें आणि समोर पाहिलें. तिथल्या बर्थचें काळें आच्छादन प्रकाशांत जरा चमकदार वाटत होतें.

मला वाटलें—हा बर्थ रिकामा नसता तर आपल्याला अधिक आनंद झाला असता! प्रवासांत माणसाला थोडी तरी सोबत हवी!

लगेच मी मनाची समजूत घातली—असा कुणी सोबती नाहीं हें आपलें भाग्यच म्हटलें पाहिजे. दुसऱ्या वर्गाचें तिकिट देतांना उतारू किती घोरतो याबद्दल कुठलाहि स्टेशनमास्तर चौकशी करूं शकत नाहीं! आज आपल्या डब्यांत येणारा मनुष्य एक नंबरचा घोरणारा निघाला नसता कशावरून? आपल्या झोंपेचें खोबरें होण्याचा हा प्रसंग टळला याबद्दल नशिबाचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील!

एकलकोंडेपणामुळें मनाला कसें चुकल्या चुकल्यासारखें होत होतें. त्याची समजूत घालण्याकरितां मीं हा युक्तिवाद केला खरा. पण दांतांत थोडेसें कांहीं अडकलें तरी तें निघाल्याखेरीज जसें चैन पडत नाहीं, तशी माझ्या मनाची स्थिति झाली होती.

मी उठलों नि 'टॉयलेटचा' दरवाजा उघडला. समोरच्या आरशांतलें प्रतिबिंब पाहतांच माझ्या मनाला जरा बरें वाटलें. जणूं कांहीं तें मनुष्याची आकृति पाहण्याकरितांच आसावलें होतें. पण त्या प्रतिबिंबानें उत्पन्न झालेला आनंद फार वेळ टिकला नाहीं. ज्याच्याशीं मला बोलतां येईल, माझ्या बोलण्यामुळें ज्याच्या तोंडावर कांहींतरी भाव उमटतील अशा प्रकारच्या मनुष्याची सोबत मला हवी होती.

मनांतली अस्वस्थता विसरण्याकरितां मीं तोंड धुण्याच्या भांड्याकडे

पाहिलें—त्याच्यावरल्या ' एफ्. सी. एस्. टी. १५०५–ए ' या प्रकरणाचा अर्थ लावण्याचा खूप प्रयत्न केला आणि "Pull handle down until water ceases" या वाक्याचें मराठी भाषांतर न देणारी रेल्वे कंपनी देशी भाषांची कशी उपेक्षा करीत आहे याविषयीं मीं मनांतल्या मनांत अगदीं छोटें पण आवेशपूर्ण भाषणहि केलें.

उन्हाळ्यांत थंड पेय प्यालें कीं घशाला ओलावा वाटतो ! पण तो क्षणभरच ! या उपायांनीं माझीहि हुबेहूब तशीच स्थिति झाली.

मी मुकाट्यानें बाहेर येऊन बर्थवर बसलों व खिडकींतून पाहूं लागलों. अंगावर घातलेल्या पांघरुणांतूनहि लहान मुलांचे हात जसे बाहेर दिसतात, त्याप्रमाणें अंधारांत दूरच्या झाडांचे शेंडे दिसत होते. खड–खट्–खड–खट् या चाकांच्या आवाजाखेरीज दुसरें कांहींच ऐकूं येत नव्हतें. या कर्णकटु आवाजानें माझी अस्वस्थता अधिकच वाढली.

इतक्यांत पाव्याचा गोड आवाज माझ्या कानांवर पडला. मी उत्सुकतेनें ऐकूं लागलों. अंधारांतच कुणीतरी धनगर आपला कळप घेऊन झोपडीकडे परत चालला असावा ! इथेंच आगगाडीचें स्टेशन असतें तर किती बरें झालें असतें, असा विचार माझ्या मनांत आला.

पावा ऐकूं येईनासा झाला. पण त्याच्या पाठोपाठ बैलांच्या गळ्यांतले घुंगुर खुळखुळूं लागले. मी तन्मयतेनें ऐकूं लागलों. नर्तिकेच्या नृत्यानेंसुद्धां माझें मन कधींहि इतकें मोहून गेलें नव्हतें !

आगगाडी पुढें धांवतच होती. घुंगुरांचा खळखळाट अस्पष्ट झाला–किण-किणाटसुद्धां ऐकूं येईनासा झाला. माझ्या मनाची अस्वस्थता पुन्हां वाढूं लागली.

माझ्या दृष्टीसमोरच एक दिवा लुकलुकत होता. तो किती लांब असेल कुणाला ठाऊक ! पण त्याच्या त्या मंद प्रकाशांत मला एक निराळेंच चित्र दिसलें-तो दिवा घेऊन एका झोपडीच्या दारांत एक बाई उभी आहे, तिचीं चिल्लींपिल्लीं तिच्याभोंवतीं चिवचिवाट करीत आहेत आणि तिचा घरधनी मघांच्या त्या बैलगाडींतून झोपडीकडे धांवत येत आहे.

हां हां म्हणतां तो दिवा दिसेनासा झाला. बाहेरच नव्हे तर माझ्याहि मनांत पूर्ण अंधार पसरला. मी डोळे मिटून अंथरुणावर पडलों.

पण डोळे मिटले म्हणून झोंप थोडीच लागते ? हातांत गेलेल्या कुसळा-प्रमाणें माझ्या मनांत एक गोष्ट सारखी सलत होती—दुसऱ्या वर्गाचें तिकिट काढण्यांत मोठी चूक झाली आपल्या हातून. गांधीजी आणि जवाहरलाल तिसऱ्या वर्गातून प्रवास करतात तें केवळ साधेपणामुळें नव्हे. बहुजनसमाजाशीं ते इतके एकरूप झाले आहेत कीं, लोकांपासून दूर राहून त्यांना क्षणभरसुद्धां करमत नसावें. तिसऱ्या वर्गातल्या गर्दीला भिऊन आपण दुसऱ्या वर्गात पळून आलों. पण इथें दिसणारी शांतता ही स्मशानांतली शांतता आहे. तिच्यामुळें मन प्रसन्न न होतां विषण्णच होतें.

तिसऱ्या वर्गातल्या गर्दीतून मीं पूर्वी केलेल्या प्रवासांच्या आठवणी माझ्या डोळ्यांपुढें उभ्या राहूं लागल्या. एकदां मी डब्यांत शिरलों तेव्हां आंत बसायला सुद्धां कुठें जागा नाहीं असें मला आढळून आलें. माझ्या स्वभावांत लढाऊपणा नसल्यामुळें आंतल्या उतारूंशीं ' मींहि तिकिटाचे पैसे दिले आहेत ! या जागेवर माझाहि तुमच्याइतकाच हक्क आहे ' इत्यादि तत्त्वें भोंवतालच्या लोकांना सुनावण्याच्या फंदांत मी पडलों नाहीं. मी मुकाट्यानें उभा राहिलों.

गाडीनें एक-दोनच स्टेशनें टाकलीं असतील ! पलीकडच्या बांकावर पेंगणारी म्हातारी माझ्याकडे टक लावून पाहत आहे असें मला आढळून आलें. मीं खूप आठवण करून पाहिली, पण आपण तिला कुठें पाहिलें आहे असें मला वाटेना. तिच्या अंगावर एक फाटकें लुगडें होतें. तिच्या केंसांच्या अंबाड्या झाल्या होत्या नि तिच्या पायाशीं असलेलें तें बोचकें—ज्या कापडांत तिनें आपलें सामान गुंडाळून ठेवलें होतें त्याचें नि साबणाचें अगदीं वांकडें असलें पाहिजे हें उघड उघड दिसत होतें. त्यामुळें ' इकडे ये बाबा ' हे तिचे शब्द कानांवर पडतांच ती कुणाला बोलावीत आहे हें मला कळेना !

पण ती मलाच बोलावीत होती. चुलीपाशीं निजणारें मांजर जसें आपलें अंग आवरून घेतें, त्याप्रमाणें तिनें आपल्या शरीराची मुटकुळी केली आणि मला बसायला जागा करून दिली. तिच्या त्या निःशब्द पण प्रेमळ सहवासाचें अजूनहि मला विस्मरण होत नाहीं. तिचें नांव माझ्या लक्षांत नाहीं. ती पुन्हां कधीं माझ्या दृष्टीस पडली नाहीं. पण त्या दिवशींप्रमाणें योगायोगानें तिची पुन्हां गांठ पडावी असें मला फार फार वाटतें.

तसाच तो वृद्ध पारशी गृहस्थ नि त्याची ती मुलगी ! गतवर्षी खानापूर स्टेशनावर आम्ही मेलमध्यें चढलों. तिथें गाडी फार थोडा वेळ थांबते. त्यामुळें कुठल्या डब्यांत जागा आहे हें पाहायला वेळच नसतो. पण डब्यांत प्रवेश केल्यावर तो अगदीं पॅकबंद आहे असें आम्हांला आढळून आलें. मुलें बरोबर असल्यामुळें त्यांना घेऊन एकसारखें उभें राहणेंहि अवघड होतें. काय करावें या विचारांत मी होतों. इतक्यांत एका पारशी गृहस्थानें आपल्याजवळ मला बसायला जागा करून दिली. त्याच्या मुलीनें माझ्याकडून मंदाला घेऊन तिच्याशीं ती मोडक्या-तोडक्या मराठींत बोलूं लागली. पांच मिनिटांत आम्ही सर्व दोस्त झालों. त्या वृद्ध गृहस्थानें माझा धंदा, वय, मुलांचीं नांवें इत्यादि गोष्टी तर विचारल्याच, पण ‘ अविनाश ’ ‘ मंदाकिनी ’ आणि ‘ कल्पलता ’ या नांवांचे अर्थ सुद्धां त्यानें विचारून घेतले.

या गोष्टी आठवतांच मला वाटलें—गर्दीला कंटाळून तिसऱ्या वर्गाचे उतारू तिकिटें बदलून जसे दुसऱ्या वर्गात येतात, तसे गर्दी हवी म्हणून तिकिट बदलून आपल्याला तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जातां आलें असतें तर फार बरें झालें असतें ! पण आतां ? पैसे उगवण्याकरितां भिकार चित्रपट शेवटपर्यंत पाहावा लागतो तसा हा प्रवास आपल्याला करावा लागणार !

गाडी मिरज स्टेशनवर आली. इथें तरी माझ्या डब्यांत कुणी पाऊल टाकील अशी माझी कल्पना होती. पण ती कल्पनाच ठरली. चार-दोन वेळां एक तरुण मुलगा माझ्या डब्यावरून गेला. तो माझ्याकडे रोखून पाहत असावा असा मला भास आला. पण त्याच्याबरोबर सामान वगैरे कांहीं दिसत नव्हतें तेव्हां तो माझ्या डब्यांत येईल ही आशाच करायला नको होती !

माझ्या डब्यावरून त्याची पांचवी फेरी सुरू झाली. आतां गाडी सुटली कीं पुन्हां आपला भयाण एकांतवास सुरू होणार या भीतीनें त्याच्याशीं कांहींतरी बोलावें अशी तीव्र इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली.

इतक्यांत तोच माझ्याकडे आला. खिशांतून एक एंबॉस केलेली छोटी वही काढून तो म्हणाला, ‘ तुमची स्वक्षरी हवी मला ! ’

एरवीं स्वाक्षरी देण्याचा मला कंटाळा येतो. पण या वेळीं मीं ती वही मोठ्या आनंदानें हातांत घेतली. मी खालीं मान करतों तोंच तो म्हणाला ‘ संदेशहि द्या ! ’

मीं मुकाट्यानें लिहिलें, ‘ एकांताचें खरें सुख गर्दींतच मिळतें. ’

मी वही परत देतांच त्यानें त्या वाक्यावर दृष्टि टाकली. लगेच माझ्याकडे आश्चर्यानें पाहत तो म्हणाला, ‘ या वाक्याचा अर्थ मला कळला नाहीं ! ’

मी बोलून गेलों, ‘ व्यक्तीचें खरें सुख समाजाच्या सुखांतच असतें ना ? तसेंच आहे हें ! ’

# मृत्यु

१

लहानपणीं नाटकें पाहण्याचें मला वेडच होतें म्हणानात. ' सत्यविजया ' पासून ' शारदे 'पर्यंत सर्व प्रकारचीं नाटकें मीं किती वेळां पाहिलीं असतील तें बिचाऱ्या चित्रगुप्तालाच ठाऊक ! ' लई बेस झुणका भाकूर ' आणि ' मधुर किती कुसुमगंध सुटला ' हीं दोन्ही पदें गुणगुणण्यांत त्या वेळीं मला सारखाच आनंद वाटे. त्या आनंदाची आठवण झाली म्हणजे वाटतें—बाळपण आणि साधुत्व यांत अतिशय साम्य आहे. रामकृष्ण परमहंस एका हातांत माती व दुसऱ्या हातांत सोनें घेऊन दोन्ही हातांतल्या वस्तू नदीच्या पात्रांत सारख्याच निर्विकारपणें सोडीत असत, अशी एक कथा आहे ना ? नाटकें पाहाण्याच्या बाबतींत माझी हीच समत्वाची दृष्टि असे.

पण अपवादावांचून कुठल्याहि नियमाची सिद्धता होत नाहीं. ' समः सर्वेषु नाटकेषु ' या माझ्या वृत्तीलाहि असाच एक अपवाद होता. तो म्हणजे ' मृच्छकटिक '. फुलवेड्या स्त्रीचें त्यांतल्या त्यांत एखादें आवडतें फूल असतेंच कीं ! ' मृच्छकटिक ' हें तसेंच माझें अतिशय आवडतें नाटक होतें.

मी सहासात वर्षांचा असेन. संध्याकाळीं शाळेंतून परत येतांना कोपऱ्याकोपऱ्यावर ' मृच्छकटिका 'च्या जाहिराती लागलेल्या पाहून माझें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें. घरीं गेल्यावर आईपाशीं कुठल्या खाऊचा हट्ट धरायचा याचा विचार करण्यापेक्षां वसंतसेनेपाशीं सोन्याच्या गाड्याचा हट्ट धरणाऱ्या चारुदत्ताच्या मुलाचा विचार करण्यांतच मी गुंग होऊन गेलों.

रात्रींहि माझें लक्ष जेवणावर नव्हतें.

' कांहीं होतंय् कां तुला ? ' म्हणून दादांनीं विचारल्यावर मी मानेनें 'नाहीं' म्हणून उत्तर दिलें खरें ! पण माझ्या डोळ्यांत उभें राहिलेलें पाणी पाहून मी कांहींतरी लपवून ठेवीत आहे असें त्यांना वाटलें असावें.

माझे डोळे ओले होण्याचें खरें कारण माझ्या कानांत घुमणारें—

' बाळा घालोनिया गळां । रक्त सुमनांच्या माळा ।
स्कंधावरी स्थापियला । लोहशूल हा ॥ '

हें चारुदत्ताचें पद होतें ! पण दादांना तें समजणें शक्य नव्हतें. मला तापबिप आला असेल अशा शंकेनें जेवण झाल्यावर त्यांनीं अंगाला हात लावून पाहिलें. पण अस्मादिकांचें अंग अगदीं गार होतें. माझें अंग गार आहे, असें पाहून दादांना बरें वाटलें. त्यांनीं माझ्याकडे हंसत पाहिलें. मीहि हंसलों.

माणसाचें मन हें तिजोरीसारखें असतें, साध्या किल्ल्या त्याला कधींच चालत नाहींत, हें दादांच्या मनांतच आलें नाहीं.

पण घड्याळाचा कांटा जसजसा दहाकडे धांवूं लागला तसतशी माझी अंथरुणांतल्या अंथरुणांत चळवळ सुरू झाली. मला ढेंकूण चावत असावेत, अशा समजुतीनें दादांनीं गड्याला माझें अंथरुण नीट पहायला सांगितलें. बिचाऱ्यानें डोळे फाडफाडूनच पाहिलें, पण त्याला औषधाला सुद्धां ढेंकूण मिळाला नाहीं !

घड्याळांत ठोके पडूं लागले.

खण—खण—खण—

कुणीतरी माझ्या हृदयावर घणाचे घाव घालीत आहे असा भास झाला मला. तिकडे सदासुख थिएटरांत ड्रॉपचा पडदा उघडला असेल. लठ्ठ पोटाच्या सूत्रधारानें फुलें उधळून भसाड्या स्वरांत, ' वंदन त्या ईशा उमेशा ' म्हणून परमेश्वराला आळवायला सुरुवात केली असेल नि मी इथं–घरांत–अंथरुणावर–

छेः छेः छेः !

माझी चुळबुळ पाहून दादांनीं मला मायेनें जवळ घेतलें, माझ्या पाठीवरून हात फिरविला नि मीं त्यांच्या कुशींत तोंड लपवून नाटकाला जायची गोष्ट काढली.

पहिल्यांदा ते रागावले.

पण–बालहट्ट, स्त्रीहट्ट, व राजहट्ट या तीन हट्टांत बालहट्टाला अग्रस्थान दिलें आहे तें कांहीं उगीच नाहीं.

स्त्रीच्या सौंदर्याकडे ढुंकूनहि न पाहाणारे शुक्राचार्य व राजाच्या सत्तेला भीक न घालणारे लेनिन जगांत होऊन गेले आहेत—पुढेंहि होतील पण–वात्सल्यानें न विरघळणारीं माणसें ? असल्या प्राण्यांची मनुष्यकोटींत गणनाच होणार नाहीं.

अर्थात् अस्मादिकांची स्वारी गब्याबरोबर मृच्छकटिकाला गेली हें सांगण्याची जरूरी नाहीं. मात्र नाटक चुकून वेळेवर सुरू झालें असल्यामुळें आम्हीं थिएटरांत पाऊल टाकलें तेव्हां चारुदत्त व मैत्रेय यांचें संभाषण एकदम माझ्या कानावर पडलें. मैत्रेयानें चारुदत्ताला प्रश्न विचारला.

' मित्रा, दारिद्र्य आणि मरण यांतून तुला कोणतें बरें वाटतें ? '

चारुदत्त गाऊं लागला —' मरण बरें वाटतें । दारिद्र्याहुनि मित्रा तें. '

चारुदत्त मारे ताना मारीत 'गरिबीहून मरण बरें' म्हणून प्रेक्षकांना समजावून सांगत होता. तेहि माना डोलवीत होते. पण माझ्या मनांत अगदीं खोल कांहींतरी खुपत होतें. पूर्वी प्रत्येक वेळीं मृच्छकटिक पाहतांना सूत्रधाराच्या प्रवेशांतच मी सांगलींतून अवंतिका नगरींत प्रवेश करीत असें, गणपतीच्या उत्सवापेक्षां कामदेवाचा उत्सव हां हां म्हणतां मला अधिक परिचित वाटूं लागे, आणि दररोज माझ्या दृष्टीला पडणाऱ्या एकदंत्यापेक्षां नाटकांत कधींहि न दिसणारा वसंतसेनेचा स्तंभभंजक हत्तीच माझ्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभा राही ! पण आज मात्र ... ...

जाईजुईच्या राशींत हाताला कांटा बोंचावा, सुंदर गाणें ऐकतां ऐकतां मध्येंच बेसूर कानावर पडावा, तसें कांहींतरी मला झालें !

' माणसाला मरण बरें वाटतें ? '

माझें मन म्हणत होतें—' अगदीं खोटी गोष्ट आहे ही ! '

सत्याग्रह करून नाटक पाहायला गेलेला वीर होतों मी ! पण कांहीं केल्या नेहमींइतकें माझें मन नाटकांत रंगून जाईना. प्रत्येक अंकाचा पडदा पडला कीं मैत्रेयाचें तें विचित्र वाक्य मला आठवे–' बरें मित्रा, दारिद्र्य आणि मरण यांतून तुला कोणतें बरें वाटतें ? '

क्षणभर अंग शहारून जाई नि मनांत येई—असला प्रश्न शत्रूसुद्धां कुणाला करणार नाहीं. मग मैत्रेयासारख्या जीवश्चकंठश्च मित्रानें शिळोप्याच्या गोष्टीला बसल्याप्रमाणें शांतपणानें चारुदत्ताला हा प्रश्न विचारावा ही आश्चर्याची गोष्ट नाहीं का ? एवढें सुंदर नाटक लिहिणाऱ्या लेखकाच्या बुद्धीला हें वाक्य कसें टोंचायला हवें होतें.

' गुण हाच प्रीतीला कारण आहे. ' ' कोणी घर पाहून कांहीं ठेव ठेवीत

नाहीं; मनुष्य पाहून ठेवतो. ' असलीं रसपूर्ण वाक्यें लिहिणाऱ्या कवीला मैत्रेयाच्या तोंडीं तें वाक्य घालतांना आपली कांहीं चूक होत आहे याची कल्पना सुद्धां आली नसेल? सुंदर संगमरवरी मूर्तींच्या राशीमध्यें एखादा शेंदूर फासलेला दगड तसें तें वाक्य—

त्या रात्रीं मृच्छकटिक पाहतांनाच नव्हे तर त्यानंतर ज्या ज्या वेळीं मी माझें हें आवडतें नाटक पाहिलें किंवा वाचलें त्या त्या वेळीं मैत्रेयाचें तें विलक्षण वाक्य ऐकून अगर वाचून माझें मन गोंधळून गेलें आहे!

' दारिद्र्याहून मरण बरें ' असें चारुदत्ताच्या तोंडून वदविण्यांत शूद्रकाला त्याचें अठराविश्वें दारिद्र्य सिद्ध करावयाचें असो अथवा त्याचा मानी स्वभाव दाखवावयाचा असो, ' मित्रा, दारिद्र्य आणि मरण यांतून तुला कोणतें बरें वाटतें? ' असा प्रश्न एक मित्र दुसऱ्या मित्राला प्राण गेला तरी करणार नाहीं, आणि कांहीं कारणांनीं तो दुसरा मित्र मरणाच्या गोष्टी बोलूं लागला तर तो त्या क्षणभरहि ऐकून घेणार नाहीं. शूद्रकाचें मनुष्यस्वभावाचें ज्ञान कितीहि मार्मिक असलें तरी मैत्रेयाच्या तोंडीं हा प्रश्न घालतांना तो घसरला—मरण पत्करण्यांत मोठेंपण आहे, या परंपरागत संकेताला तो बळी पडला!

पण दुःखाला किंवा दारिद्र्याला विटून मृत्यूला मिठी मारण्यांत खरोखरच मोठेंपण आहे का? गरिबीला किंवा अशाच एखाद्या आपत्तीला कंटाळून मृत्यूला कवटाळणारे लोक शूर नसले तरी भ्याड असतात आणि घटकाभर ते शूर आहेत असें मानलें तरी असले जीव देणारे लोक जगांत किती आढळतात? हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच!

मृत्यूच्या कल्पनेंत जी भयानक पण आकर्षक अद्भुतता आहे तिच्यामुळेंच या कवींना असले संकेत सुचत असावेत! बिचारा शूद्रक फार जुन्या काळांतला कवि! पण आधुनिक असलेल्या गडकऱ्यांचें वाक्य असेंच फसवें आहे! गडकरी म्हणतात, ' जोंपर्यंत जगण्यासारखें कांहीं जवळ आहे, तोंपर्यंतच मरण्यांत मौज आहे. '

हें वाक्य आकाशदिव्याप्रमाणें दुरून सुंदर दिसतें. पण तें अर्धसत्य आहे. त्याला आणखी एका अर्धसत्याची जोड दिल्याशिवाय तें पूर्णसत्य होणार नाहीं. तें दुसरं वाक्य म्हणजे ' जगण्यासारखें आपल्याजवळ पुष्कळ आहे असें

माणसाला नेहमींच वाटत असतें. पण त्याला मरण्यांत मौज कधींच वाटत नाहीं.'

मरण्यांत मौज मानणारें मन दिसलें कीं लहानपणीं पाहिलेल्या एका संन्याश्याची आठवण होते मला !

प्लेगनें लागला होता तो ! घरदार, मूलबाळ कांहींहि नव्हतें त्याला ! आतां आपण जगत नाहीं असें वाटल्यावर त्यानें भोंवतालच्या लोकांपाशीं संन्यास घेण्याची इच्छा प्रकट गेली. लगेच त्याला ' आतुर-संन्यास ' देण्यांत आला !

त्याच्या त्या नव्या अवताराला पाहून मृत्यूला भीति वाटली कीं काय कुणाला ठाऊक ! पण संन्यासी त्या दुखण्यांतून खडखडीत बरा झाला हें मात्र खरें ! मात्र हिंडूंफिरूं लागल्यावर त्याला आपल्या या नवीन आश्रमाचा राग येऊं लागला. संन्यस्त जीवन ही कांहीं झालें तरी तारेवरली कसरत ! तिचा त्याला लवकरच कंटाळा आला ! हो, कुठल्याहि हॉटेलवरून गेलें तरी आंत चहा प्यायला जायची चोरी ! कुणाच्या घरांत पुडीला गेलें नि स्वयंपाकघरांत कांद्याची भजीं तळलीं जात असल्याचा वास आला तरी तीं मागायची चोरी !

छेः छेः छेः

'या आपत्तीपेक्षां आपण प्लेगनें मेलों असतों तर फार बरें झालें असतें,' असें तो उघड उघड म्हणूं लागला.

मरण बरें असें म्हणणाऱ्या मनुष्याची मनोवृत्ति आतुर-संन्यास घेणाऱ्या माणसासारखीच असते. वैतागलेल्या मनाची ही क्षणिक लहर भोळ्या कवींनीं हवीतर खुशाल खरी मानावी !

पण ' दारिद्र्याहून मरण फार बरें ' अशी चारुदत्ताची जर खरोखरच खात्री झाली असती तर घरीं आलेल्या वसंतसेनेला पोंचविण्याकरितां म्हणून रात्रीं बाहेर पडल्यावर तो घराकडे परत आलाच नसता. त्यानें सरळ क्षिप्रेचीच वाट धरली असती.

मृत्यु हा केव्हांहि मनुष्याचा मित्र होऊं शकत नाहीं !

प्रिय पत्नीच्या चिरवियोगानें विव्हल झालेल्या अजराजाचें समाधान करण्यासाठीं कालिदासासारख्या कविश्रेष्ठानें ' मरणं प्रकृतिः शरीरिणाम्, विकृतिर्जीवितमुच्यते वुधैः ' हा चरण लिहिला असला तरी त्यांत कविप्रातिभेची चमत्कृति

आहे, अनुभूति नाहीं. कालिदासासमोर बालपणीं मृत्यु उभा राहिला असेल तेव्हां त्याला तो आजीनें सांगितलेल्या गोष्टींतला भयंकर राक्षसच वाटला असेल! तरुणपणीं मृत्यु हांकेच्या अंतरावर आला आहे असा भास होतांच त्यानें त्याची विनवणी केली असेल—' माझ्या जीवनवृक्षाला नुकताच मोहोर आला आहे, माझ्या प्रतिभेची कोकिळा आतां कुठें गाऊं लागली आहे. प्रीतीची पहिली धुंदी डोळयांवरून ओसरली नसल्यामुळें अजून जीविताकडे मीं डोळे भरून पाहिलें सुद्धां नाहीं. कृपा करून परत जा. तूं पुन्हां हांक मारायला येशील तेव्हां मीं आनंदानें तुझ्याबरोबर येईन! ' आणि पुढें प्रौढपणीं मृत्यूनें हळूच मागून येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवला असेल तेव्हां त्या विचित्र हिमशीतल स्पर्शानें दचकून त्यानें मागें वळून पाहिलें असेल नि वरकरणीं हंसून मृत्यूला ऐकूं जावें अशा बेतानें तो उद्गारला असेल, ' अरेच्या, इतक्यांत माझी वेळ भरली? छेः! चित्रगुप्ताच्या हिशेबांत कांहींतरी चूक झाली असेल! ' शाकुंतला ' पेक्षां अधिक सुंदर नाटक अजून मला लिहायचंय! नि ' मेघदूता ' पेक्षांहि सरस असें काव्य—तारुण्यांतलं प्रेम मी पुष्कळ रंगविलं! पण प्रौढ वयांतल्या प्रेमाचं चित्रण केल्याशिवाय मीं जगाचा निरोप घेणं हें—'

मृत्यूनें त्याला पुढें बोलूं दिलें असेल किंवा नाहीं हें मला सांगतां येणार नाहीं. पण ' मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ' हा चरण चुकीचा आहे, जीवन हें तत्त्वज्ञान नसून काव्य आहे आणि मरण हीच माणसाच्या आयुष्यांतली सर्वांत मोठी विकृति आहे, या गोष्टी त्याला त्या एका क्षणांत पटल्या असतील!

वर्डस्वर्थ हा सुद्धां शूद्रक, गडकरी आणि कालिदास यांचाच भाऊबंद! मृत्यूच्या वर्णनांत सत्यापेक्षां संकेतच रंगविले आहेत त्यानें! ' आम्हीं सात आहों ' ही त्याची प्रसिद्ध कविताच घ्या ना! या कवितेंत म्हणे बालमनाचें सहजसुंदर चित्रण आहे! कवीला जी सात-आठ वर्षांची गोड बालिका भेटते तिचीं दोन भावंडें मेलीं असून सुद्धां ती हिशेबांत त्यांना धरते व पुन्हां पुन्हा ' आम्हीं सात आहों ' असें म्हणते. तीं मेलेलीं भावंडें जमिनीखालीं शांतपणानें झोंपलीं आहेत असें तिला वाटत असावें! कविकल्पना या दृष्टीनें हें सारें ठीक आहे! पण मी अनुभवावरून सांगतों—'सातव्या-आठव्या वर्षी मृत्यूविषयीं मुलांमध्यें गाढ अज्ञान नसतें. अमावास्येच्या काळ्याकुट्ट काळोखाकडे किंवा

पडक्या घरांतल्या एखाद्या मोठ्या बिळाकडे ज्या भयभीत दृष्टीनें बालमन पाहतें त्याच दृष्टीनें मृत्यूच्या गूढ स्वरूपाचा विचार करीत असतें.

आणि मृत्यूच्या हातावर तुरी देण्याचे कांहीं उपाय जगांत अस्तित्वांत आहेत असें आढळून येतांच त्या बालजिवाला केवढा आनंद होतो !

लहानपणीं पौराणिक गोष्टी वाचतां वाचतां अमृताचा पत्ता लागला तेव्हां सारा दिवस मी खुषींत होतों. पण माझा तो ब्रह्मानंद लवकरच नाहींसा झाला. अमृत फक्त स्वर्गातच असतें, हें वडील माणसांच्याकडून कळल्यावर मी गोंधळांत पडलों. मृत्यूवर उपाय म्हणून मीं अमृत पैदा करावयाचें ठरविलें होतें. पण तें मिळविण्याकरितां आधीं मेलें पाहिजे ! मोठें विलक्षण त्रांगडें वाटलें तें मला ! पुढें संजीवनी विद्येनें कांहीं काळ मला धीर दिला ! पण शुक्राचार्यांच्या आश्रमाचा पत्ता कुणालाच ठाऊक नसल्यामुळें मीं निराश झालों !

इंग्रजी दुसरींत गेल्यावर पुन्हां आशेची लाट माझ्या मनांत उसळली. मार्कंडेयाचें आख्यान वर्गांत सुरू झालें होतें. मृत्यूचा क्षण येतांच शंकराच्या पिंडीला मिठी मारून मार्कंडेयानें यमाला हात हालवीत परत कसें पाठविलें हें वाचतां वाचतां मला गुदगुल्या झाल्या. आश्रयस्थान या दृष्टीनें आमच्या घराजवळ शंकराचीं देवळें कुठें कुठें आहेत याची मीं मनांतल्या मनांत यादी सुद्धां करून ठेवली. त्या यादीचा उपयोग करण्याची पाळी त्या वेळीं माझ्यावर आली नाहीं हा भाग निराळा !

बाळपणांतल्या या माझ्या भोळ्या कल्पना लवकरच लयाला गेल्या. मृत्यु हें मानवी जीवनांतलें कटु सत्य आहे याची मला पूर्ण खात्री पटली.

वयाच्या तेराव्या वर्षीं मी वडिलांच्या मायेला मुकलों. पुढें कितीतरी वर्षें ' अकरा ऑक्टोबर ' ही तारीख आली कीं मी अस्वस्थ होऊन जाई, सारा दिवस मला आठवण येई. मृत्यु हाच जर मृत्यूचें भक्ष्य होऊं शकला असता तर किती बरें चांगलें झालें असतें, ही कल्पना पुन्हां पुन्हां मनांत डोकावून पाही आणि शेवटीं रात्रीं एकांतांत उशीमध्यें डोकें खुपसून खूपसें रडलें म्हणजे हृदयाचा भार हलका होई.

पण लौकरच मृत्यूच्या भयानक स्वरूपाची आठवण मी पार विसरून गेलों. तारुण्य ही जीवनांतली यक्षभूमि आहे. तिच्यांत पाऊल टाकणाराला मृत्यूचें

अस्तित्वहि जाणवत नाहीं. सूर्योदय होतांच धुकें नाहींसें व्हावें, त्याप्रमाणें मृत्यू-विषयींची खरीखोटी सारी भीति तरुण मनांतून आपोआप निघून जाते. ' मृत्यु न म्हणे लहान थोर' अथवा 'गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्' असल्या या ओळी या यक्षभूमींत ऐकूंच येत नाहींत. तिथें जें अखंड गायन सुरू असतें, त्यांत ' चल ये वेडे । कां घेतिस आडेवेडे ' किंवा ' प्राप्तकाल हा विशाल भूधर। सुंदर लेणीं तयांत खोदा । निज नामें त्यावरती नोंदा ' याच ओळी पुनःपुन्हां कानांवर पडतात.

पंचविशीपासून चाळिशीपर्यंत प्रीति ही कल्पलता वाटते आणि पराक्रम हा अमृत आणायला निघालेला गरुड आहे असा भास होतो. विमानाचें उच्च उड्डाण असो किंवा एखाद्या क्लिष्ट विषयाचें संशोधन असो, तरुण मन हंसत-मुखानें त्याचें स्वागत करीत असतें. पण चाळिशी उलटली कीं शरीराबरोबर मनाचाहि हा उल्हासकारक उन्माद ओसरूं लागतो. प्रीति ही कल्पलता असली तरी संसार हें बाभळीचें झाड आहे; त्याचीं फुलें सामान्यच असतात; आणि त्यांचा एखादा छोटासा झुबका तोडण्याकरितां कांटे तुडवावे लागतात, या सत्याची मनाला पूर्ण जाणीव होते. आपला पराक्रम गरुडासारखा असला तरी परिस्थितीच्या पिंजऱ्यांत पंख फडफडविण्याखेरीज त्याला दुसरें कांहीं करतां येणें शक्य नाहीं हेंहि या वेळीं मनुष्याला कळून चुकतें. या वयांत जवळ धरलेलें पुस्तक अंधुक वाटतें. पण तेंच दूर धरलें, कीं अक्षरें स्पष्ट दिसूं लागतात. अर्थात् आतांपर्यंत दूरत्वामुळें ज्या मृत्यूची त्यानें पर्वा केलेली नसते त्याचें सत्य स्वरूपहि डोळ्यांपुढें स्पष्ट उभें राहतें. तें पाहून त्याच्या मनाचा थरकांप झाल्यावांचून राहत नाहीं. केवळ काव्यमय कल्पनांनीं मनुष्याची अस्वस्थता दूर होत नाहीं. मृत्यु ही सृष्टिक्रमांतील स्वाभाविक गोष्ट आहे हें कळत असूनहि तो त्याचें स्वागत करूं शकत नाहीं. तांब्यांनीं या भावनांचें मोठें सुंदर चित्रण केलें आहे :

' कळा ज्या लागल्या जीवा ।<br>
मला कीं ईश्वरा ठाव्या<br>
कुणाला काय हो त्यांचें ।<br>
कुणाला काय सांगावें ?

उरीं या हात ठेवोनी ।
        उरींचा शूल कां जाई ?
समुद्रीं चौंकडे पाणी ।
        पिण्याला थेंबही नाहीं !
कशी साहूं पुढें मागें ।
        जिवाला ओढ जी लागे
तटातट् काळिजाचे हे ।
        तुटाया लागती धागे
पुढें जाऊं ? वळूं मागें ?
        करूं मी काय रे देवा ? '

मृत्यूच्या कल्पनेनें व्याकुळ झालेल्या प्रौढ मनाची ही ओढाताण परवाच्या आजारांत मीहि अक्षरशः अनुभवली आहे. मात्र या व्याकुळतेच्या मुळाशीं मृत्यूविषयीं वाटणारी भीति हेंच कारण असतें असें मला वाटत नाहीं. वृद्ध झालेल्या ययातिराजानें राज्याच्या मोबदल्यांत एका मुलाचें तारुण्य विकत घेतलें, अशी कथा आहे. ययातीनें हा सौदा केला तो मृत्यूला भिऊन नव्हे; तर तारुण्यांतले उपभोग भोगून त्याची तृप्ती झाली नव्हती म्हणून. असें तारुण्य मिळणें शक्य असतें तरी तें मी मुळींच पत्करलें नसतें. चांदण्यारात्रीं स्वैर भटकण्यांत, पाण्यांत तास न् तास डुंबत राहण्यांत, लहानमोठीं साहसें करण्यांत, आवडणारे पदार्थ यथेच्छ खाण्यांत आणि आपल्याला प्रिय असणाऱ्या सहचारिणीच्या उन्मादक सहवासांत सुख असतें हें मी अमान्य करत नाहीं. पण या सुखाची गोडी मुख्यतः शारीरिक असते. हीं सुखें त्या त्या वेळीं अवीट वाटणें नैसर्गिक असें असतें. पण त्यांच्यांत बुद्धीला भुलविणारें किंवा हृदयाला हलविणारें असें काय आहे ? मात्र ययातीप्रमाणें ऐन पंचविशींतला तरुण होण्याची लालसा मला नसली, तरी आजचें माझें प्रौढपण दीर्घकाल टिकावें अशी मात्र माझी मनःपूर्वक इच्छा आहे. या इच्छेच्या मुळाशीं मृत्यूविषयीं मनुष्याला वाटणाऱ्या भीतीपेक्षांहि प्रीतीचाच भाग अधिक आहे. ' मृत्यूला म्हणतो सबूर ' या कवितेंत यशवन्तांनीं या भावनेचें सुंदर वर्णन केलें आहे. ते म्हणतात—

‘ पाहोनी चिमणी पिला भरविते,
आणून चारा मुखीं ।
आपोआप मनांत बोल उठले,
मृत्यो, नको येउं, कीं ॥ ’

मृच्छकटिकांतल्या चारुदत्ताच्या ‘ मरण बरें वाटतें ’ या उत्तराचें मला राहून राहून नवल वाटतें तें याच कारणासाठीं. मैत्रेय हा चारुदत्ताचा मित्र असला तरी भिक्षुकी हा त्याचा धंदा. जसा धंदा तशी अक्कल ! तेव्हां “ मित्रा, दारिद्र्य आणि मरण यांतून तुला कोणतें बरें वाटतें ? ” असा प्रश्न त्यानें वेड्यासारखा विचारला ही गोष्ट एक वेळ क्षम्य मानतां येईल. पण ज्या चारुदत्ताला पांचसहा वर्षांचा एकुलता एक मुलगा होता, त्यानें या प्रश्नाचें उत्तर देतांना ‘ मरण बरें वाटतें ’ असें म्हणायचें कीं माझा रोहसेन मोठा होईपर्यंत मृत्यूचा विचार करण्यालासुद्धां मी तयार नाहीं असें सांगायचें ? गोरगरीब आणि दीनदलित यांच्यासाठीं सारी संपत्ति सहृदयतेनें खर्च करणाऱ्या चारुदत्ता-जवळ वात्सल्याचें वैभवच नव्हतें असें कोण म्हणेल ? मी चारुदत्तासारखा संपन्न नाहीं आणि उदारहि नाहीं. शिवाय मैत्रेयासारखा मूर्खपणानें मृत्यूचा प्रश्न करणारा कुणी स्नेहीहि माझ्या मित्रपरिवारांत नाहीं. पण ज्या ज्या वेळीं अप-घाताच्या किंवा आजाराच्या पडद्याआडून मृत्यु आपल्याकडे डोकावून पाहत आहे असा मला भास होतो त्या त्या वेळीं मी त्याला म्हणतों, “ अं हं ! इतक्यांत नाहीं, जरा थांब ! माझा अवि मोठा होऊं दे. माझी मंदा मोठी होऊं दे–माझी लता– ”

हें ऐकून मृत्यु विनोदी हास्य करून मला म्हणतो, “ तुला चारच मुलें आहेत म्हणून बरें ! तुझ्या जागीं धृतराष्ट्र असता नि त्यानं मला अशी विनंति करायला सुरवात केली असती तर त्याचा शंभरावा मुलगा मोठा होईपर्यंत मला वाट पहावी लागली असती ! ”

लगेच तो गंभीर होऊन उद्गारतो, “ तें कांहीं नाहीं. तूं भित्रा आहेस. वात्स-ल्याच्या आड लपून मला गुंगारा देण्याची युक्ति आहे ही तुझी ! ”

त्याचा हा भित्रेपणाचा आरोप खोटा आहे हें सिद्ध करण्याकरतां मी माझें अंतरंग त्याच्यापुढें उघडें करून दाखवितों. माझ्या मनाच्या लहानशा कप्प्यांत

भीति दडून बसलेली असते, हें खरें. पण दुसऱ्या मोठ्या कप्प्यांत वात्सल्य तळमळत असलेलें त्याला दिसतें ! आणि तिसऱ्या तेवढ्याच मोठ्या भागांत कुणाची तरी तडफड चाललेली पाहून तो विचारतो,

"हें कोण तडफडतंय् इथं ?"

मी उत्तरलों, "ती अतृप्त इच्छा."

"कसली ?"

"ऋणांतून मुक्त होण्याची."

"कुणाच्या ?"

"समाजाच्या !"

मृत्यूच्या मुखावर स्मिताची छटा चमकून जाते. ती पाहून मला मोठा धीर येतो व मी त्याला म्हणतों, "स्वतःसाठीं मी जगलों,कुटुंबासाठींहि जगलों, पण –समाजासाठीं मात्र–तुझ्याबरोबर यायलाच हवं असेल तर मी येतों. पण एक गोष्ट मला आधीं सांग. माणसाला पुनर्जन्म असतोना ? तो असला तर मी देवाला म्हणेन 'पुढच्या जन्मीं मला कीर्ति देऊं नकोस, संपत्तिहि देऊं नकोस. फार काय प्रीतिसुद्धां थोडी कमी दिली तरी चालेल. पण एक गोष्ट मात्र मला दे. मानवतेसाठीं जगण्याचें भाग्य मला लाभूं दे. आणि जेव्हां मरण यायचं असेल तेव्हां तेंहि मानवतेसाठीं लढतां लढतांच येऊं दे !"

# विस्मृति १०

‘ सात वाजून गेले ’ कुणींतरी हळूच म्हटलें.

गाणें ऐन रंगांत आलें असतांना कुणीतरी मधेंच शिंकावें तसें आमचें दोघांचें झालें. मी आणि माझे कविमित्र यांच्या संभाषणसमाधीचा भंग करणाऱ्या त्या माणसाचा मला असा राग आला म्हणतां, रागाच्या भरांत मी त्याला कांहींतरी बोलूनसुद्धां गेलों असतों. पण लगेच माझ्या लक्षांत आलें—मोटार स्टँडवरून साडेसातला सुटते हा कांहीं त्याचा अपराध नाहीं आणि मोटारतळ व आमचें घर यांच्यामध्यें एक मैलाचें अंतर ठेवण्यांत कुणाचा गुन्हा असेल तर तो माझ्या आजोबांचा. पुढें मोटारी होतील तेव्हां आपल्या नातवाला त्यांचा तळ गांठण्याकरितां फार चालावें लागूं नये म्हणून दूरदृष्टीनें त्यांनीं आमचें घर बाजाराजवळ बांधलें असतें तर बरें झालें नसतें का ?

मी व माझे कविमित्र उठलों, पण, अगदीं नाखुषीनें. उन्हाळ्यांत नदीच्या वाहत्या पाण्यांत डुंबणाऱ्या मुलांना कांठावरच्या प्रौढ मनुष्यानें हाताला धरून बाहेर काढावें ना ? घड्याळानें आमचीहि तशीच स्थिति केली होती.

आम्हीं दोघांनींहि घड्याळाकडे रागानेंच पाहिलें. सात पांच ! अरे बापरे ! कवि घाईघाईनें कपडे करूं लागले. मी मात्र घड्याळाकडे पाहत मनांत म्हणत होतों—गांधीजी यंत्रांविरुद्ध आहेत तें कांहीं उगीच नाहीं. या घड्याळानं आतां केवढा विरस केला आमचा ! चांदण्यांत हुरडा खात बसावं त्याप्रमाणें एकमेकांच्या शीतल सहवासांत आम्ही संभाषणसुखाचा आस्वाद घेत होतों. पण तें या दुष्ट घड्याळाला पाहवलें नाहीं. त्याचा हा मिनिटकांटा तर भारीच अवखळ आहे. कधीं क्षणभर स्वस्थ बसेल तर शपथ !

कवींना पोंचविण्याकरितां मी त्यांच्याबरोबर थोडासा पुढें गेलों. आम्हीं दोघेहि आतां मुके झालों होतों. द्राक्षें खाण्यापेक्षांहि त्यांची जिभेवर मागें रेंगाळणारी माधुरी अनुभवण्यांतच अधिक सुख असतें. काल संध्याकाळपासून

आमचें जें विविध व अखंड संभाषण झालें तें या वेळीं आमच्या मनांत असेंच तरळत होतें.

कवींचा निरोप घेऊन मी घरीं परत आलों व कामाला लागलों. मध्येंच मी घड्याळाकडे पाहिलें. साडेसात वाजून गेले होते. आपले मित्र आतां मोटारींत बसून दूर गेले असतील अशी कल्पना माझ्या मनांत येऊन गेली, तोंच—

माझ्या कानावर माझा विश्वासच बसेना.

माझ्या नांवाची हांक मला स्पष्ट ऐकूं आली होती–नि ती हांक मारणारा आवाजहि–तो कवींचाच होता !

मी लगबगीनें बाहेर आलों. कवींची स्वारी हंसत अंगणांत उभी होती.

मीं विचारलें, " मोटार चुकली वाटतं ? "

ते उत्तरले, " हं ! "

" आमचें घड्याळ मागें आहे कीं काय कुणाला ठाऊक ! "

" अं हं ! "

" मग तुम्ही हळुहळू चालत गेलां असाल ! नाहींतर वाटेंत एखादें सुंदर पांखरूं दिसतांच त्याच्यावर कविता करायला लागलां असाल ! "

" अं हं ! "

" मग झालं तरी काय ? "

" मला तिकीट मिळालं नाहीं ! "

" फार गर्दी होती ? "

" अं हं ! " मिस्कीलपणें हंसत कवि उद्गारले.

गर्दी नसतांना त्यांना तिकीट कां मिळूं नये हें कोडें मला उलगडेना. " आमची मर्जी नसेल त्यास आंत घेतलें जाणार नाहीं " असें एक कलम पूर्वीच्या नाटक मंडळींच्या जाहिरातींत असे. मोटारींनीं हल्लीं ते आपल्या पिनलकोडांत दाखल करून घेतलें कीं काय या विचारांत मी पडलों.

कवि हंसत म्हणाले, " मला तिकीट मिळणार कसं ? स्टँडवर माझ्या ओळखीचं कुणीच नव्हतं–नि पैशाचं पाकीट तर—"

मी एकदम सर्द झालों. काल संध्याकाळीं घरीं कवींनीं पैशाचें पाकीट सुरक्षित ठेवण्याकरितां माझ्याकडे दिलें होतें. तें मी आल्याबरोबर कपाटांत ठेवलें होतें.

तिथें तें अगदीं सुरक्षित होतें यांत कांहींच शंका नव्हती. पण मघांशीं जातांना तें त्यांना द्यायला मी विसरलों नि तें मागून घ्यायला ते विसरले.

या विसराळूपणाबद्दल आम्हीं दोघेहि खदखदून हंसलों. ' विस्मृति ' हा लेखकांचा विनोदाचा आवडता विषय कां आहे याची आम्हांला एका क्षणांत खात्री पटली. कंबरेवर कळसा असून तो शोधण्याकरितां गांवाला वळसा घालणारी म्हणींतली स्त्री घ्या किंवा नाकावर चष्मा असून तो हरवला म्हणून वर्तमानपत्रांत जाहिरात द्यायला निघालेला प्रोफेसर घ्या, दोन्हीं माणसें विलक्षण विसराळूपणामुळेंच हास्यास्पद झालीं आहेत. ' आठवणीचे खंदक ' या प्रहसनाची सारी मौज विसराळूपणाचे विक्रम करणाऱ्या विद्वानांवरच अवलंबून आहे ! आणि गडकऱ्यांचें तें अद्वितीय पात्र–विसरभोळ्या गोकुळचा–प्रेक्षकांना कधींच विसर पडणार नाहीं. प्रत्येक वस्तूच्या नांवची गांठ उपरण्याला बांधून बिचारा बाजारांत जातो. वाटेंत त्या गांठी कुणी सोडीत नाहीं हें खरें ! पण बाजारांत गेल्यावर एक नवीनच संकट त्याच्यापुढें दत्त म्हणून उभें राहतें. कुठली गांठ कुठल्या वस्तूबद्दल आहे हें कांहीं त्याला धड आठवत नाहीं, नि शेवटीं कष्टानें केशर व साखर यांची आठवण झाली तरी ' केशर शेरभर व साखर तोळाभर कीं साखर शेरभर व केशर तोळाभर ' याचा त्याला कांहीं केल्या उलगडा होत नाहीं. असली जबरदस्त विस्मरणशक्ति असलेल्या मनुष्यावर कोर्टांत साक्ष देण्याचा प्रसंग आल्यावर–गोकुळची तीं विलक्षण उत्तरें ऐकून कोण हंसलेला नाहीं ? आणि हंसतां हंसतां मनांतल्या मनांत " देवा मी लंगडा किंवा थोटा झालों तरी चालेल, पण मला विसराळू करूं नकोस " अशी प्रार्थना कुणी केलेली नाहीं ?

मानवजात विस्मृतीला शाप मानीत आली आहे यांत शंका नाहीं. पण मला अनेकदां वाटतें—विस्मृति हा मोठा वर आहे. मानवी आयुष्यांत विसरून जाण्याजोग्या गोष्टीच अधिक घडतात, पण त्या मनुष्य विसरूं शकत नाहीं. म्हणूनच त्याचें दुःख वाढत जातें; शल्यें, संकटें आणि अपमान त्याच्या आठवणींत नेहमीं राहतात आणि त्याच्या मनाला आपोआप अडगळीच्या खोलीचें स्वरूप येतें. फुटके डबे, मोडकीं खेळणीं नि रिकाम्या बाटल्या यांनीं भरलेल्या खोलींत कुणाला तरी समाधान वाटेल का ? पण आपल्या मनाला तसल्या खोलीची अवकळा आणणाऱ्या स्मृतींचें आपण किती विलक्षण स्तोम माजवितों ! प्रेम-

भंगाची तळमळ, असंतोषाची जळजळ, सूडाची धडपड, आणि होऊन गेलेल्या गोष्टींविषयींची तडफड हीं सारीं स्मृतीचींच अपत्यें आहेत. स्मृति व अहंकार यांच्या मीलनामुळेंच मानवी जीवन अजूनहि विलक्षण संकुचित राहिलें आहे.

आणि म्हणूनच विशाल जीवनाच्या अनुभवाकरितां आसावलेला मनुष्याचा आत्मा विस्मृतीच्या पळवाटा नेहमीं शोधीत असतो. प्रीतीची मोहिनी विलक्षण असते याचें कारण केवळ शरीरसुख हेंच नाहीं. प्रीतीमुळें मनुष्य थोडा वेळ कां होईना स्वतःला विसरून जातो. लहान मूल अधिक सुखी असतें याचें कारण तरी दुसरें काय आहे ? त्याच्या कोशांत काल आणि उद्यां हे शब्दच नसतात. फक्त आज आणि आतां हे दोनच कालवाचक शब्द त्याला कळतात. ज्याला आयुष्यांतलें काव्य टिकवावयाचें आहे त्यानें प्रौढपणींहि लहान राहिलें पाहिजे. विस्मृतीची कला संपादन केली पाहिजे. बायकापोरांची आठवण विसरून अथांग सागरांत कोलंबसानें जहाज लोटलें तेव्हांच त्याला नवें जग शोधून काढतां आलें. आपल्या भोंवतालच्या राजवैभवाचा गौतमाला विसर पडला म्हणूनच तो बोधिसत्व झाला. नाहीं का ?

या थोर महात्म्यांच्या पंक्तींत मी व माझे कविमित्र कधींतरी बसूं शकूं या कल्पनेनें मला आनंद झाला. पण तो क्षणभरच ! संभाषणाच्या उच्च आनंदाचा उपभोग घेतां घेतां घरींच आम्ही पैशांचें पाकीट विसरलों म्हणून बरें ! एखाद्या मोटारींतून प्रवास करतांना आमचें हें संभाषण रंगांत आलें असतें नि तें पाकीट आम्ही मोटारींतच विसरलों असतों तर त्या पाकिटांतल्या पैशाबद्दल आम्ही कितीतरी दिवस हळहळत बसलों असतों !

विस्मृति हा मोठा वर आहे खरें ! पण वर मिळविण्याला तपश्चर्याहि तशीच असावी लागते.

## मंदाकिनी

११

सुभाषितांचा उगम बहुधा सौंदर्यांत असतो, सहसा सत्यांत असत नाहीं असें कुणींसें म्हटलें आहे ना ? त्याची प्रचीति मला वारंवार येते.

मागच्या महिन्यांतली गोष्ट. बऱ्याच दिवसांनीं-दिवसांनीं म्हणण्यापेक्षां वर्षांनीं म्हटलेलेंच शोभेल-मी शिरोड्याला गेलों होतों. शाळेंत छोटासा बक्षिस समारंभ होता. तो सुरू होणार इतक्यांत एका हंसतमुख मुलानें एक ताजें वट-मोगऱ्याचें फूल माझ्या हातांत आणून दिलें. त्या फुलाचा मधुर सुवास घेतां घेतां माझ्या मनांत आलें-या सुगंधाच्या रूपानें शाळेनेंहि माझ्यावरलें आपलें प्रेमच व्यक्त केलें आहे. नाहीं का ?

तें फूल कोटाला लावण्याचा प्रयत्न मीं केला. पण गडबडींत तें मला जमेना. अशा वेळीं माझ्या वेंधळेपणाचा मला फार राग येतो. पण लगेच मी स्वतःचें समाधान करून घेतों-या जन्मांतच साऱ्या लहान लहान गोष्टी आपण शिकणें म्हणजे आपला पुढला जन्म कंटाळवाणा करून घेण्यासारखें आहे. यापेक्षां अनेक बाबतींतलें आपलें सध्यांचें अज्ञानच अधिक बरें ! पुढल्या जन्मीं आपल्याला खूपखूप गोष्टी शिकावयाच्या आहेत ही कल्पनाच किती आशादायक आहे ! त्या गोष्टींची एक यादीच करून ठेवूं या आपण. कोटाला फूल लावणें, सायकल-वर बसणें, फौन्टनपेनमध्यें शाई भरणें, टेनिस खेळणें, गातां आलें नाहीं तरी वाजाची पेटी, निदान अलगुज वाजविणें, रुमाल अथवा नेकटाय यांच्यापैकीं कांहीं तरी एक बांधायला शिकणें, इत्यादि इत्यादि.

या विचारपद्धतीनें मनाचें समाधान करीत मीं तें वटमोगऱ्याचें फूल माझ्या खिशांतल्या हातरुमालावर अलगद ठेवलें आणि समारंभाच्या कार्यांत मग्न होऊन गेलों.

त्या दिवशीं जुन्या मधुर स्मृतींच्या सुगंधानें माझें मन पदोपदीं भरून जात होतें. आणि मनांतले विविध भाव प्रगट करणें अशक्य झालें कीं प्रत्येक वेळीं

माझा हात खिशाकडे जात होता, त्यांतून तें बटमोगऱ्याचें फूल तो हळूच बाहेर घेत होता नि एखाद्या लहान मुलाचा नाजुकपणानें पापा घ्यावा त्याप्रमाणें त्या गोड फुलाचा मी वास घेतल्यावर माझा हात तें परत खिशांत नेऊन ठेवीत होता.

बटमोगऱ्याच्या त्या फुलाशीं चाललेला हा माझा अखंड चाळा कुणीं पाहिला असता तर त्यानें उद्गार काढले असते—हा गृहस्थ जन्माला येऊन प्रथमच बटमोगऱ्याचें फूल पाहात आहे! पहिलेपणाचें आकर्षण कांहीं निराळेंच असतें! म्हणच आहे ना? पहिलें मूल, पहिलें फूल नि पहिलें चुंबन—पहिल्याची गोडी दुसऱ्याला असत नाहीं!

मी त्या गृहस्थाला उत्तर दिलें असतें–तुमचीं हीं सुभाषितें म्हणजे मानव जातीनें उराशीं बाळगलेलीं मधुर असत्यें आहेत. यापूर्वी मी शेंकडों वेळा बटमोगऱ्याचीं फुलें पाहिलीं आहेत, त्यांचा वास घेतला आहे, इतकेंच नव्हे तर तीं उशाजवळ ठेवून त्यांच्या सुगंधमय स्वप्नांशीं समरस होत होत मी निद्रेच्या आधीन झालों आहें. असें असूनहि आज बटमोगऱ्याचें फूल हातांत येतांच त्यानें मला वेड लावलें यांत मात्र संशय नाहीं. सूर्योदय, सूर्यास्त, चांदणें, पाऊस, इंद्रधनुष्य, समुद्र, मध्यरात्र, कुठलेंहि सुंदर दृश्य घ्या, प्रत्येक वेळीं तें माणसाच्या मनाला मोहिनी घालतेंच घालतें. या सर्वांची पहिल्या वेळची माधुरी दुसऱ्याच काय पण हजाराव्या अनुभूतीच्या वेळींहि कायम असते! किंबहुना ती दर वेळीं वृद्धिंगतच होत जाते. दण्डकारण्यांत चौदा वर्षांनीं परत गेलेला राम पूर्वस्मृतींनीं व्याकुळ होऊन बेशुद्ध होतो, तेव्हां सीता आपल्या क्षणिक स्पर्शानें त्याची मूर्च्छा घालविते, असें जें भवभूतीनें दाखविलें आहे त्यावरून पहिल्या चुंबनापेक्षां सहवासानें प्रियतम झालेल्या व्यक्तीच्या साध्या स्पर्शांतच संजीवनी असते हें सिद्ध होत नाहीं कां?

आणि मुलांची गोष्ट काय फुलापेक्षां निराळी आहे?

पितृपद अथवा मातृपद प्राप्त करून देणाऱ्या पहिल्या अपत्याविषयीं आईबापांना एक प्रकारचा अभिमान नि आनंद वाटतो यांत शंका नाहीं. पण आपला सारा अभिमान आणि आनंद अपुरा आहे याची त्यांना लौकरच कल्पना येते. निदान मला तरी ती आली.

माजघर पादाक्रांत करण्याकरितां धडपडणाऱ्या अविनाशाच्या बाललीलांत गुंग होऊन जात असतांना सुद्धां माझ्या मनांत विचार येत—

मुलीला हुंडा द्यावा लागत असल्यामुळें आपलें पहिलें अपत्य मुलगाच असावा असें हिंदु आईबापांना वाटतें हें खरें! पण केवळ पुत्रप्रेमानें माणसाच्या वात्सल्याची तृप्ति होत नाहीं. चोवीस तास सूर्यच प्रकाशत राहिला असता तर लोक त्याला कंटाळून गेले असते. तो संध्याकाळीं अस्त पावतो आणि अमृतमधुर चंद्रिकेचा उदय होतो म्हणूनच दिवस आणि रात्र हीं आपआपल्यापरी माणसाला रम्य वाटतात. फलभारानें लवलेल्या वृक्षांच्या रांगा पाहून कांहीं आपल्या डोळ्यांचें समाधान होत नाहीं. त्यांना विविध रंगांच्या आणि आकारांच्या फुलांनीं नटलेल्या वेलीहि पाहाव्याशा वाटतात! वात्सल्याचेंहि तसेंच आहे. अपत्यप्रेम म्हणजे नुसतें पुत्रप्रेम नव्हे किंवा नुसतें कन्याप्रेम नव्हे या दोन्ही प्रेमांचा संगम आहे तो! कित्येक कुटुंबांना नुसत्या मुलांचें किंवा निव्वळ मुलींचें वरदान असतें. याचा परिणाम शेवटीं असा होतो कीं, मुलग्यामागून मुलगा होणारे आईबाप धाकट्या मुलाचे केस एखाद्या मुलीप्रमाणें वाढवून आणि मुलीप्रमाणेंच त्याला नटवून थटवून आपली कन्याप्रेमाची तहान भागवून घेतात. उलट मुलीमागून मुली होत गेल्यामुळें मुलीला मुलाप्रमाणें नटविणारे आणि मनुताईला मन्याबापू म्हणून हांक मारणारे आईबापहि आढळताच कीं! इतरांना त्यांची ही वागणूक विक्षिप्तपणाची वाटते. पण विक्षिप्तपणा काय किंवा विकृति काय दोन्हींचाहि जन्म अतृप्तीच्या पोटींच होत असतो.

पहिल्या अपत्याच्या वेळीं उत्सुकतेबरोबर भीतीचीहि छाया पतिपत्नींच्या मनावर पसरलेली असते. ' बाळंतपण म्हणजे स्त्रीचा पुनर्जन्म ' हें जुनें वाक्य राहून राहून त्यांना भेवडावून टाकतें. पण अपत्यप्राप्तीनें स्त्रीचाच नव्हे तर पुरुषाचाहि मानसिक पुनर्जन्म होतो. त्या एका क्षणांत पत्नी माता म्हणून जन्माला येते आणि पतीचें रूपांतर पित्यांत होऊन जातें, ही गोष्ट अनुभवानें कळून चुकली असल्यामुळें दुसऱ्या अपत्याच्या वेळीं पतीपत्नींच्या मनामध्यें भीतीपेक्षां कुतूहलच अधिक प्रभावी होतें. ' आतां मुलगा होणार कीं मुलगी होणार? ' या प्रश्नाला ' युद्ध होणार कीं तह होणार? ' या प्रश्नाइतकें महत्वाचें स्वरूप गृहराज्यांत प्राप्त होतें तें याच वेळीं. ज्यांना पहिला मुलगा असतो त्यांना त्याच्या

पाठीवर मुलगी व्हावी असेंच वाटत असतें. मीहि या नियमाला अपवाद नव्हतों. मात्र पत्नीची थट्टा करण्याकरतां ज्योतिषावर माझा विश्वास नसतांनाहि कुणी तरी फार पूर्वी केलेली माझी पत्रिका दाखवून 'तुला पुन्हां मुलगाच होणार,' असें तिला पुनः पुनः सांगण्यांत मला आनंद होत होता हें कांहीं खोटें नाहीं. बरेच वेळां ही गोष्ट तिनें हंसण्यावारी नेली. मात्र पतीचा हा छळ असह्य झाल्यावर तिनें एकदां उत्तर दिलें, "सारींच भविष्यें कांहीं खरी होत नाहींत!"

महाडकरापासून म्हापणकरापर्यंत कुणाकुणा ज्योतिष्यांचीं कुठलीं कुठलीं भविष्यें खरीं ठरलीं हें मला सांगतां येण्यासारखें नसल्यामुळें मला थोडा वेळ 'यशस्वी माघार' घ्यावी लागली. पण लढाईंत एक शस्त्र निकामी झालें म्हणून कांहीं शूर शिपाई प्रतिपक्षाला शरण जात नाहीं. पतिपत्नींच्या प्रेमकलहांतहि असेंच घडतें. ज्योतिःशास्त्र हें भरवंशाचें कूळ नाहीं असें ठरल्यावर मी आनुवंशिक शास्त्राचा आधार घेतला. आम्ही तिघे भाऊच होतों. लहानपणीं भाऊबिजेकरितां सख्खी बहीण हवी असें वाटत असूनहि मला ती कधींच मिळाली नव्हती! मागच्या पिढीचा हा दाखला पत्नीला उगीच भिवविण्याच्या कामीं मला थोडासा उपयोगी पडला हें खरें! पण मनांत मात्र मी एकसारखा म्हणत होतों–लग्न ही लॉटरी आहे असें म्हणण्याची आपणाकडे पद्धत आहे. पण लग्नापेक्षां अपत्यप्राप्तीलाच ती उपमा अधिक शोभेल.

मनांत असले विचार घोळत असल्यामुळें या गोष्टीचा निकाल ज्या दिवशीं झाला ती अमावास्या असूनहि पौर्णिमेसारखी वाटली. कारण निकाल आम्हांला अनुकूल असाच आला होता. अविनाशला बहीण झाली होती.

लौकरच गृहराज्यांतल्या कौन्सिलपुढें एका प्रश्नाची जोराजोरानें चर्चा होऊं लागली. मुलीचें नांव काय ठेवायचें? कुणींतरी चटकन् 'छाया' हे नांव सुचविलें. नांव सुटसुटीत होतें, रखरखणाऱ्या जीवनाला शीतलतेचा लाभ करून देणें हा जो स्त्रीहृदयाचा धर्म त्याचें प्रतिबिंबहि त्या नांवांत होतें! शिवाय 'छाया' बोलपटाच्या कथेबद्दल मला त्याच वेळीं सुवर्णपदक मिळालें होतें!

मुलीला 'छाया' हें नांव ठेवण्याचा मला मोह पडला. पण स्त्रीजीवनांतील सौंदर्य, वात्सल्य, त्याग, इत्यादि सर्व गुणांचा आविष्कार करणारें नांव मला

हवें होतें. ' छाया ' हें नांव काव्यमय असलें तरी या दृष्टीन माझें पूर्णपणें समाधान करूं शकेना.

मनांतल्या मनांत मी अनेक नांवाची चांचणी घेऊं लागलों. देवता आणि नद्या यांचीं कितीतरी नावें माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिलीं. पण देवतांचीं स्वरूपें वागविण्यांत आपल्या पूर्वजांची जी कल्पकता दिसून येते ती त्यांच्या नांवांत सहसा आढळत नाहीं. सरस्वतीचेंच उदाहरण घ्याना! अलीकडच्या कांहीं चित्रकारांनीं तिला अगदीं आधुनिक नटी बनविलें असलें तरी,

" या कुंदेंदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदंडमंडितकरा या शुभ्रपद्मासना ! "

या दोन मधुर चरणांत प्राचीन कवीनें चित्रित केलेलें सरस्वतीचें स्वरूप किती सुंदर आणि गंभीर आहे. सरस्वती ही जगांत पावित्र्याचा प्रकाश पसरविणारी ज्योति–मानवी मनाचें मलिन्य नाहींसें करणारी देवता–अशा देवतेची अंगकांति शुभ्र हवी, तिचें वस्त्रहि शुभ्र हवें आणि तिचें आसनहि शुभ्रच हवें ! प्रतीकाच्या दृष्टीनें पहा किंवा रंगसंगतीच्या दृष्टीनें पहा, या काव्यचित्रांतलीं कल्पकता किती कोमल आणि मनोरम वाटते. सरस्वतीच्या हातांत वीणा देण्यांत आणि मयूर हेंच तिचें वाहन कल्पिण्यांतसुद्धां किती काव्य भरलें आहे !

पण सरस्वती हें नांव या काव्याच्या मानानें फारच रुक्ष वाटतें. त्यांतून हें नांव मुलीला ठेवलें कीं, सुटसुटीतपणाच्या दृष्टीनें त्याचें ' सरू ' हें रूपांतर झालेंच म्हणून समजावें. मुलगी उंच असली तर पुढें पुढें या ' सरु ' ला 'सुरू' म्हणूनसुद्धां हांक मारायला माणसें कमी करायचीं नाहींत.

मी मनाशीं म्हटलें ' छेः ! ' सरस्वतीविषयीं आपणाला कितीहि आदर असला तरी आपल्या मुलीला तें नांव ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

लहानपणीं कोल्हटकरांचीं नाटकें मला फार आवडत असत. या नाटकांतल्या सर्व नायिकांची आणि उपनायिकांची पलटण मी पाहिली–शालिनी, मालिनी, सरोजिनी, नंदिनी, सौदामिनी, चंद्रिका, इंदिरा, मोहिनी, त्रिवेणी, हीं नांवें नाटकांत गोड वाटतात हें खरें. पण प्रत्यक्ष व्यवहारांत तीं अनेक दृष्टींनीं अडचणीचीं होतात. ' सौदामिनी ' ला काय ' सौदा ' म्हणून हांक मारायची ? त्यापेक्षां तिला मिनीच ' म्हटलेलें बरें !

नाटकें–कादंबऱ्यांतलीं नांवें संस्थानांत दरबारच्या वेळीं कराव्या लागणाऱ्या पोशाखाप्रमाणें मनाला परकीं व विचित्र वाटतात. म्हणून त्यांचा नादच मी सोडून दिला. पण कांहीं झालें तरी मुलीला शोभणारें एक नांव शोधून काढणें मला प्राप्तच होतें. स्वतःच्या मुलीला नांव ठेवणें हें दुसऱ्यांच्या मुलींना नांवें ठेवण्याइतकें सोपें काम नाहीं हें मला पुरेपूर कळून चुकलें.

एक एक दिवसानें बारसें जवळ येत होतें. मला तर कुठलेंच नांव पसंत पडत नव्हतें. चारपांच दिवस झाल्यावर मला या नामसंशोधनाची भीतिच वाटूं लागली. आय्. सी. एस. नवरा हवा म्हणून अडून बसणाऱ्या सुशिक्षित श्रीमंत मुलींना शेवटीं अविवाहित राहावें लागतें; किंवा शिल्लक उरलेल्या कुणा-तरी पुरुषाला माळ घालावी लागते. समर्पक नांव शोधून काढण्याच्या माझ्या वेडामुळें मला मुलीचें निनांवी बारसें करण्याचा प्रसंग येतो कीं ठकू, ठमी, चिमी, रंगी या कारिकेपैकीं एखादें नांव अकल्पितपणें तिला चिकटते याविषयीं मनांत मी साशंक होऊन गेलों. मात्र संकटामुळें माणसाची कल्पनाशक्ति पल्लवित होते याचाहि अनुभव बारशापूर्वीच्या दहा दिवसांत मला भरपूर मिळाला.

मुलीला योग्य असें नांव मला सांपडत नव्हतें. पण जों जों मी नांवाचा विचार करूं लागलों तों तों प्राचीन काळांतली स्त्रीजीवनाचीं विविध व मनोरम चित्रें माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागलीं. दुबळेपणामुळें नवऱ्याच्या लाथा खात बसणाऱ्या अगतिक पतिव्रता आजच्या जगाला नकोत हें खरें. पण मधुर प्रीतिपुष्पांनीं पतीची पूजा करणारी आणि तो वनवासाला निघाल्यानंतर हंसतमुखानें त्याच्या पावलावर पाऊल टाकून जाणारी सीतादेवी–पत्नीप्रेमाचा हा उच्च आदर्श जगाला नेहमींच हवाहवासा वाटेल. आणि यमावर मात करून पतीचे प्राण परत मिळवणारी चतुर सावित्री—तिच्या दिव्य प्रेमाचा जगाला कधींच विसर पड-णार नाहीं. पतीची निवड केल्यावर तो अल्पायुषी आहे म्हणून भिऊन सावि-त्रीनें माघार घेतली नाहीं. उलट आपल्या पुण्यप्रभावानें आपण काळाचाहि परा-भव करूं अशीच ईर्ष्या तिनें बाळगली. प्रीति स्त्रीला किती साहसी करूं शकते याचें चित्रण करणारी ही अमर कथा—

मात्र उत्कट प्रेम करणें हा स्त्रीहृदयाचा धर्म असला तरी तें प्रेम आंधळें असतां उपयोगी नाहीं. आपला पती किंवा आपला पुत्र म्हणून एखाद्या पुरुषा-

वर जीवापलीकडे प्रेम केल्यानें स्त्रीचें कर्तव्य संपत नाहीं. पती अथवा पुत्र जीवनाचीं खरींखुरीं मूल्यें विसरून गेला, पराक्रम हाच पुरुषाचा प्राण आहे याची पर्वा न करतां कीटकासारखें जीवन कंठूं लागला तर त्याला विरोध करणें हाच सतीचा धर्म ठरतो ! पराभूत होऊन आपल्या किल्ल्याकडे परत आलेल्या जसवंतसिंगाला त्याची पत्नी राणी चंद्रावती हिनें आंत पाऊल टाकूं दिलें नाहीं आणि रणांगणाकडे पाठ फिरवून आलेल्या संजयाला त्याची माता विदुला हिनें उपदेश करून पुनः युद्धप्रवृत्त केलें, या गोष्टी आजच्याच काय उद्यांच्याहि स्त्रियांना मार्गदर्शक ठरतील.

सीता, सावित्री, चंद्रावती, विदुला, जिजाबाई इत्यादि स्त्रीरत्नांचीं नांवें इतिहास-पुराणांत चमकूं शकलीं. पण जीं रत्नें सराफकट्ट्यापर्यंत पोंचत नाहींत, जीं कुठेंतरी खाणींत मातींत पडलेलीं असतात, तीं तेजस्वीं नसतात असें कोण म्हणेल ? पिढ्यान् पिढ्या घरोघर माता, पत्नी, कन्या आणि भगिनी यांपैकीं अनेक नात्यांनीं स्त्रिया मानवजातीची सेवा करीत आल्या आहेत, तिचें माहात्म्य कोण नाकारील ?

जगांत लिहिल्या जाणाऱ्या कथांपेक्षां न लिहिल्या जाणाऱ्या कथाच अधिक सुरस असतात. लहानपणीं पाहिलेली एक स्वयंपाकीणबाई मला अजून आठवते. तिला कादंबरीची नायिका करण्याचें धैर्य आम्हां मराठी लेखकांना नाहीं ही गोष्ट अलाहिदा. पण वयाच्या सोळाव्या वर्षीं वैधव्याची कुऱ्हाड डोक्यावर कोसळली असतांना आणि आप्तेष्टाचा किंवा पैशाचा काडीचाहि पाठिंबा नसतांना तिनें स्वतःच्या हिंमतीवर आपल्या दोन मुलांचें पोषण व शिक्षण केलें—त्यांच्या आयुष्याचें ओसाड वाळवंट होणार होतें; पण तिनें तिथें नंदनवन फुलविलें.

स्वतःला विसरून जाऊन दुसऱ्याकरितां जगण्यांत जो स्त्रीला उदात्त आनंद होतो, प्रीतीकरतां सर्वस्वाचा हंसतमुखानें त्याग करण्यांत तिला जो अभिमान वाटतो, त्याच्यामुळेंच पुरुषाचें जीवन रसपूर्ण होतें, त्याच्या पराक्रमाला प्रोत्साहन मिळतें आणि जगाचें पाऊल पुढें पडतें.

गॉर्कीच्या ' आई ' या कादंबरींतली आई जितकी अडाणी तितकीच दरिद्री आहे. आपला मुलगा ज्या चळवळींत भाग घेतो तिचें स्वरूप तिला प्रथम मुळींच समजत उमजत नाहीं. ती साशंकतेनें त्या चळवळीकडे पाहते. पण स्त्री कितीहि

अशिक्षित असली तरी प्रीति तिला हां हां म्हणतां सज्ञान करते. ती कितीहि गरीब असली तरी तिच्या अंतःकरणांतलें भावनांचें भांडार कुबेरालाहि विकत घेण्याइतकें समृद्ध असतें याचा अनुभव त्या कादंबरींत येतो. ही आई प्रथम मायेमुळें मुलाच्या मनाशीं समरस होते आणि मग एखाद्या परक्या पोरी-प्रमाणें लिहावाचायला शिकण्याचा प्रयत्न करून त्याच्या चळवळीशीं एकजीव होऊन जाते. दलितांच्या उद्धारासाठीं चाललेल्या लढाईत भाग घेत असतांनाच तिला वीरमरण येतें.

स्त्रीहृदयाचें हें उदात्त माहात्म्य गॉर्कीप्रमाणें तांब्यांनाहि पूर्णपणें पटलें होतें. म्हणूनच ' भयचकित नमावें तुज रमणी ' असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले.

तांब्यांची ही सुंदर कविता मी दररोज मनाशीं गुणगुणत होतों, स्त्रीजीवनाचे विविध आदर्श माझ्या डोळ्यांपुढें रोज रोज उभे राहत होते, पण हवें असलेलें नांव मात्र कांहीं केल्या मला सुचत नव्हतें. त्यांतल्या त्यांत बरीं वाटलेलीं दोन-तीन नांवें चिठ्ठयांवर लिहावीं आणि त्या चिठ्ठयांपैकीं अविनाश जी उचलेल त्याच नांवाची निवड करावी असा दहाव्या दिवशीं रात्रीं झोंपीं जातांना मी निश्चय केला. कद्रू पूर्वजानें कुठेंतरी पैसे पुरून ठेवले आहेत म्हणून जन्मभर जमीन खणीत बसणाऱ्या मनुष्यासारखाच माझा हा नव शोधून काढण्याचा उद्योग चालला होता ! उद्यांपासून तो बंद करावा हेंच बरें असें म्हणत मी निद्रादेवीची आराधना करूं लागलों.

स्मृति आणि विस्मृति यांच्या सीमेवर माझें मन तरळत असतांना मला वाटलें —लहानपणीं एखाद्या श्लोकाचा अर्थ लागला नाहीं कीं, आपण अगदीं चिडून जात होतों. पण त्या वेळीं एक विलक्षण अनुभव येई आपल्याला ! आट्या-पाट्याच्या डावांत एखाद्या कोंडींत अडकून पडावें, प्रतिपक्षाला खूप हुलकावण्या दाखवाव्या, पण कांहीं केल्या आपली सुटका होऊं नये, आणि या कोंडींतून आतां आपण बाहेर पडत नाहीं अशी निराशा झाल्यावर अगदीं सहजासहजीं निसटायला मिळावें—अगदीं तसा त्या अडलेल्या श्लोकाचा अर्थ दुसरे दिवशीं सकाळीं मला लागत असे मी त्या वेळीं हंसत हंसत स्वतःशींच म्हणे, ' कुणा तरी देवतेची माझ्यावर कृपा आहे. ती रात्रीं हळूच माझ्या खोलींत येते आणि माझ्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून निघून जाते. ' ' लहानपणची ती देवता

आजहि आपल्या साहाय्याला धांवून येईल तर काय बहार होईल ! ' असें मी पुटपुटत असतांनाच माझा डोळा लागला.

मात्र माझी झोंप शांत नव्हती-स्वप्नांमागून स्वप्नें पडत होतीं मला. चित्र-पटांत एक आकृति लोप पावून दुसरी त्या जागीं दिसूं लागते. अशीच एक चित्रमालिका माझ्या डोळ्यांपुढून झरझर जात होती. पहिलें चित्र-शून्य दृष्टीनें कुठें तरी पाहणारी नुकतीच जन्माला आलेली बालिका ! हां हां म्हणतां ती थोडी मोठी होते व कुणी गालाला हात लावला कीं, तिच्या मुद्रेवर स्मिताची नाजूक छटा चमकूं लागते. लवकरच ती मोठ्या ऐटीनें जमिनीवर बसून ' सई दे, ' म्हटलें कीं बोलणाऱ्या व्यक्तीच्या डोक्यावर आपलें डोकें नेऊन आपटते.

तिला बोलतां येत नसलें तरी आपल्या नाजूक उजव्या हाताचें एक बोट डाव्या हातावर नाचवून ' इथं इथं बैस रे मोरा ' या नाट्यगीताचा मूक अभिनय करून दाखविते.

याच्या पुढचें चित्र-ही बालिका तीन वर्षांची झाली आहे. तिच्या मानेच्या दोन्ही बाजूंना दोन चिमुकल्या वेण्या नाचत आहेत. छोट्या डहाळ्यांना सुंदर फुलें लागावींत त्याप्रमाणें त्या वेण्यांच्या टोकांना बांधलेली फीत शोभत आहे. बालिका स्वतःशींच गुणगुणत आहे. " भालत हमाला प्याला--"

उन्हाळ्यांतली दुपारची वेळ. जेवणें होऊन सारी वडील मंडळी हाशहुश करीत बसलीं आहेत. पण ती बालिका मात्र छोटी छोटी चूल आणि इवलीं इवलीं बोळकीं घेऊन कुठल्या तरी घोटभर पाण्याचा चहा करीत आहे. आणि तो सर्वांना पोटभर पाजीत आहे.

बालिका एकदम तेराचौदा वर्षांची होते. आतां तिच्या वेण्या पाठीवर रुळत आहेत. ती गोल पातळ नेसली आहे. तिला पाहून कुणालाहि हरिणाचीच आठवण व्हावी. तिच्या गतींत आणि दृष्टींत दोन्हींतहि हरिणीचें मधुर चांचल्य विलसत आहे.

बालिका आणखी मोठी होते. छेः ! आतां तिला बालिका म्हणणें म्हणजे-तिला तरुणीच म्हणायला हवी ! ही तरुणी एके दिवशीं संधिप्रकाशांत लताकुंजांत एका तरुणाला मानेनेंच कांहींतरी सांगते-त्याच क्षणीं स्वर्ग पृथ्वीवर उतरतो.

मी एकदम जागा झालों. कुठेंतरी लहान मूल रडत होतें. क्षणभर असा राग

आला मला त्या रडण्याचा ! पण दुसऱ्याच क्षणीं माझें मला हंसूं आलें. स्वप्नसृष्टींत माझी मुलगी सासरच्या नांवापर्यंत पोंचली होती-पण सत्यसृष्टींत मात्र तिचें माहेरचें नांवसुद्धां अजून नक्की झालें नव्हतें.

अस्वस्थ मनानें मी खोलीबाहेर आलों. श्रावणांतली रात्र होती ती ! पावसाच्या सरी कोसळत नसल्या तरी आभाळ अंधारलेलेंच असावयाचें या कल्पनेनें मी अंगणांत पाऊल टाकलें. मी चकित होऊन गेलों. आकाशांत एकहि काळा ढग नव्हता. तारका चमचम करीत होत्या आणि तो आकाशगंगेचा पट्टा–

पृथ्वीच्या पोटांत हिरे कसे बरें तयार होतात ? माणसाच्या मनांत कल्पनाहि तशाच स्फुरतात का ?

वर स्वर्गंगा दिसत होती. मघाशीं माझ्या स्वप्नांत स्वर्ग पृथ्वीवर उतरला होता. एकदम मला एक शब्द आठवला–मंदाकिनी.

स्त्रीजीवनाचें संपूर्ण प्रतिबिंब या शब्दांत व्यक्त झालें आहे असें मला वाटलें. मंदाकिनी हें गंगेचें स्वर्गांतलें नांव, पण गंगा कांहीं स्वर्गांतल्या सौंदर्यांत आणि विलासांत गुंग होऊन तिथेंच राहिली नाहीं. पृथ्वीवर उतरून तिनें तिला संपन्नता दिली. एवढेंच नव्हे तर कपिल ऋषीच्या शापानें पाताळांत दग्ध होऊन पडलेल्या सगरपुत्रांचा उद्धारहि तिनेंच केला.

मंदाकिनी हें नांव किती अर्थपूर्ण आहे याविषयीं त्या वेळीं मनांत आलेल्या कल्पना मी आठवून पाहत होतों—

इतक्यांत पांच वर्षांची मूर्तिमंत मंदाकिनी माझ्याकडे धांवत आली. तिच्या हातांत एक बाहुली होती. माझा हात ओढून जवळ जवळ मला जागेवरून उठवीतच ती म्हणाली, " चला, भाऊ. "

" कुठं ? "

" माझ्या बाहुलीच्या लग्नाला ! "

" हल्लीं लग्नं रजिस्टर करतात. त्याला फक्त दोन साक्षीदार लागतात. एक तूं हो नि दुसरी लता होईल. "

माझें रजिस्टर-प्रकरण तिला कुठून समजणार ? ती लडिवाळपणानें मला ओढीत होती.

" चला बाई, नाहींतर मुहूर्त चुकेल ! "

" मला लिहायचंय ग ! "

" काय लिहायचंय ? गोष्ट ? "

" हं, " मीं वेळ मारून नेली. मुलाला लेखनाचा एकच प्रकार ठाऊक असतो-गोष्ट.

" मला सांगा तुमची गोष्ट, " मंदानें हट्ट धरला.

मला तर लिहिण्याची घाई होती. मी म्हटलें, " ऐक हंऽ ! एक होता कोल्हा—"

माझ्या तोंडावर हात ठेवीत ती म्हणाली, " तसली गोष्ट नको मला. "

" मग कसली हवी ? "

" लढाईची ! अवी म्हणतो कीं उद्यां आपल्या घरावर बॉंब पडणार आहे."

क्षणभर मी स्तब्ध राहिलों. पण मंदाला वाटलें गोष्ट चुकवण्याकरितां मी कांहींतरी सबब शोधून काढीत आहे. ती माझ्या गळ्यांत हात घालून लोंबकळत म्हणाली,

" लढाईची छान छान गोष्ट हवी हं. "

लढाईची गोष्ट नि छान ! काय सांगावं या पोरटीला ?

मी अगदीं गोंधळून गेलों. पण ही जकात दिल्यावांचून माझी गाडी पुढें सुटणें शक्य नव्हतें. नुकतीच कुठेंतरी वर्तमानपत्रांत वाचलेली एका रशियन स्त्रीची गोष्ट मी तिला सांगूं लागलों—

जर्मनीनें जिंकलेलें रशियन गांव होतें तें. त्या गांवाकडून आपल्या देशाचा जयजयकार करून घ्यायचें कांहीं जर्मन लष्करी अधिकाऱ्यांनीं ठरविलें. त्यासाठीं त्यांनीं त्या गांवांतल्या एका प्रमुख रशियन स्त्रीला एक भाषण लिहून दिलें. त्यांत ' आम्हांला रशियाच्या राज्यापेक्षां जर्मनीचेंच राज्य अधिक पसंत आहे ' अशा अर्थाचा मजकूर होता. बाईला जर्मन भाषा येत नसतांनासुद्धां तिनें तें भाषण तोंडपाठ केलें. त्या जर्मन अधिकाऱ्यांना आनंद झाला. त्यांनीं एक मोठा समारंभ करून त्याला आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला बोलावलें. त्या बाईचें भाषण हाच त्या समारंभांतला मुख्य भाग होता.

समारंभाला सारें गांव लोटलें. बाई बोलायला उभी राहिली. तिला पढविणाऱ्या जर्मन अधिकाऱ्यांचे डोळे आनंदानें लुकलुकूं लागले.

पण बाईच्या तोंडून जे शब्द बाहेर पडूं लागले ते जर्मन शब्द नव्हते. ते रशियन शब्द होते. मातृभाषेंत ती आपल्या लोकांना सांगत होती. " रशिया हा आपला मायदेश आहे. प्राण गेला तरी त्याच्याशीं आपण बेईमान होतां कामा नये. आज आपला पराभव झाला असला तरी उद्यां आपला जय होईल. "

शत्रूचे दांत तिनें युक्तीनें त्याच्याच घशांत घातले. मात्र या देशभक्तीबद्दल लगेच तिला ठार मारण्यांत आलें.

मी एकदम थांबलों. बालमनाचा विचार न करतां आपण मंदाला कांहींतरी सांगत सुटलों असें मला वाटलें.

जीवनांत सौंदर्याइतकेंच सामर्थ्यहि असतें तर हा विचार एकसारखा मनांत घोळत असल्यामुळेंच ही गोष्ट सांगण्याची इच्छा मला झाली असावी.

मी मंदाकडे पाहिलें. तिनें सारी गोष्ट अत्यंत आतुरतेनें ऐकली होती. मी पुढें आणखी कांहीं तरी सांगणार आहे या कल्पनेनें ती अगदीं गप्प बसली होती.

मी म्हटलें, " गोष्ट संपली ! " तरी ती उठेना !

तिला खिजवण्याकरतां मी बोललों, " तुझ्या बाहुलीच्या लग्नाचा मुहूर्त चुकेल. जा ना ! "

" मला बाहुली नको " हातांतली बाहुली दूर फेंकीत ती म्हणाली.

" मग काय हवं ? "

" बंदूक ! "

आणि माझ्या उत्तराची वाट न पाहतां कोंपऱ्यांतली छडी खांद्यावर टाकून रैप्ट-राइट करीत ती खोलीबाहेर पडली.

REFBK-0006840

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | फुलें आणि दगड | ( आ. दु ) | १ |
| २ | घरट्याबाहेर | ( ,, ) | ३ |
| ३ | पहिली लाट | ( ,, ) | ३ |
| ४ | स्त्री आणि पुरुष | ( ,, ) | २ |
| ५ | सूर्यकमळें | ( ,, ) | २॥ |
| ६ | कालचीं स्वप्नें | | ३ |
| ७ | आजचीं स्वप्नें | | ३ |
| ८ | कलिका | | २। |
| ९ | मृगजळांतील कळ्या | | २॥ |
| १० | सुवर्णकण | | २। |
| ११ | सोनेरीसावल्या | | २। |
| १२ | मंजिऱ्या | | २। |
| १३ | सायंकाल | ( आ. दु. ) | २॥ |
| १४ | अविनाश | ( ,, ) | १॥ |
| १५ | मंदाकिनी | ( ,, ) | १॥ |
| १६ | कल्पलता | | ३ |
| १७ | आगरकर व्यक्ति आणि विचार | | ३॥ |
| १८ | सहा भाषणें | | २ |
| १९ | फुलें आणि कांटे | | २। |
| २० | मराठीचा नाट्यसंसार | | ३ |
| २१ | हिरवा चांफा | (आ. तिसरी) | ५ |
| २२ | दोन ध्रुव | ( ,, ) | ५ |
| २३ | उल्का | ( ,, ) | ४॥ |
| २४ | पहिलें प्रेम | ( आ. दुसरी ) | ३ |
| २५ | क्रौंचवध | ( ,, ) | ५ |
| २६ | पांढरे ढग | ( ,, ) | ४। |
| २७ | जळलेला मोहर | | २ |

## साने गुरुजी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पुनर्जन्म | ( आ. दुसरी ) | ३ |
| २ | आस्तिक | ( ,, ) | ३ |
| ३ | संध्या | | ५ |
| ४ | ना खंत ना खेद | | ५ |

## कृष्णा हाथीसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | सोन्या मारुती ? | ( दु. आवृत्ति ) | २ |
| ६ | निळा पक्षी | ( आवृत्ति दुसरी ) | २॥ |
| ७ | गोड निबंध | ( भाग पहिला ) | ३ |
| ८ | गोड निबंध | ( भाग दुसरा ) | ३ |
| ९ | गोड निबंध | ( भाग तिसरा ) | ३ |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अवशेष | | २ |
| २ | व्यक्तिरेखा | | २। |
| ३ | माझी नभोवाणी | | २ |
| ४ | नवे संसार | ( जप्त ) | ४ |
| ५ | चंदनवाडी | | ६॥ |
| ६ | नागकन्या | | २ |
| ७ | दोन तपें | | ५ |

## ना. वों. ताम्हनकर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दाल्या भा. १ ला | (आ. दुसरी) | ४ |
| २ | दाल्या भा. २ रा | | ३ |
| ३ | निवाडे भा. १ ला | | २॥ |
| ४ | निवाडे भा. २ रा | | ४ |
| ५ | चकमकी | | १॥ |
| ६ | बच्चा नवरा | | १॥ |
| ७ | अनेक आशीर्वाद | | ३॥ |
| ८ | दाजी भा. १ ला | ( आ. ति. ) | ३॥ |

## देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

| | |
|---|---|
| ९ बहिणभाऊ | ·।।। |
| १० संतु | २ |

**वा. म. जोशी**

| | |
|---|---|
| १ स्मृति–लहरी | २ |
| २ विचार–लहरी | २। |
| ३ विचार विहार | ४। |

**चिं. वि. जोशी**

| | |
|---|---|
| १ आणखी चिमणराव (आ. २री) | ४ |
| २ वायफळाचा मळा ( ,, ) | ५ |
| ३ नवें भारूड | २ |
| ४ स्टेशन मास्तर | २ |
| ५ नटश्रेष्ठ | ·।।। |

**दत्तु बांदेकर**

| | |
|---|---|
| १ सख्या हरी ( आ. दुसरी ) | २ |
| २ नवी आघाडी | १।। |
| ३ तूं आणि मी | २। |
| ४ नजरबंदी | २। |

**प्र. के. अत्रे**

| | |
|---|---|
| १ साखरपुडा ( आ. दुसरी ) | २ |
| २ ललित वाङ्मय | ३।। |
| ३ दूर्वा आणि फुलें | २। |

**ना. म. पटवर्धन**

| | |
|---|---|
| १ हितपत्रें | ३ |
| २ वा. म जोशी चरित्र | ४। |

**द. र. कवठेकर**

| | |
|---|---|
| १ अपुरा डाव | ३ |
| २ रेशमाच्या गांठीं | ३ |
| ३ आभाळाची सांवली | ८ |

**अनंत काणेकर**

| | |
|---|---|
| १ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ( आ. दुसरी ) | ३ |
| २ पिकलीं पानें ( आ. दुसरी ) | १।। |
| ३ उघड्या खिडक्या | १।। |

**काकासाहेब कालेलकर**

| | |
|---|---|
| १ ब्रह्मदेवाचा प्रवास | १।। |
| २ भक्ति-कुसुमें | ३ |
| ३ सामाजिक प्रश्न | ३ |

**य. दि. पेण्ढरकर**

| | |
|---|---|
| १ प्रापंचिक पत्रें | ३ |
| २ घायाळ | २ |

**ना. ह. आपटे**

| | |
|---|---|
| १ फसगत | १।। |
| २ साजणी | ५ |

**पु. य. देशपांडे**

| | |
|---|---|
| १ नवें जग ?– | २।। |

**भाई वेके**

| | |
|---|---|
| १ रॅायचरित्र– | १।। |

**वि. स. खांडेकर**

| | |
|---|---|
| १ काव्यज्योति ( आ. दुसरी ) | १ |

**आनंदीबाई जयवंत**

| | |
|---|---|
| १ पारंब्या | २ |

**रा. वि. फडतरे**

| | |
|---|---|
| १ मृगया | ४ |

**लक्ष्मणराव सरदेसाई**

| | |
|---|---|
| १ ढांसळलेले बुरूज | २ |

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

| | |
|---|---|
| १ व्यक्तिचित्रें | २।। |